म. ग्रं. सं. ठाणे
ग्रंथ [illegible]
क्र. ८०४

निबंध ८-४

लेखक

बॅ. सावरकर

# सावरकर साहित्य

भाग ३ रा

किंमत १२ आणे

—मुद्रक व प्रकाशक—

किर्लोस्कर प्रेस, किर्लोस्करवाडी.

★

या पुस्तकाचे सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन.

# प्रस्तावना।

राजकीय पारतंत्र्याइतकीच आपल्या उत्कर्षाला विरोध करणारी दुसरी एक गोष्ट आहे. ती म्हणजे धार्मिक भाबडे-पणा. जो राष्ट्राचें उद्धरण करील तोच वास्तविक खरा धर्म. पण आपण धर्म म्हणून ज्या पोथीजात गोष्टी करतों त्यांमुळें राष्ट्राचा अुद्धार तर राहोच, पण व्यक्तीची दुर्दशा मात्र होते. या अपकर्षक धार्मिक भाबडेपणाच्या कचाटयांतून, देवलसी वृत्तीच्या मगरमिठींतून समाजाची मुक्तता करणें हीच खरी धर्म व राष्ट्रसेवा होय.

भाकड धार्मिक समजुतींनीं पसरलेल्या अंधारांत खरा अुत्कर्ष-मार्ग दाखवण्यासाठीं ज्यांनीं विवेकाच्या मशाली पाजळल्या त्यांपैकीं दे. भ. सावरकर हे एक होत. या संग्रहांत समाविष्ट केलेले सर्व लेख वरवर वाचून सोडून न देतां त्यांचा मननपूर्वक विचार केल्यास आपण आजपर्यंत कसे चुकत आलों हें ज्याचें त्यास कळून येईल.

धार्मिक भाबडेपणांत पुरुषाहून स्त्रिया काकणभर अधिक अस-तात असें म्हटल्यास अतिशयोक्ति नाहीं. म्हणून वाचकभगिनींनीं या पुस्तकाचा अभ्यास आस्थेवाईकपणें करावा अशी मी त्यांना विनंति करतों. आणि सावरकरसाहित्याचा तिसरा भाग पहिल्या दोन भागांप्रमाणेंच वाचकांच्या आवडीचा विषय होऊन राहील अशी आशा बाळगतों.

शं. वा. किर्लोस्कर

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| बाळंतीण | १ |
| शेंदाडपूरचा शिवाजी अुत्सव | २० |
| प्रार्थना | ३९ |
| पाहिजे ! ! | ५६ |
| ध्वनिलेख | ७३ |
| मढीं अुठवतात | ९४ |
| अपघात कीं आत्मघात | १०७ |
| एक नवा अध्याय | १२४ |
| ह्या बहिरोबाला तरी सोडा नाहींतर त्या बहिरोबाला तरी पकडा | १३८ |

# बाळंतीण !

**तो गांव** दहाबारा हजार हिंदु वस्तीचा. एक पडवीसारखी धर्मशाळाहि बोर्डानें बांधलेली गांवाच्या मध्यवस्तीपुढील वाटेच्या टोंकास होती. आज त्या धर्मशाळेपाशीं पांचपंचवीस लोक जमून हें करता आहेत तरी काय, असें वाटेनें जातांना स्वतःशीं पुटपुटत. श्री. गोदास सुखे तिकडे वळले. पाहतात तों एक मरतुकडी, वाटचुकार नी वीण संपलेली एक जख्खड गाय तिथें मटकन् बसलेली आहे आणि जमलेले ते दहापांच लोक एकमेकांस विचारीत आहेत, "मारलें ? कोठें ? कुणीं ? गायीला छडी मारली ?"

गायीला छडी मारली हे शब्द ऐकतांच गोदास सुखे त्या लोकांस हातानें ढकलीत एकदम गायीजवळ गेले. त्यांना पाहतांच एका मुलानें सांगितलें, कीं "ही जख्खड गाय दोनचार दिवस

संध्याकाळीं येथें बसलेली असते. शेजारच्या एका काम करणाऱ्या मनुष्यानें वाटेंत आली म्हणून तिला माझ्या समक्ष छडी मारली. मी ओरडलों नाहीं– नाहींतर तो मला मारता. पण तिला वाटेंतून उठवून तो गेला, तेव्हां मीं या दोघांचौघां जात्यायेत्यांस तें सांगितलें. हें पहा इथें मारलें!" असें म्हणून त्यानें गायीच्या पाठीकडे बोट दाखविलें. पण तिथें वळबीळ कांहीं दिसत नव्हता. गोदास सुखे अगदीं मोठमोठ्यानें बोलण्याच्या आवेशांत येऊन मुलास फटकारूं लागले; "चूप भित्र्या! गोमातेला छडीनें मारणाऱ्या त्या माणसाचा तूं शिरच्छेद कां केला नाहींस? गाय वाटेंत येऊन बसली होती, तर माणसानें वाट सोडून गटाराच्या बाजूनें यायचें होतें. छडी मारून तिला उठविणारा असला वाटसरू कसायीच असला पाहिजे. बिचारी म्हातारी गाय! आअीसारखी पूज्य! तुम्ही इतके हिंदु लोक इथें टकमका बघत असतां तिची जोपासना करण्याचा यत्न अेकजण तरी करतो आहे काय?"

असें म्हणत गोदास सुखे यांनीं आपल्या उपरण्यांतील अेक गोग्रासपेटी बाहेर काढली आणि खुळखुळवीत सगळ्यांपुढें फिरवली, "गोग्रासभिक्षा घाला!" अेकादोघांनीं तींत चवलीपावली टाकली.

गोदास सुखे हे अेक फिरते गोसेवक होते. पूर्वीं ते एका संस्थेच्या वतीनें हिंडत. पण त्या संस्थेनें त्यांचें नांव लबाड म्हणून छापलें, त्यांनीं ती संस्था लबाड म्हणून छापलें, आणि आतां ते स्वतंत्रपणें गोसेवाप्रचार करीत करीत त्या गांवास अलिकडेच आले होते. त्या गायीचें प्रकरण पाहून त्यांना थोडें मनापासून वाअीटहि वाटलें नी आपलें प्रचारकार्य प्रस्ताविण्यास हें प्रत्यक्ष उदाहरण त्या गांवीं चांगलेंच उपयोगी पडेल अशीहि अटकळ त्यांनीं बांधली. लगेच त्या गायीस अुठवून त्यांनीं अेक दावें तिला बांधलें नी तें धरून एक गोसेवागीत म्हणत त्या घोळक्यासह ते रस्त्यानें चालले.

जें त्याचें मूळचें नांव गोपाळराव, तें ते त्या गोरक्षणसंस्थेंत होते तोंवर वापरीत असत. पण त्या संस्थेंतून ते जेव्हां फूटून निघाले तेव्हां त्या संस्थेविषयीं त्यांनीं जे आक्षेप आणले त्यांत हाहि अेक आक्षेप होता कीं, कोणच्याहि हिंदुसंस्थेनें गोरक्षणसंस्था म्हणविणें म्हणजे हिंदुधर्मासि कलंक लावणें होय. कारण गाय ही हिंदूंची देवता. तिचें पूजन, सेवन, भजन करणें हें हिंदूंचें कर्तव्य! पण स्वतःस गोरक्षणकर्ता म्हणवणें म्हणजे देवतेचें रक्षण मनुष्य करतो, असा विपरीत भाव प्रगटवून त्या देवतेची थोरवी नी शक्ति मनुष्याहूनहि कमी लेखणें होय; त्या देवतेची निंदा होय! गाय ही देवता— मनुष्य तिचें रक्षण करणारा, तिचें पालन करणारा, तिच्याहून कोणी महादेव आहे कीं काय? मनुष्यानें 'मी गाईची सेवा करतों' असें म्हणणें शोभेल. 'गाईचें रक्षण करतों' असें म्हणणें म्हणजे देव दुर्बळ नी भक्त सबळ असें म्हणण्यासारखें होतें. यासाठीं साऱ्या गोविषयक हिंदु संस्थांनीं गोरक्षणसंस्था हें नांव टाकून गोपूजक वा गोसेवकसंस्था असें म्हणवावें आणि प्रत्येक कार्यकर्त्यानें स्वतःस गोदास, गोभक्त, गोरज अित्यादि गायीची थोरवी व्यक्तविणारीं नांवें घ्यावीं. गोपाळ हें नांव श्रीकृष्णास शोभलें कारण तो गो-देवतेहूनहि श्रेष्ठ असा जो जगाचा पालक त्या परमेश्वराचाच तो अवतार होता; पण मनुष्यानें स्वतःस गोदेवीचे, या 'विश्वजननी'चे पालक वा रक्षक म्हणवून घेणें म्हणजे काय? असें सावेश प्रति-पादीत गोपाळराव सुखे यांनीं भरसभेंत आपलें मूळचें गोपाळ हें नांव टाकून गोदास सुखे हें नांव घेतलें हातें.

००० ००० ०००

त्या धर्मशाळेपुढें त्या गाईचा हा गौरव चाललेला असतांना त्या पडवीवजा धर्मशाळेच्या आंत समोरच एक पंचवीस वर्षांची बाअी लक्तरें कमरेस गुंडाळलेली, जवळ एक चिंध्यांचें बोंचकें, अेकदोन खापराचीं भांडीं, तोंड अगदीं रडकुंडी झालेलें— कोणीं दुरून पाहिलें,

कीं चटकन् तोंड फिरवून घेणारी अशी-अगदीं त्या गायीसारखी केंविलवाणी होऊन अेका कोपऱ्यांत बसली होती. गायीची दया येऊन गोदास सुखे कळकळतांना आणि स्वहस्तें त्या गायीस वारंवार कुरवाळतांना पाहून तिला दहादां वाटलें कीं, या दयाळु पुरुषापाशीं जाऊन आपणहि हात पसरावा. पण ती समाजाला भीत होती. त्या गांवांतील कांहीं लोकांना ती गेल्या महिनाभर भीक मागत असतां माहीत झाली असून ती बाळंतपणास टेकलेली दिसत असल्या-मुळें तिच्याविषयीं भल्याबुऱ्या गोष्टीहि गांवअड्ड्यावर दबून दबून लोक बोलत आणि तिला घरापुढेंहि बसूं न देतां शिव्या देऊन हुसकून देत. म्हणून ती दबून बसली होती. पण त्या नव्या गो-सेवक बुवांच्या दयाशीलतेचा आसरा त्या जख्खड गायीसदेखील मिळाला— गायीहून गाय झालेल्या मला तर मिळेलच मिळेल ! अशी योग्य अटकळ बांधून त्या गायीची मिरवणूक चालली असतां लटपटत्या पायांनीं ती आसन्नप्रसव स्त्री बुवा थोडे रस्त्याच्या कडेस झालेले पहातांच त्यांच्यापुढें पदर पसरून उभी राहिली.

" मी चार दिवसांची भुकी ! बाळंतपणास टेकलें आहें ! मला दोन पैसे– !"

तिचें तें वाक्य पुरें होण्याच्या आधींच बुवा चवताळले,

" भिकारडे, ह्या गोमातांच्या भुकेलाच पुरेसे पैसे जमत नाहींत; तिथें तूं माणसासारखें माणूस—जा, काबाडकष्ट कर नी पोट भर ! गायीच्या तोंडचा घास हिसडून स्वत:च्या पोटाची खळगी भरण्यास तुला लाज वाटत नाहीं ? माणुसकी आहे कीं नाहीं तुला ? अहो, आपल्या देशाचे कोटयवधि रुपये ह्या अंदी भिकाऱ्यांस पोसण्यास मातीस मिळतात. आणि या बिचाऱ्या जख्खड गोमाता भुकेनें तडफडत राहतात."

अितक्यांत बुवांच्या कानाशीं अेकानें त्या स्त्रीच्या पोटाकडे बोट दाखवून कागाळी केली. त्यासरशीं सात्त्विक संतापानें उसळून बुवा ओरडले,

"हुसका तिला ! अस्सें काय ? काळतोंडी !" असे हातवारे करीत लोक गात असलेल्या पदाच्या पालुपदाची वेळ आलेली पाहून बोवांनीं आपल्या उंच घोगऱ्या आवाजाचीहि त्या पालुपदांत भर टाकली,

"गायीस द्याच भिक्षा। ह्या हिंदुधर्म रक्षा॥"

दोघांचौघांनीं तेवढ्यांत त्या बायीची चेष्टाहि चालविली. पण अितक्यांत रामभाऊ वैद्य तेथें आले आणि लोकांस तसें न करण्याविषयीं सांगून बायीस आश्वासीत विचारूं लागले, "तूं कुठली बाई ? सासरमाहेरचें कोणी नाहीं का तुला ?" रामभाऊ तिच्याशीं हें विचारतात न विचारतात तोंच त्यांच्या दहापांच स्नेह्यांनीं हात ओढीत एकच गोंगाट केला, "हां ! हां ! रामभाऊ, तिच्याशीं काय बोलतां ? तुमच्यासारख्या प्रतिष्ठित माणसावर नसतें किटाळ येईल. पुढें चला–चला–आम्ही सांगतों सारें !"

"गायीस द्याच भिक्षा। ह्या हिंदुधर्म रक्षा।।" ह्या पालुपदानें सारा रस्ता दुमदुमीत नी येत्याजात्यास अडवून पै-पैसा काढीत, त्या जलूखड गायीची मिरवणूक पुढें चालली.

००० ००० ०००

समोरून अेक भारेवाली हिरव्यागार गवताचा भारा घेऊन येत होती. वाटेच्या अगदीं कडेनें ती चालली होती कीं त्या गायीच्या मिरवणुकीची वाट अडूं नये ! गोदास मुख्यांचें लक्ष त्या गायीच्या आधींच त्या हिरव्या भाऱ्याकडे गेलें. त्यांनीं खूण करतांच दोघांचौघांनीं बाअीस अडवून 'भारा टाक' म्हणून दरडावलें. 'पैसे कोण देणार ?' हें तिनें विचारतांच अेकदम गलका उठला, "गोग्रास गाय आहे ही ! धर्माच्या गायीच्या गवताचे पैसे मागतेस काय ?"

" पण मग घरच्या मुलांलेकरांना तांदूळ कशाचे नेऊं दादा ! खातील काय ती आज ?"

" आणि ही गोमाता काय खाईल ! गोदेवीच्या नांवें लेंकरांना उपास करूं देत आजची रात्र ! स्वर्गांत तुला कामधेनू मिळेल ?" बुवांनीं समाधान केलें

" बघतां काय ? घ्या तो भारा तिचा !" असें म्हणत दोघें-तिघें भारा ओढूं लागले. तेव्हां तिला आपला बचाव करण्याची शेवटची युक्ति सुचून ती म्हणाली " हां, हां ! मी म्हारीण ! विटाळाल ! दूर व्हा ! "–

तों तिच्या अटकळीचा परिणाम अगदीं उलट झाला. झोंबून भारा ओढणारे ते लोक चेकाळले आणि तिच्या तोंडांत देऊन ओर-डले, " तुझी पहिल्यानें दांतखिळ बसली होती काय ? चांडाळणी ! विटाळ झाला ना आम्हांला ? "

तिला सोडविण्यास रामभाऊ धांवत आले. समाजास गोंजा-रून म्हणाले, " त्या गायीसारख्या अेका पशूला मघांचे कुरवाळतां आहां– आणि महार माणूस असतां, त्याचा विटाळ मानतां ? ही काय भूतदया कीं धर्म ?"

हें अैकतांच बुवा चिडले, " अहो दीडशहाणे, गायीला पशु म्हणतांना तुमची जिव्हा झडत कशी नाहीं ? गाय पशु असली तरी देव विश्वव्यापी; पशूंत नाहीं कीं काय ? "

बुवास शांतविण्यासाठीं रामभाऊ त्यांच्या पाठीवर हळू हातच फिरवीत म्हणाले, " तर मग जो विश्वव्यापी देव पशूंत देखील आहे, तो माणसांत नाहीं काय ? आणि महार माणूस नाहीं काय ? "

ह्या प्रश्नापेक्षां रामभाऊ महाराच्या स्पर्शानें विटाळले असतां आपल्यास शिवून आपणासहि विटाळवीत आहेत, याचाच जास्त



बिचारी म्हातारी गाय ! आओीसारखी पूज्य ! ....तिची जोपासना करण्याचा अेकजण तरी प्रयत्न करतो आहे का ?

संताप आल्यासारखें करून, त्या बिनतोड प्रश्नानें झालेली धांदल बुवांनीं लपविली. त्या प्रश्नाकडून लोकांचेंहि लक्ष काढून, लोकांस पटणारी विटाळाचीच बाजू पुढें धरावी म्हणून बुवा रामभाऊचा हात हिसडून गर्जले, "भंगी आहांत भंगी! महाराला म्हणे शिवा! शिव शिव! कोण पाखंड!" लगेच बुवांनीं गायीचें शेंपूट डोळ्यावर फिरविलें आणि त्या पशूच्या खुराखालची मूठभर माती – तें पावक गोरज, समाजाच्या अंगावर फेंकून स्वतः तो अंगारा लावून त्या महार माणसाच्या झालेल्या विटाळाचें तात्पुरतें प्रायश्चित्त केलें. गायीच्या तोंडांत त्या हिरव्या गवताचे जुडग्यावर जुडगे स्वहस्तें चारीत मिरवणूक पुढें चालली, "गायीस द्याच भिक्षा। हा हिंदुधर्म रक्षा॥"

वाटेंत मुसलमान मिरवणुकींत सगळ्यांस खेटत येतजात होते– कांहीं फिदीफिदी हंसून टवाळी करीत होते. त्यांचा विटाळ कुणाला झाला नाहीं, त्यांच्या वाटेस कुणी गेलें नाहीं.

थोड्या वेळानें ते गोदासबुवा ज्या अेका गोभक्त बाईच्या घरीं उतरले होते त्या घराशीं आले. त्या बाअींचा मुलगा घरचा कर्ता, हिंदु संघटनाचा अभिमानी पण बुद्धिवादी ( Rationalist ) तरुण वकील. आअीच्या भिडेनें त्यानें गोदासबुवांना घरींच उतरविलें होतें. दाराशीं मिरवणूक येतांच बुवांनीं वकिलास आज्ञा सोडली कीं, त्या गायीला त्यांनीं घरीं पाळावी. वकील हंसून म्हणाले, "अहो, आमच्या घरास गोठा नाहीं, आंगण नाहीं; तुम्हां गोसेवकांना बंगल्यांत उतरविलें तेथेंच गायीला बांधतों पाहिजे तर. त्या गायीला थोडें गवत घेऊन देतों– त्या मोकळ्या मैदानांतील झाडाला बांधीत जा हवें तर!"

अितक्यांत त्यांची आअी बाहेर आली. बुवांनीं कथा सांगतांच मुलावर रागावली नी म्हणाली, "घराशीं चालत आलेली लक्ष्मी विन्मुख दवडायची? आजची रात्र तरी घरींच बांधायची तिला!

या ओसरीवर अगदीं घरांत बांधा, उचला त्या बैठकी ! तुझी वकिली बंगल्यांत, खालीं सत्ता माझी ! बाअीच्या आज्ञेसरशीं वकील हंसून चूप उभे राहिले.

गायीला वर आणली; गाद्या, बैठकी, खुर्च्या काढून ओटीचा गोठा केला, बाअींनीं घरांतून ताम्हनांत आरति आणली, त्या :मळ-मातीनें बरबटलेल्या गायीस हळदकुंकू लावून फुलें वाहून; ओंवाळून, संतोषून वकिलास म्हणाल्या, " तेतीस कोटी देवांची पूजा अेकत्रच करायची तर बाळ, गायीची पूजा करावी ! "

बुवा ठरीव गोसेवक ठेक्यांत म्हणाले, " सर्वां भूतीं परमेश्वर आहे ! ही आमच्या हिंदुधर्माची अत्युदार शिकवण अंगीं बाणण्या-साठींच पाहिलीत ना गोपूजा हीच कशी अुत्कृष्ट साधन आहे ती ? पशु नी माणूस ह्यांचें आत्मैक्य ! भूतदयेची परिसीमा ! "

दोनतीन दिवस ती गाय तेथेंच होती. गोभक्तबाअीचें हें धर्म-कृत्य पाहून जो तो 'धन्य' म्हणत होता. शेजारपाजारच्या बायांनीं कुणीं फुलें आणून वाहिलीं, कुणीं पक्वान्नें, चटण्या, भाज्या, खीर, तूप यथास्थान वाढलेलीं पानें नैवेद्य म्हणून त्या गायीपुढें ठेवलीं. शेजारची एक बापडी बायी—मुलें माधुकरी; पण तिनें कानवल्याच्या गोग्रासाचें व्रत घेऊन नऊ कानवले गुळाचे करावे, आठ त्या गायीला सोंवळ्यानें येऊन चारावे नी अेक पोटच्या माधुकरी मुलांना द्यावा !—गायीचा प्रसाद म्हणून !

अशा बडेजावांत तीन दिवस गेल्यावर त्या गायीस अेका शेट-जींनीं भक्तिभरानें जेव्हां आपल्या घरीं पाळावयास नेलीं, तेव्हां दहापांच अितर भाविक मंडळींची तिला पाळावयास नेण्याची इच्छा पुरली नाहीं म्हणून निराशा झाली.

००० ००० ०००

तिकडे त्या धर्मशाळेंत—? त्या मिरवणुकींत धक्काबुक्की करून लोकांनीं हुसकून दिलेली ती बाळंतपणास टेकलेली हिंदु स्त्री त्या धर्मशाळेंत जाऊन त्याच कोंपऱ्यांत तोंड खुपसून रडत बसली. रात्रीं तिच्या पोटांत भयंकर वेदना होऊं लागल्या. तें कण्हणें वाटेवरील दोघांचौघां हिंदूंनीं अैकलें, धर्मशाळेंत काय तें बघण्यास ते गेले, पण अेक बाअी रडतकडत पडलेली पाहून "आहे झालं कुठली तरी ब्याद !" म्हणून तिटकारीत निघून गेले. अेकदोघांनीं तिला ओळखलें. ते तर तिच्या बाळंतपणाचें लफडें आपल्या अंगाशीं चिकटतें कीं काय अशा शंकेनें "मरूं द्यात ! अहो ती–ती आहे ! भोगील पापांचीं फळें ! आम्हाला काय त्याचें !" असें आपसांत कुजबुजत तेथून सटकले.

रात्रीं काळोख, डोळ्यांत बोट घातलें तरी दिसेना असा, त्या काळोखांत त्या कोंपऱ्यांत ती बाई बाळंत झाली. तिनें चिंध्यांचा काकडा अेक बाळगलेला असे तो पेटवला. मूल पाहिलें, तें जिवंत ! नाळ कापायला कांहीं नव्हतें. दोन धारेचे दगड तिनें कोंपऱ्यांतल्या ढिगाऱ्यांतून घेतले नी आडवीतिडवी नाळ कापली. मूल किंचाळूं लागलें तरी लपेटून ठेवून पहांटे ती अेकटीच गेली आणि जवळच्या नदीवर स्नान करून आली !

आपत्तीच कधीं कधीं आरोग्यप्रद असते, रामबाण औषध होतें ! न बाज, न सुअीण, न शांतिपाठ, न शेक, न पाळणा ! बाळंतपणाची कोण आकुल शुश्रूषा असावयाची ! पण तें कांहीं नसतां तें मूल नी ती बाअी जिवंत राहिली. लोक येतांजातां हंसून बघत. शाळेंतलीं वा भटकतीं मुलें मात्र कधीं जवळ येत, गंमत पाहून जात, पण सभ्य गृहस्थ असा कुणीहि ढुंकला नाहीं. धर्मात्मा, भट, गोसेवक, साधु, ब्राह्मण, पाटील, शेटजी, तिकडे कुणीहि ढुंकला नाहीं ! ती गाय थोडीच व्यालेली होती कीं तिची सेवा "हिंदु धर्म रक्षावया"-साठीं आवश्यक असावी ? –ती अेक परित्यक्ता हिंदु स्त्री नी तें एक

अनाथ हिंदु बेवारशी कारटें ! त्यांच्या रक्षणाशीं "हिंदु धर्म रक्षा"-वयाचा काय संबंध ! उलट त्यांची विचारपूस करणेंदेखील पाप, असभ्यता ! ! म्हणून तिकडे कोणी ढुंकला नाहीं ! अड्ड्याअड्ड्यावर टवाळी मात्र मधून मधून विचारी दांत विचकून स्नेह्यासोबत्यांत, " कां ? धर्मशाळेंतल्या चिरंजिवासाठीं पेढे कोण वाटणार ? तुम्ही कीं काय ?"

पण रात्रीं आठनऊ वाजण्याच्या सुमारास अेक मनुष्य मात्र तिन्ही दिवस तिथें जाऊन येअी. त्या बायीपाशीं कांहीं संबंध असला तर त्याचाच !

कोण तो ? कुणी साधु ? कुणी डॉक्टर ? अर्धरात चोरून कां जातो असा ?

००० ००० ०००

टवाळीच्या अेका विषयापेक्षां त्या बाअीची अधिक चुटपुट जर कोणास लागली असेल तर ती अेका रामभाऊ वैद्यांना होती. त्या मिरवणुकींत बाअीशीं बोलतांना त्यांना हात धरून ज्या स्नेह्यांनीं हिसडलें, त्यांच्या व अितरांच्या तोंडून त्यांनीं अितकें अैकलें होतें कीं, ती बाअी लहान असतां तिचा नवरा मुंबअीस बेपत्ता झाला. गेलीं पांचअेक वर्षें ती शेजारच्या खेडेगांवीं अेका मराठा पाटलाच्या घरीं काबाडकष्ट करून असे. तिला दिवस लोटल्याचें दिसतांच त्या खेडेगांवांत हिंदुसमाजानें जातीचा प्रश्न काढला. पाटलानें तिला हुसकून दिली. मूल पाटलाचें असें ती म्हणते. मारहाण झाल्यामुळें खेडेगांव सोडून आली आणि मोठ्या गांवीं धर्मशाळेंत येऊन बसली— त्या गाअीसारखीच मट्कन् ! हें अैकल्यापासून रामभाऊस तिची दया आली. आणखी अेक भीति त्यांना वाटली कीं, न जाणो, शेजारच्या मिशनबिशनच्या जाळ्यांत तर ती फसणार नाहीं ना ? ते तिला पाहण्यास जाण्याचें मनांत आणीत, पण त्यांना देखील तें

साहस करण्यअितकी धमक मनांत येण्यास तीन दिवस लागले. शेवटीं समाज काय वाटेल तें म्हणो, तिची चौकशी अेकदां करायचीच असें निर्धारून दोन तरुण विद्यार्थी बरोबर घेऊन ते भर दिवसां अेका दुपारीं धर्मशाळेंत गेले. बाअीपाशीं थोडें शिळेंपाकें अन्न होतें. त्यांनीं गोड बोलून तिची माहिती विचारली. तों त्यांना कळलें कीं, तिला जो अेकच मनुष्य रात्रीं येऊन भेटतो, थोडें अन्न देतो, अेकदोन फाटकीं वस्त्रेंहि ज्यानें दिलीं, तो दुसरा कोणी नसून होता– त्या गांवचा अेक मुसलमान भंगी !

तो काय तिची दया येऊन भूतदयेसाठीं तें दान देई ? कांहीं-अेक प्रतिमूल्य घेतल्यावांचून तो तें धर्मकृत्य करी ? भुकेल्याला अन्न देणें हें धर्मकृत्य तो मानी म्हणून तो अन्न देत नसे, तर काफरास बाटविणें धर्मकृत्य होतें. अशी त्याची समज असल्यानें तो तें अन्न त्या बाअीस देअी नी सांगे, “बघ ! तूं हिंदु, मुसलमानाचें खातेस; आतां हिंदु राहिली नाहींस हं !” आणि त्या अन्नाचें प्रतिमूल्य म्हणून त्या बाअीस त्यानें सांगितलें होतें, “तें मूल मला दिलें पाहिजे अं मीं मागतांच ? नाहींतर ?– ठार मारीन ठार !!”

रामभाऊंना ती हकीगत सांगत असतांच ती थरथर कांपत होती– नाहींतर तो मुसलमान भंगी येऊन तिला नी त्यांना पण ठार करील ! रामभाऊंनीं तिला धीर दिला, “जर तुला आम्हीं सर्व सहाय्य दिलें तर तूं त्या मुसलमानाचें अन्न घेणार नाहींस ना ? मूल देणार नाहींस ना ? तूं हिंदुधर्माच्या रक्ताबीजाची ना ?” तिच्याहि अंगीं आवेश येत होता, पण झटकन् हताश होऊन ती म्हणाली, “पण आतां काय त्याचें ? मीं मुसलमाच्या हातचें खाल्लें आहे ! कोणता हिंदु मला जातींत घेअील ? माझें मूल विनजात ! तें हिंदु कसें राहील ?”

“राहील ! ती चिंता तुला नको. मी रत्नागिरी हिंदुसभेचा या गांवचा अेक कार्यकर्ता आहें. आम्ही तुला जातींत घेअूं. प्रत्यहीं

मी तुला अन्न नी मुलास दूध देअीन ! पोलिसांना सांगून त्या मुसलमानास पायबंद घालीन. हे घे थोडे पैसे. अन्न नी दूध आतांच धाडून देतों !"

कोण्या हिंदूच्या तोंडून असे शब्द अैकण्याचा तिला पहिलाच प्रसंग ! तिलासुद्धां मुसलमानाचें खाल्ल्यावर मनुष्य हिंदू राहतो कसा तें पटेना. पण सहाय्य मिळतें तें पाहून ती चूप राहिली. रामभाअूंच्या पायावर तिनें मूल ठेविलें. " माझा धर्म वांचवणारा तूं देवच भेटलास ! पण मला धर्मशाळेंतून प्रथम घरीं न्या. नाहींतर तो मुसलमान मला खाअून टाकील ! घरीं न्याल तर तुमच्या शब्दावर विश्वास !!"

रामभाअू परत आले. थोडें अन्न नी दूध त्यांनीं तिला पोंचविलें; पण तें नेण्यास त्या साऱ्या गांवांत अेकदोन तरुणच काय ते धजले, बाकी ज्याला रामभाअू विचारीत त्यानें त्यानें अुलट "बाटगा ! लुच्चा ! याचा तर नसेल कांहीं संबंध त्या बाअीशीं ?" असें म्हणून रामभाअूंची पाठ फिरतांच कुटाळकी करण्यास सोडूं नये !

रामभाऊ स्वतः भाड्याच्या घरीं रहात. त्यांनीं त्या बाटलेल्या बाअीस कोणाच्या तरी घरीं आणण्याचा योजलेला बेत अैकतांच आगाऊच सावध राहावें म्हणून घरधन्यानें सांगितलें, " आधींच तुम्ही महारांस शिवून येऊन घरांत विटाळ कालवितां म्हणून कागाळ्या होतात. आतां मुसलमानाचें खाल्लेल्या त्या भटक्या बाईची ब्याद जर आणणार असाल, तर घर सोडून चालते व्हावें लागेल. बाहेर काय नंगा नाच घालायचा तो घाला, आम्हांस उपद्रव नको !"

रामभाअू म्हणाले, " मी आणीत नाहीं त्या बाअीस बळेंबळें तुमच्या घरीं. पण ती गाय पाळावयास मागत होतां तीहि भटकीच नव्हती का ? मुसलमानांच्या हातचें तीहि खाअीच ना ?"

" पण तो पशु होता, पशुधर्म तो ...."

" हाय हाय ! तर मग हें समजत असूनहि त्या पशूस गोठ्यांत ठेवतां, सोंवळ्यानें पूजतां, तिचे गोमूत्र पिऊन तिला पक्वान्नाचे गोग्रास स्वहस्तें घालतां ! मग ही हिंदु बाओी तर माणूस, मूल मराठ्याचे, माणसाचा जीव तो, त्याला मुसलमानांच्या हातून सोडवून हिंदूनें घरीं आणून दोन घांस–" रामभाऊंनीं वाक्य पुरें करण्याच्या आधींच घरधन्यांनीं त्यांचें तोंड बंद केलें.

" पूर्वीचे ऋषि गाढव नी तुम्ही शहाणे ! कुठें ती कुलटा नी तें बिनवारशी कारटें, कुठें ते महारडे– आणि कुठें ती विश्वजननी पवित्र गायत्री ! गोमाता ! होअूं द्या मुसलमान तिला ! अशा कुलटा मुसलमानांत गेलेल्याच बऱ्या !"

" अशाच हिंदूंतून हिसडलेल्या स्त्रियांच्या पोटीं हिंदूचे कट्टर शत्रु जन्मले ! आणि हें मूल ? मुसलमान होतांच अठरा वर्षांच्या आंत ह्याच गायत्रीस मारणारा अेक कसाअी होअील ! त्याचा वंशचा वंश गोमांस खाणारा–गोघ्न होअील ! गोभक्तांची संख्या घटून गोघ्नांची वाढेल ! तेव्हां गोसेवेच्या दृष्टीनें देखील ..."

" पुरें करा तें ब्रम्हज्ञान ! मला माझें घर बाटवून घ्यावयाचें नाहीं ! बस्स !"

रामभाऊ त्या गांवीं शेटजींच्या, भटांच्या मराठा-पाटलांच्या शक्य त्या त्या घरीं हिंडले. ती मरतुकडी गाय पाळावयास सिद्ध झालेल्या भूतदयावान् लोकांपैकीं सुद्धां कुणीच त्या बाअीस आश्रय देअीना, गोठ्यांत देखील राहूं देअीना ! मग इतरांची गोष्टच बोलणें नको !

००० ००० ०००

तो गांव बारा हजार हिंदु वस्तीचा. मुसलमानांची वसति तीनशें माणसांची असेल नसेल. ह्या बारा हजार हिंदूंस त्यांच्या धर्माची अेक स्त्री नी अेक मूल परधर्मांत जात आहे याची रेसभर

चिंता नव्हती ! अेक घर, अंगण, गायीला मिळणारा गोठा देखील कोणी त्या बाळंत बाअीला देअीना ! त्या तीनशें मुसलमानांतील बायादेखील त्या "काफर" स्त्रीला नी मुलाला अिस्लाम धर्मांत कसें ओढून, बळानें देखील पळवून, आणतां येअील, याचा कट करीत होत्या. आपल्या गोषांत देखील वेळीं तिला लपवून ठेवूं म्हणून आपण होऊन त्या कटास पाठिंबीत होत्या.

तिकडे त्या धर्मशाळेंत-- तो मुसलमान भंगी, रामभाअूनीं अन्न दिलें त्याची गुणगुण कळली म्हणून लगोलग संध्याकाळ होते न होते तों तिथें आला. बाअीनें माहिती सांगतांच तें पोर हिसकूं लागला. बाअी ओरडूं लागली. अेकदोन करतांकरतां वीसपंचवीस हिंदु तिथें जमले, पण दूर ! त्या मुसलमानानें "काफरांस" "काफरांच्या धर्मास" शिव्यांची लाखोली वाहिली; त्या बाअीस "मूल देत नाहींस तर टाक माझी चीजवस्त" म्हणून दरडावलें. तिचें चिध्यांचें गांठोडें नी मुलावरचा लुगड्याचा तुकडादेखील त्यानें हिसकला. मूल अुघडेंवाघडें घेऊन ती बाअी कोपऱ्यांत फुंदून फुंदून रडत हिंदूंकडे बघत होती कीं, कुणीं पुढें यावें ! पण कुणी पुढें होअीना ! मुसलमानानें ते कपडे घेतले, धर्मशाळेसमोर भर वाटेवर त्यांस आग लावली आणि "कोण तुला कपडा नी खाणें देतो तें बघून घेअीन ! मी रात्रीं पुन्हां येअीन ! त्याला नी तुला ठार करीन !" अशा धमक्या देत त्या होळीपाशीं ठाण मांडून राहिला !

त्या दाटींत ते गोदासबुवाहि थोडा वेळ अुभे होते. त्याच धर्मशाळेसमोर मटकन् बसलेल्या गायीच्या पाठीवर एक छडी कुणीं मारली ती अैकून त्यांचें हृदय पिळवटलें होतें; पण ह्या बाअीस तो दुष्ट छळतांना पाहून त्यांनीं हूं कां चूं न करतां "असले प्रकार आपल्यासारख्या सभ्याच्या दृष्टिक्षेपांत घेण्याच्या योग्यतेचे नव्हत" अशा अैटीनें ते लगेच वाटेनें पुढें गेले. संकटांतून सोडविण्यास ती कुणी जल्खड गाय थोडीच होती ! ती अेक जातिबाह्य हिंदु बाळंत बाअी नी तिचें तें तीनचार दिवसांचें बिनवारशी मूल !

त्या एका मुसलमानास जाणीव होती कीं, तो एकटा तिथें असला तरी मुसलमान तितका त्याच्या मागें होता. तिथें असलेल्या प्रत्येक हिंदूसहि तीच जाणीव होती. आणखी अेक ही जाणीव होती कीं, आपल्यामागें हिंदुसमाज असा नाहींच, आपण खरोखरच अेकअेकटे आहों! तेवढ्यांत अितकें मात्र कोणीं साहस केलें, कीं धांवत जाअून रामभाअूस ती बातमी दिली. रामभाअूंनीं पोलिसांस दिली आणि अेक पोलिस त्या वाटेकडे येतांना दुरून दिसतांच त्या भंगी मिय्यासाहेबांचा धर्मोन्माद उतरून ते तेथून पाय काढते झाले!

तरीहि ह्या बाअीस त्या धर्मशाळेंत अेक मिनिटभरहि ठेवणें धोक्याचें आहे असें रामभाअूंना वाटलें. पण तिला नेणार कुठें? गांवांत कोणी गोठासुद्धां देईना! म्हणून त्यांनीं रत्नागिरी हिंदुसभेस तार केली.

पण रात्रीं मध्यंतरीं हालवून तिला लगेच कुठें ठेवायची? ते तरुण वकील रामभाअूंचे सहकारी. त्यांनाच शेवटीं रामभाअूंनीं अगदीं गळ घातली. त्यांची आअी, किती दयाळु देवलसी गोभक्त वृद्ध आअी! त्या दीन गायीची देखील त्या दिवशीं तिला किती हळहळ वाटली! मग ही बाअी तर माणूस, त्यांत अेक बाळंतीण स्त्री, छातीशीं तीन दिवसांचें पितें मूल घेअून येणार! तिला दया आलीच पाहिजे. ‘थोडें नाकतोंड मुरडलेंच तरी आमची आअी नको म्हणणार नाहीं. घेअून या त्या बाअीस आजची रात्र! उद्यां मात्र ताबडतोब मोटारीनें रत्नागिरीस धाडली पाहिजे हं!’ त्या तरुण वकिलांनीं पाठबळ देतांच रामभाऊ त्या बाअीला नी मुलाला मोठ्या प्रयासानें त्या दोघां तरुण शिष्यांच्या सहाय्यानें रातोरात घेऊन आले—

तों घरांत तरुण वकिलांच्या आअीचें रागारागानें चाललेलें बोलणें त्यांनीं अकिलें. दार उघडण्यास ते वकील धजेनात.

रामभाऊंनींहि जोराजोरानें दार खडखडविण्यास आरंभलें. शेवटीं वकिलांनीं दार उघडलें–दिवा बाहेर केला. ती बाओी थरथर कांपत, तें मूल छातीशीं धरून पाजत पायरीवर बसली आहे, उठत आहे; तोंच वकिलांची ती गोभक्त आओी धांवतच ओसरीवर आली; त्या बाळंत बाओीस तिनें पाहिलें नी मोठ्यानें किंचाळी फोडून म्हणाली, "कुठली मेली अवदसा ही! नी तें कारटें! ना जात ना पात! तिला आंत घेऊन घर बाटवशील तर ही मी घराबाहेर पडतें. पुन्हा पाणी घेणार नाहीं या घरांत!" स्वभावानें त्या वृद्ध बाओी दयाळू होत्या –पण पोथी! पोथीनें त्यांच्या दयेला जी आरशी लावली त्यांतूनच त्या बघणार!

गोदासबुवाहि तिथेंच उतरलेले. त्यांना हात जोडून रामभाऊ म्हणाले, "वकिलांच्या आओीस थोडे समजावा ना!" कपाळास आंठ्या घालून ताठ्यानें गोदासबुवा गरजले, "आम्ही गोदास, वर्णाश्रमधर्माचे अभिमानी! तुम्ही लोक सब गोलंकार करूं पाहतां! महारांमांगांना शिवतां! या कुलटा बाया तुमचीं प्रेमपात्रें! मुसलमानाच्या हातचें तिनें खाल्लेलें, तिला म्हणे हिंदु म्हणा! अशा पतितेला ह्या कुलीन सदाचारी ब्राह्मण कुटुंबाच्या घरांत घेण्यास मी संमति देअूं? ती कोणी गायत्री गोमाता आहे कीं काय तिच्या पदरजांनीं हें कुल पवित्रविण्यास?"

वकील बहुतेक हिंदु (Rationalish) बुद्धिवाद्यांप्रमाणें कृतीचे पंगु! अिच्छा असून आओीस बाजूस सारण्यास धजेनात! अितक्यांत तो गोंधळ, तें मुलाचें रडणें, बाओीचें फुंदणें अैकून शेजारीपाजारी वाणीब्राह्मण बायामाणसें आलीं! "भ्रष्टाकार! या बाटग्या वकिलास वाळींत टाकलें पाहिजे, विहीर बंद करा उद्यांपासून" जो तो धिक्कारूं लागला. वकील गांगारले. "साह्यार्थ पैसे देतों, पण बाओीस परत न्या" म्हणाले!

शेवटीं एका चौकाच्या कोंपऱ्यांतील दुकानाच्या फळीवर अेका दुकानदारानें त्या बाअीस रात्रभर निजूं देण्याचें औदार्य दाखविलें. रामभाअूंनीं पहारा दिला. सकाळीं रत्नागिरीची मोटार सुटतांच त्या बाअीस नी मुलाला घेअून रामभाअूंनीं रत्नागिरीस हिंदुसभेकडे पोंचविली.

रत्नागिरीस पाय टाकतांच त्या बाअीच्या नी मुलाच्या पायांतील स्पर्शबंदीच्या, जातबंदीच्या, शुद्धिबंदीच्या, रोटीबंदीच्या बेड्या आपोआप तडातड तुटून गळून गेल्या. "मुसलमानाच्या हातचें खाल्लें ? ह्यात्तिच्या, त्यांत काय झालें ? धर्माचें स्थान हृदय; पोट नव्हे ! जात रक्तांत नी बीजांत असते, भाताच्या तपेल्यांत नव्हे. संघटनस्मृतीचें राज्य झालेल्या हिंदुत्वाभिमानी रत्नागिरींत तिच्या भोंवतीं जमलेल्या हिंदु मंडळींत असें म्हणत जो तो तिला धीर देऊं लागला. अखिलहिंदु उपहारगृहांत ब्राम्हणवाणीमराठा मंडळी जी त्या वेळीं होती त्यांनीं, ज्या बांकावर ती होती, त्याच्याच सलग बांकावर बसून हेतुतः उपहार केला. पतितपावनाच्या सभामंडपांत नेअून मूल देवापुढें ठेवलें. सभ्य कुटुंबांतील येत्याजात्या स्त्रियांनीं लुगडीं देऊन, साबण देअून, औषधें देअून, धीर देअून तिला अगदीं घरासारखें वागविलें. ब्राम्हणादिक स्त्रियांनीं तिला पंगतीस घेतलें. दोन दिवसांत तिला चारपांच कुटुंबांतून पाळण्यासाठीं मागण्या आल्या. सध्यां अेका प्रतिष्ठित मराठा कुटुंबांतील हिंदु संघटनाभिमानी महिलेनें तिला नी त्या मुलाला पाळलेलें आहे !

[या गोष्टींतील प्रकार डोळे उघडून पाहाणाऱ्याच्या अनुभवास पदोपदीं येत असतीलच; पण या गोष्टीस आधार म्हणून सांगतों कीं, "देव सर्वव्यापी, पशूंतहि नाहीं काय ?" म्हणून विचारणारे अनेक पुढारी गोभक्त गाअीस सोंवळ्यानें पूजणारे पण महाराच्या सांवलीचा विटाळ मानतात. आणि स्वहस्तें गाअीस गोग्रास चारणारी

मंडळीं शुद्धिकृत ब्राम्हणासहि आपल्या घरीं जेवणास घेत नाहींत. हें जें वारंवार आम्हांस आढळतें तो अेक आधार; आणि अलिकडेच अशा संकटांत सांपडलेल्या अेका स्त्रीस अेका मुसलमान भंग्यानें अशी जाळपोळ करून मुलास हिसकून नेण्याचा धाक दाखविला असतां त्या बाळंत परित्यक्ता हिंदु स्त्रीस त्या मोठ्या गांवीं अंगणांतहि कुणी ठेवीना म्हणून रत्नागिरी हिंदुसभेकडे धाडण्यांत आलें, हा आधार दुसरा ! ह्या वास्तविक अनुभवांची विणलेली ही गोष्ट कथा असली तरी सामान्यतः सत्यच म्हणावयास नको काय ? ]

✠ ✠ ✠

# शेंदाडपूरचा शिवाजी-अुत्सव

गेल्या पंधरवड्यांत नागूजीरावांच्या जिवाची अेकच तारांबळ अुडालेली होती! कारण त्यांच्या वास्तव्यानें पावनलेल्या शेंदाडपुरांत ह्या वर्षापासून शिवाजी-अुत्सव प्रथमच चालू करण्याचा बेत ठरला होता.

महाराष्ट्रांतल्या अनेक नगरांतून जरी शिवाजी-अुत्सव गेल्या पंचवीस वर्षांपूर्वींपासून होत आला असला, तरी शेंदाडपूरच्या नागरिकांनीं आजवर त्याच्याकडे जी पाठ फिरवलेली होती ती कांहीं त्यांना त्या अुत्सवाला तोंड देण्याची छाती नव्हती म्हणून नव्हे. पुण्याकडचे कुचेष्टेखोर लोक तसें हिणवत; पण शेंदाडपूरचे नागरिक आजवर तो अुत्सव जो करीत नव्हते त्याचें मुख्य कारण असें होतें, कीं पहिलीं कित्येक वर्षें तो अुत्सव कांहीं संशयित वर्तनाच्या लोकांनीं काढलेली अेक जातीजातींत वैमनस्य फैलावणारी टूम होती. त्या

अुत्सवांत भाग घेणें हें त्या वेळीं सुखरूप, सभ्यतेचें किंवा बिनधोक नी अनपवाद राष्ट्राभिमानाचें कृत्य समजलें जात नव्हतें; पण आतां त्या अुत्सवांतील विष काढीत काढीत तो अगदीं पाण्याहून पातळ, पाणी तेरा रंग कैसा — जिसमे मिलेंगा वैसा, असा झाला. त्यांत राष्ट्रावरील वाटेल त्या माणसाला आतां भाग घेतां येअूं लागल्यामुळें त्याला पूर्णपणें राष्ट्रीय स्वरूप आलें आहे. त्यांत आतां हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, यहुदी, अंदमानी, नीग्रो, हबशी, अिराणी तुराणी प्रभृति हिंदुस्थानांतीलच काय, पण जगांतील कोणच्याहि जातीच्या सभ्य गृहस्थास मनमोकळया, सुखरूपपणें, बिनधोक सामावतां येतें. गव्हर्नर-कमिशनरदेखील त्याचे अध्यक्ष होअूं शकतात. खानसाहेब, मुल्लाजी, पाद्री मुख्य वक्ते होण्यास नाकारीत नाहींत, असें अत्यंत शुद्ध राष्ट्रीय स्वरूप त्यास आलें. तेव्हां आतां शेंदाडपूरच्या राष्ट्राभिमानी नागरिकांना तो हवासा वाटूं लागला. यामुळेंच पूर्वी त्या अुत्सवापासून दहा पावलें दूर रहाणाऱ्या नागूजीरावांसारख्या गृहस्थानींहि ह्या वर्षापासून 'शिवाजीमहाराज की जय' असें प्रगटपणें गर्जून गर्जून त्या शेंदाडपूरचें वातावरण दुमदुमविण्यांत दोन पावलें सगळ्यांपुढें रहावयाचें असें नक्की ठरविलें होतें. त्यांतहि नागूजीरावांचें कवित्व त्याच उत्सवांत जगतासमोर प्रथमच प्रकटावयाचें होतें! त्यायोगें तर शिवाजीमहाराजांविषयींचा नागूजीरावांचा अभिमान त्यांना सळो का पळो करून सोडता झाला. अुत्सवाविषयीं सर्व लोकांत अपूर्व अुत्साह संचरविण्यासाठीं अुत्सवमंडळाचे ते कार्यवाह श्रीयुत कविवर नागुजीराव, हे जातीनें गांवभर हिंडत होते; 'शिवाजीमहाराज की जय' असें घरोघर जातांना गर्जत होते. परत जातांना 'माझें प्रथम काव्यगायनहि ह्याच समारंभांत आहे' असें गुणगुणत होते.

ह्या अुत्सवासाठीं दोन कविता रचण्याचें कार्य दोन वर्षांपूर्वीच नागूजीरावांनीं हातीं घेतलें होतें.

पण कविवर नागूजीरावांच्या त्या दोन कवितांचें बांधकाम अजूनहि पुरें व्हावयाचें होतें. रचना चाललीच होती, याविषयीं नागूजीरावांना मोठा अभिमान वाटे. ते म्हणत, ह्यावरून शिल्पापेक्षां काव्याची श्रेष्ठता किती मोठी आहे हें कसें आपोआप सिद्ध होतें पहा ! काव्य म्हणजे कांहीं दगडाचुन्याचें बांधकाम नव्हे ! ताजमहाल बांधावयास जीं अनेक वर्षें लागलीं तीं कांहीं त्याच्या शिल्पास, बांधकामास, लागलीं नाहींत; तें दगडी बांधकाम काय अेका दहा दिवसांचें ! पण वर्षोनुवर्षें जीं लागलीं तीं त्या ताजमहालाच्या भिंतींभिंतींवर नी खांबाखांबांवर जीं काव्यमय चरणें कोरलेलीं आहेत तीं काव्याचीं अक्षरें कोरण्यास होत ! तरीदेखील तीं चरणें रचायचीं नव्हतीं, नुसती कोरायचीं होतीं. पण मला तर त्या दोन कविता मुळांतच रचावयाच्या होत्या. त्यांचें बांधकाम पायांतील धोंड्याच्या भरीपासून तो कळसाच्या दगडापर्यंत 'अेकहातीं' करावयाचें होतें. ( नागूजीराव 'अेकहाती अेकटांकी ! ' असेंच म्हणणार होते पण त्यांच्या त्या दोन कवितांच्या बांधकामांत कमींत-कमी दोनशें बत्तीस टांक झिजून गेले होते; खुडाखूड झालेले अेकशें बेचाळीस चवरखे कामास आले होते ! )

कवि होण्याचा निश्चय नागूजीरावांनीं दोन वर्षांपूर्वीं जो केला त्याचें असें झालें होतें. नागूजीरावांना स्वतःच्या असामान्य बुद्धिमत्तेविषयीं नी कर्तृत्वाविषयीं असलेल्या दांडग्या आत्मविश्वासामुळें आपण जगांत कोणच्या तरी नात्यानें अलौकिक नांव मिळविणार असें त्यांना नेहमीं वाटत असे. त्यांनीं प्रथमतः प्रो. परांजप्यांचा बडेजाव अैकून रँग्लर होण्याचा निश्चय केला. पण दशांश अपूर्णांकाची धोंड दुर्दैवानें हायस्कूलमध्यें आडवी आल्यामुळें त्यांना ती वाट आरंभींच सोडावी लागली. अिंग्रजी चौथींत असतांना त्यांनीं दोन वर्षें तींत उत्तीर्ण व्हावयाचा यत्न चिकाटीनें केला आणि तिसरें वर्षहि ते चौथींत घालविणारच होते. पण मॅट्रिक होऊन

तरी काय दस रुपडीची नोकरीसुद्धां मिळत नाहीं असें जेव्हां त्यांना कळलें, तेव्हां ‘ साठाव्या वर्षापर्यंत मॅट्रिकला बसत राहीन, पण या जन्मीं मॅट्रिक झाल्यावांचून रहाणार नाहीं ’ अशी चौथीच्या मास्तरापुढें जी कृतनिश्चयी प्रतिज्ञा ते करीत असत, ती मोडण्यास उत्तम निमित्त सांपडलें नी वयाच्या बावीसाव्या वर्षीं त्यांनीं अिंग्रजी चवथींतून नांव काढून शाळा सोडली. पुढें अेका व्यापाऱ्याला सट्टयांत खूप पैसे मिळाल्याचें अैकून त्यांनींहि घरची होती नव्हती ती पुंजी सट्टयांत घातली, ती त्यांतच गडप झाली. त्यांनीं घेतलेल्या लॉटरीच्या तिकिटांचा तर पत्त्याचा जोडच झालेला होता आणि त्यापायीं खिशाची चाळणी झाली होती. त्यांनीं अलौकिकत्व संपादण्यासाठीं मध्यंतरीं अेकदां सार्वजनिक चळवळींत भाग घेतला. प्रथम फेटा फेंकून देअून खादी टोपी घातली; नंतर ती फेंकून देअून केंस फिदारून बोडके हिंडले. पण आधींच डोक्यावर केंस फार थोडे अुरलेले असल्यामुळें टक्कल पडलेल्या त्यांच्या त्या डोक्याला त्या पक्षांतहि समरस होतां आलें नाहीं.

अशा स्थितींत वैतागून गेले असतां त्यांनीं त्यांची कहाणी त्यांचे अेक मित्र छंदोपंत यांना सांगितली नी म्हटलें, कीं ‘ माझ्यांत अलौकिक होण्यासारखे अनेक गुण आहेत हा माझा ठाम सिद्धांत झालेला असतांहि मला अजून जगांत कांहींच कसें होतां येत नाहीं ! याला काय करावें ! ’ हें अैकतांच छंदोपंत म्हणाले, ‘ मित्रा, तुला कांहींच होतां आलें नाहीं हें अगदीं खरें ना ? वेड्या, तर मग कवि होण्यास तूं योग्य असलाच पाहिजेस ! तूं कवि हो ! मीहि असाच भटक भटक भटकलों; कांहींच साधेना, तेव्हां कविता करूं लागलों; आणि आतां पहातोसच कीं, मला गेल्या कविसंमेलनांत त्यांनीं किती गौरविलें नी छंदोपंत ही अेक पदवी तरी मला शेवटीं पटकवतां आली ! ’

'हो रे हो! पण, कविता करायची म्हणजे त्याचें शास्त्र हवें शिकायला! जर का दशांश अपूर्णांकासारखें प्रकरण त्यांत पुन्हा आडवें आलें! –'

'छट्! कवितेच्या शास्त्रांत अपूर्णांकाचा प्रश्नच नाहीं! कवि हा स्वयमेवच अेक पूर्णांक! तुला सांगतों अैक काव्यशास्त्राचें शास्त्र अेका सूत्रामध्यें! तें पाठ केलेंस कीं सारें पाठ केलेंस! ज्याला शास्त्रच नाहीं तें काव्य, ही त्याची व्याख्या; आणि 'निरंकुशाः कवयः' हें त्याचें सूत्र! कवीचें जन्मसिद्ध ताम्रपट!!'

'ठीक ठीक! पण कवीला अंकुश नसला तरी छंदोबंधनाचा लगाम तरी असतोच ना कोणचासा?'

'छंद! – बंध? जाळून टाक ते बंधहि! तेवढीदेखील अडचण कवींना अुरूं नये म्हणून तर मी मुक्तबंध नांवाच्या कविमंडळाचा सभासद झालों आहें. कवींना बंधनच जर नाहीं, जर कवि जन्मजात निरंकुश आहेत तर पुन्हा छंदाचें बंधन पाळा म्हणून त्यांना सांगणें म्हणजे वदतोव्याघातच नव्हे काय? तूं मुक्तबंध छंदांतच कविता कर. गद्याच्या ओळी तुला लिहितां येतात ना? त्या सरळ न लिहितां अेकाखालीं अेक लिहीत गेलास, कीं मुक्तबंध छंद साधला!'

'वा! तोड पण तोड सुचविलीस! अडचण पण टळली आणि कालिदासापासूनच्या सार्‍या लौकिक कवींपेक्षां आपली अशी कांहींतरी अलौकिक अपूर्वाअी पण आपल्या कवितेला लाभणार! अडचणी वांचून अलौकिकता! बरें, छंदांचा प्रश्न सुटला; पण कांहीं झालें तरी कवितेमध्यें शिष्टांच्या कानाला गोड लागावे असे संस्कृत शब्द म्हणे पुष्कळच घालावे लागतात. आतां मला संस्कृत येतच नाहीं असें नाहीं; पण कोणचा शब्द संस्कृत नी कोणचा असंस्कृत हें ओळखणें तेवढं वरेंच जड जातें. त्यांतहि तो भाषाशुद्धीचा कायसा

अेक बाष्कळ वाद कांहीं अुपद्रवी लोक घालीत आहेत म्हणे ! त्यांच्या अुपद्रवामुळें 'दिल' 'आदमी', 'दुनिया' असे अगदीं शुद्ध संस्कृत शब्ददेखील कवितेंत घालण्याची चोरी झाली आहे ! आमच्या तोंडीं तर छप्पन्न भाषांचे अिंग्रजी, अूर्दू, ह्राटेंटाट, तुर्की शद्व खिळलेले. सट्टेबाजारांत, गोदीवर, चोरबाजारांत ही बाजारी बोलीच तुमच्या शुद्ध संस्कृतापेक्षां किंवा किंग्ज अिंग्लिश-पेक्षां आमच्या जास्त उपयोगी पडते. ती बाजारी बोली म्हणजेच आजची माझी मातृभाषा ! पण तींत कविता चालेल काय ? '

'होय तर ! अरे, ती बाजारी बोली तुला खरंच छान येते का ? तर मग वेड्या, भविष्यकाळाचा महाकवि होण्यांत तूंच आघाडी मारणार ! अरे, आतां कोण विचारतो त्या भूतकालच्या संस्कृतला नी भाषाशुद्धीला ? त्या शिवाजीचें नी त्या चिपळूणकराचें तें भाषाशुद्धीचें खोबरें होणार ! आतां राष्ट्रीय भाषेची जागा कोण घेणार, आहे माहीत ? न ज्ञानेश्वराची मराठी न टागोरांची बंगाली न तुलसीदासाची हिंदी ! ही सट्टेबाजारांतील बाजारी भाषाच आतां राष्ट्रपदाच्या महत्पदावर चढणार आहे. अरबी, तुर्की, पारशी, यहुदी, पुर्तुगीज, फरेंच, अिंग्रजी— कमींतकमी अितक्या भाषांचे प्रतिनिधि शद्व तींत असणार ! त्या त्या हिंदु, मुसलमान, यहुदी, ख्रिश्चन प्रभृति हिंदुस्थानांतील नागरिकांच्या संख्येच्या प्रमाणांत प्रत्येक प्रांतांतील बोलींत ते ते विदेशी शद्व मूळच्या स्वदेशीभाषांतून घेतलेच पाहिजेत ! अुदाहरणार्थ, बंगालींत शेंकडा हिंदु शद्व अितके; शेंकडा मुसलमानी शद्व जितके शेंकडा मुसलमान तितके, शेंकडा ख्रिश्चन वसती तितके अिंग्रजी-पुर्तुगीज-फ्रेंच शद्व ! त्यांतहि मुसलमानी समाजाचा ते मागसलेले आहेत हा अेक मोठा सद्‌गुण, अेक मोठी अधिकारार्ह थोरवी, त्यांनीं आमच्यावर केलेला अेक मोठा अुपकार असल्यामुळें त्यांच्या अुर्दू शद्वांना विशेष प्रति-निधित्व त्या राष्ट्रभाषेंत मिळालें पाहिजे ही गोष्टहि ठरलेलीच.

तेव्हां जर तुला खरोखरीच सट्टेबाजाराची नी चोरबाजाराची भाषा येत असेल, तर तींत पुष्कळ अुर्दू नी थोडे अितर शद्व असल्यामुळें तूं तुझी नवी कविता बेधडक तींतच करूं लाग ! टागोरची बंगाली कविता बंगाल्याबाहेर कोण वाचतो ! पण तूं जर त्या भावी राष्ट्रीयभाषा होणाऱ्या अुर्दूबहुल बाजारी भाषेंत कविता करशील तर ती तुझी बाजारी कविता साऱ्या हिंदुस्थानांत घरोघर वाचली जाईल. थोडक्यांत म्हणजे, तूं अूठ नी कविता करूं लाग !,

त्या तडाक्यासरशीं नागूजीराव लगेच अुठले नी घरीं जाअून त्यांनीं दोनचार कविता, पहिली पुस्ती म्हणूनच, मराठी भाषेंत रातोरात रचूनहि टाकल्या. मुक्तबंध छंदांतच ते रचावयास गेले असतांहि ती कविता न कळत छंदोबद्ध होऊन पडली. आद्यकवींचेंहि असेंच झालें होतें. ते शोकसंतप्त होअून ओरडावयास गेले तों अनुष्टुप रचून बसले !

' परकी शब्दांना मराठी प्रत्यय लागले कीं झाले, ते शुद्ध मराठी ! ' या दिग्विजयी शास्त्राधारें रचलेल्या त्या कवितेची थोडीशी वानगी म्हणून कांहीं चरणें खालीं देत आहोंत—

(चाल :- बाजीराव नाना । तर तुंबडीभर दाणा ।। अशी कांहींशी)

रोमान्सच्या राज्यांत चल मारूं लांब मजल ।।
प्रिये तूं पोअेट्री अँड मी अेक तुझी गजल ।।
अिष्कानें मी बेमार झालों टेक* ना माझी दाद ।।
गल्लोगल्लीं शाऊटेनां† तूझा खादी झिंदाबाद ।।
स्पीक एक वर्ड तरी ! रडतो धाय धाय ।।
रिक्वेस्ट नको रिजेक्टूं ही चाटिन तुझे पाय ।।

---

* अितर परकी शद्वांना प्रत्यय लावतांच जर ते मराठी बनतात तर त्या न्यायानें इंग्रजी क्रियापदेंहि मराठीनें आत्मसात करावीं या मताच्या आधारें- टेक = घे ! † शाअूटेन = गर्जेन.

दिलाच्या गोठ्यांत तुझ्या दयेची जी गाय ॥
फुटूं दे ना पान्हा तिला ! डोंट मी* ॲनॉय ॥
स्तोत्रें, स्वीट हार्टे÷ ! तुझीं सिंगतों† बारबार ॥
खुदी° तूं माझी मी तुझा खुदाअि खिद्मतगार ॥ १ ॥

या कवितेच्या 'दिग्विजय' मराठींत मूर्ख लोक पूर्वी हंसले पण आज अनेक कवि आपल्या मराठी कवितेंत खुदाअी खिदमतगार आणि झिंदाबाद हे शद्व अुघडपणें खरोखरीच योजीत असतात ही गोष्ट गेल्या वर्षांतील कांहीं मराठी सासिकें चाळतांच वाचकांच्या ध्यानांत येअील.

त्या कवितेमुळें नागूजीरावांचें नांव कविमंडळांत चमकूं लागलें असलें तरी त्यांना अुघड सभेंत स्वतःचें काव्य स्वतःच गाअून दाखविण्याची संधि भाषाशुद्धीवाल्या जुन्या कवींच्या मत्सरामुळें आजवर कुठेंहि मिळाली नव्हती. ती शेंदाडपूरच्या ह्या आजच्या शिवाजी अुत्सवांत शक्य तितक्या प्रचंड प्रमाणावर साजरी करण्यासाठीं नागूजीरावांनीं त्यचें कार्यवाहपद स्वतः स्वीकारून अेक अत्यंत मनोरंजक नी भपकेबाज कार्यक्रम आंखला होता.

पण तो कार्यक्रम अुत्सवमंडळाकडून संमतवून घेतांना सत्कार्याला नेहमीं येतात, तशाच अनेक अडचणी आल्या होत्या. प्रथमतः त्या जिल्ह्याचे लोकप्रिय कलेक्टर मि. ब्लॅकस्टोन यांनीं सर्व सरकारी नोकरांना अुद्देशून जें अेक परिपत्र (circular) काढलें होतें, त्याचा विचार करावा लागला. या परिपत्रांत असें लिहिलें होतें कीं,

---

* मी = मला (me) ÷ स्वीटहार्ट शद्वाचें मराठी संबोधन = प्रिये. † सिंगतों = गातों. ° खुदी = देवी (खुदा म्हणजे देव; त्याला मराठींत आत्मसात करण्यासाठीं मराठी व्याकरणाच्या घणाखालीं ठोकून त्याचें स्त्रीलिंग, देवाची देवी तशी खुदाची खुदी, असा शद्व बनविला. )

'शिवाजीच्या अुत्सवास जर खरें खरें राष्ट्रीय स्वरूप आलेलें असेल तर त्यांत सरकारी नोकरांनीं भाग घेण्यास हरकत नाही. खरें खरें राष्ट्रीय स्वरूप म्हणजे असें, कीं त्या अुत्सवाच्या कार्यंक्रमांत मुसलमान, ख्रिस्ती, यहुदी, युरोपियन यांचे सर्व प्रतिनिधि स्वसंतोषानें येअू शकतील असा त्याचा कार्यक्रम हवा. सरकारी नोकर नी नागरिक या दोघांनींहि आजची शांतता नी सुव्यवस्था यांना धक्का न पोंचेल असाच काय तो भाग शिवाजीच्या चरित्रां-तून निवडून त्या अुत्सवांत लोकांच्या पुढें आदर्श म्हणून ठेवावा. आजची या राष्ट्राची स्थिति शिवाजीच्या वेळच्या स्थितीहून अवनत झाली आहे म्हणून ती सुधारण्यास शिवाजीनें यावें असा कोणाचाहि राजकीय बाष्कळ अुल्लेख त्यांत असूं नये. फार तर आजची सुधारलेली शांतिसौख्यमय राष्ट्रीय परिस्थिति ही त्या काळच्या धामधुमीच्या, लुटालुटीच्या, हाणामारीच्या, रानटी परिस्थितीहून किती वरचढ आहे आणि आज जर शिवाजी असता तर तोसुद्धां शांततेचे नी शिक्षणाचे हे लाभ पाहून आधीं जाता प्रायमरी स्कुलांत, मग हायस्कुलांत नी शेवटीं रामकृष्ण मिशनांत, अशा अर्थी काय ती शिवाजी-अुत्सवांत सद्यःपरिस्थितीचा अुल्लेख झाल्यास व्हावा! नाहींतर केवळ अैतिहासिक दृष्टचा त्या काळीं घडलेल्या गोष्टींचाच तेवढा खल करावा आणि त्या शिवाजीच्या अुत्सवाचा समारोप Rule Britania! Britania rules the waves! अशा कोणच्यातरी अुत्कृष्ट नी अनाक्षेपार्ह साम्राज्यगीतांत केला जावा, अशा कार्यक्रमानें जो जो शिवाजी-अुत्सव होअील त्यांत सरकारी नोकरांनीं भाग घेण्यास हरकत नाहीं. नव्हे घ्यावाच.'

कलेक्टराचें हें परिपत्र म्हणजे नागूजी कवींच्या काव्यावर अेक वज्राघात होता! कारण त्या शिवाजी-अत्सवासाठीं त्यांनीं जी अेक अत्यंत अुद्दीपक कविता केली होती ती कलेक्टरांच्या परि-पत्रांत नको म्हटलेल्या थाटाचीच होती! 'भूमाता कसायांच्या



त्या सिंहगर्जनेसरशीं सारी सभा थरथर कांपू लागली !

सुऱ्याखालीं हंबरते आहे— धांव ! विजापूरच्या रस्त्यांत ती गाय सोडविलीस तशीच हे शिवराया, हीहि गाय सोडीव, ये !' अित्यादि दहापांच ओळी तर अशा जाज्वल्य होत्या कीं, निदान दोन हजार टाळ्या तरी त्यांना पडल्याच असत्या ! पण अरेरे ! नागूजी कवीला त्या ओळी गाळून टाकाव्या लागल्या ! कारण तशी कविता ठेवली तर सरकारी अधिकारी येणार नाहींत आणि तो शिवाजी-अुत्सव करावयाचें धाडस शेंदाड्पूरच्या सभ्य नागरिकांनीं जें ह्याच वर्षीं केलें तें त्यांत सरकारी अधिकारी आतांशीं येतात ह्याच आधारावर अवलंबून. अुत्सवमंडळाचे अध्यक्ष रावबहाद्दुर पोटाळे ह्यांनीं साफ सांगितलें कीं, शिवाजी-अुत्सवास जर राष्ट्रीय स्वरूप द्यावयाचें, तर राष्ट्रांतील अत्यंत महत्त्वाचा वर्ग जो सरकारी अधिकारी तो त्यांत असलाच पाहिजे आणि अराष्ट्रीय शिवाजी-अुत्सव आपल्याला करायचा नाहीं ! तेव्हां सर्वांनुमतें तसेंच ठरलें. साऱ्या कार्यक्रमांतून सरकारी परिपत्रानें आंखून दिलेला भागच काय तो ठेवला. शिवाजीमहाराजांच्या चरित्राविषयीं केवळ अैतिहासिक चर्चा करणारे निबंध, भाषणें, कविता—ह्याच काय त्या नव्या कार्यक्रमांत समावेशिल्या. हें कळतांच अुत्सवाचें अध्यक्षपद घेण्याचें स्वतः कलेक्टरमहाशय मि. ब्लॅकस्टोन ह्यांनीं मान्य केलें.

तोंच दुसरी अडचण दत्त म्हणून अुभी राहिली ! शिवाजीच्या चरित्रांतील अैतिहासिक घटनांचें वर्णन निषिद्ध नाहीं म्हणून नागूजी कवीनें अफझुलखानवधावर कविता करावयाचें ठरविलें. अगदीं अितिहासाला धरून तेवढेंच बोलणें, सद्यःपरिस्थितीचें नांव नाहीं, अशीं दोन कडवीं रचलींहि आणि स्वागतमंडळाच्या बैठकींत रावबहाद्दुर पोटाळ्यांच्या पूर्ण संमतीनें त्यांनीं नवीन कार्यक्रम वाचून दाखविला ! त्यांत अफझुलखानाच्या वधावरील आपला पोवाडाहि गायला जाअील असें वाक्य नागूजीरावांनीं जेव्हां अुच्चारलें तेव्हां अकस्मात अफझुलखानच कोणाच्या अंगांत संचारून डुरकाळावा तसें

हुरकाळत ‘ Stop ! Stop that humbug ’ असें कोणीसें ओरडून अुठलें. पहातात तों ते खानबहाद्दुर फाजलखानसाहेब ! अुत्सवमंडळाचे अुपाध्यक्ष !

त्या खानबहाद्दुर फाजलखानांनीं मोडक्या तोडक्या मराठींत साफ सांगितलें कीं,

‘ हिस्ट्रीबिस्ट्री को आग लगा दो ! मुसलमानांना कमीपणा येअील असें अेकहि अक्षर अुत्सवांत निघतां कामा नये. काफर शिवाजीका नामभी हम नही सुनना मांगते; लेकिन क्या करे ! कलेक्टरसाबनीं चिठ्ठीच धाडली कीं राष्ट्रीय सोरूपकाच काय ते कार्यक्रम आहे तेव्हां तुम्ही बेशक या, म्हणून मी त्या बुदपरस्त शिवाजी का नांव तेवढा ऐकण्याचा मान्य केला. तों तुमने अे क्या बदमाषी मचाओी है ! अफझुलखानाचा वध क्या ! वधबिध आम्ही कांहीं सुनेंगे नहीं ! अितिहासच कशाला हवा, या तमाशांत ! अफझुलखानानेंच शिवाजीचा वध केला असा कांहीं कविता रचून म्हणा हवा तर ! नही तो हम चल देंगे ! ’

‘ हां, हां ! खानबहाद्दुरसाब ! ठैरिये ! माफ करीये ! अैका तर खरें. आम्ही तुमचें सारें म्हणणें मान्य करतों. मग झालें ना ? ’

असा निकाल रावबहाद्दुर पोटाळे ह्यांनीं दिला. त्यासरशीं नागूजी कवीचा अफजुलखानाचा पोवाडाच काय, पण वीररसाचें असें कोणतेंहि काव्य शिवाजीच्या अितिहासापुरतें तरी निषिद्ध ठरलें ! मनांत चरफडत पण वरवर सौम्यपणें नागूजीराव कार्यवाह या नात्यानें जिज्ञासले– ‘ तर मग शिवचरित्रपर असें शिवाजी–अुत्सवांत कांहींच बोलू नये हें अुत्तम. घडलेला अितिहाससुद्धां सांगणें आतां रद्द केलें पाहिजे, नाहीं का ? शिवाजीविषयक हे सारे अैतिहासिक निबंध परतवितों तर ! ’

रावबहाद्दुर पोटाळ्यांनीं थोडा विचार केला. नंतर ते म्हणाले, ‘ थांबा. शिवाजीच्या चरित्रांतील जो भाग खानबहाद्दुरांना नापसंत तेवढा गाळला कीं झालें. मुसलमानांच्या भावना न दुखवील असा भाग शिवाजीच्या चरित्रांतून पुष्कळ काढतां येईल, काय खानबहाद्दुर, तुम्हीच तो निवडून द्यावा.’

त्याप्रमाणें त्या राष्ट्रीय शिवाजी-अुत्सवांत मुसलमानांच्या भावना न दुखतील असें जें शिवाजीचरित्र वाचावयाचें म्हणून खानबहाद्दुरांच्या संमतीनें ठरविलें तें अेकश्लोकी रामायणाप्रमाणें अगदीं चार चरणांचेंच होतें तें असें:–

**शिवाजी हा शहाजी नांवाच्या मुसलमानांच्या अेका अंकित सरदाराचा पुत्र होता. त्याच्या आअीचें नांव जिजाबाअी. तो कोणत्यातरी अेका तारखेस ( सन १६२० ते १६३० च्या मध्यंतरीं ) अेका वर्षी जन्मला.** ( जन्मतिथि वर्ष वादग्रस्त असल्यानें राष्ट्रीय अुत्सवांत दोन्ही पक्षांना सामावतां यावें म्हणून नक्की तिथि व वर्ष सांगितलीं नाहींत. ) **जन्मल्यानंतर बरेच दिवस जगून तो सन १६८० त मृत्यु पावला !**

या सर्वसंमत झालेल्या राष्ट्रीय शिवचरित्रावरहि खानबहाद्दुरांचा अेक अभिप्राय नोंदला होता, तो असा, कीं ‘ शिवाजी जन्मला हीच गोष्ट मुसलमानांच्या भावना दुखविते; पण राष्ट्रीय हिताकडे दृष्टि देअून आणि कलेक्टरसाहेबांच्या शब्दास मोडूं नये म्हणून, येवढ्या अुल्लेखाकडे मुसलमान बंधूंनीं दुर्लक्ष करण्याची सहिष्णुता दाखवावी.

हें शिवाजीचें राष्ट्रीय चरित्र राष्ट्रीय शाळांतून शिकविण्यास हरकत नाहीं असा, शिवाबावनीस रद्द केल्यानंतर गांधीजींच्या कलास अनुसरून नागपूर राष्ट्रभाषासमितीनेंहि निर्वाळा दिला.

Acc. No. 33 ... 20192
नं. दि.

परतु नागूर्जा कवीपुढें जो मुख्य प्रश्न होता तो कसा सोड-वायचा ? आतां शिवाजी अुत्सवांत ह्या नव्या राष्ट्रीय कसोटीस अुतरेल आणि मुसलमानांनाहि मानवेल असें काव्य कोणत्या विषयावर करायचें ? अितक्यांत त्यांना अेक युक्ति पण युक्ति सुचली ! शिवाजी-अुत्सव म्हणजे पराक्रमाचा, विक्रमाचा. बदललेल्या परिस्थितींत विक्रमाचें क्षेत्र बदलेल; पण थोरवी बदलणारी नाहीं. तेव्हां त्याच्या परिस्थितींत जो विक्रम तो शीवाजीनें केला; तसा आजच्या परिस्थितींत जो विक्रम तो आज करणारा मनुष्यहि अशा अुत्सवांत सन्मानिला जाण्यास सत्पात्र असलाच पाहिजे. त्याच्यावर कविता रचून तीच ह्या अुत्सवांत गावी !

सुदैवानें त्या शेंदाडपुरांतील नागरिकांतच असा अेक विक्रम करणारा वीर नुकताच अुदयास आलेला होता. तेथील नरू न्हावी नांवाच्या अेका तरुणानें चोवीस तास सारखा वस्तारा चालविण्यांत जागतिक अुच्चांक पटकावला होता ! शेंकडों लोकांचे केंस भादरतां भादरतां शेवटीं डोकीं करणारा, दाढी करणारा, मिशा काढणारा मनुष्य जेव्हां मिळेनासा झाला तेव्हां त्यानें म्हशी भादरण्यास लगोलग आरंभिलें ! पण चोवीस तास वस्तारा नी कातर जी सारखी चालविली होती ती खालीं म्हणून ठेवली नव्हती ! साऱ्या जगांतील न्हाव्यांत स्मश्रू करण्यांत त्यानें अुच्चांक पटकावून केंस भादरण्याचा हा जो विक्रम केला त्यामुळें महाराष्ट्राचें नांव या युगांतहि अुज्ज्वल झालें होतें. युरोपांतहि विक्रम करतात ; पण युरोपांतील लोकांत असलीं खरींखुरीं पौरुषाचीं कृत्यें करून त्यांत अुच्चांक पटकावण्याची धमक कुठली असणार ! त्यांचे विक्रम म्हणजे फार फार तर अटलांटिक महासागर अुडून जाण्याच्या स्पर्धेत, नाहींतर असल्याच दुसऱ्या कोणच्यातरी पोरखेळांत असणार ! विमान चांगलें असलें कीं कोणीहि अुडेल ! तो यंत्राचा प्रताप—पौरुषाचा नव्हे ! पण चोवीस तास सारख्या विड्या ओढीत किंवा सारखा चहा ढोसीत किंवा सारखे केंस भादरीत रहाण्यांत पुरुषशक्तीचा खरा प्रताप व्यक्त होतो. कारण तेथें यंत्रबळाचा

प्रश्न नसून हस्तबळाचा वा श्वासबळाचा वा पोटबळाचा प्रश्न असतो. त्यांतहि केंस भादरण्याच्या चिकाटींत अुच्चांक पटकावणें, रेकॉर्ड करणें, हें तर निर्भेळ पौरुषी कृत्यच होय ! कारण कीं आमच्या-अिकडे स्त्रिया अजून सहसा केंस कापून घेत नसल्यामुळें आणि दाढीमिशा तर त्यांना फुटतच नसल्यामुळें चांगली गुळगुळीत जर कोणाची अुडवायची, जर कोणाची मिशी अुतरून द्यायची, जर कोणाची दाढी अुपटायची, तर ती बहुधा पुरुषाचीच अुपटावी लागते ! केंस भादरण्याच्या कृत्याचा मुख्य संबंध पुरुषाशींच असल्या-मुळें तें खरें खरें पौरुषी कृत्य ठरतें. हजामतींत अुच्चांक पटकावणें हाच निर्भेळ पौरुषी विक्रम ठरतो ! हे सारे विचार कवितेमध्य घालायचे असें योजून नागू कवीनें कार्यक्रमांत तो भाग प्रसिद्धहि केला.

'चोवीस तास सारखे केंस भादरण्यांत जागतिक अुच्चांक ज्यानें पटकावला आहे, त्या स्मश्रुविक्रम करणाऱ्या नरू न्हाव्याचा गौरव ! आणि त्या वीरावरील नागू कवीचें प्रशस्तीकाव्यगायन ! या ! पहा ! अैका ! ' अशीं प्रसिद्धकें ( जाहिराती ) भडक रंगांत जिकडे तिकडे फडकतांच शिवाजी-अुत्सवाच्या दिवशीं मंडळींची नुसती रेटारेट झाली ! मुंगीस जागा नाहीं असा समाज लोटला !

त्यांतहि तो राष्ट्रीय शिवाजी-अुत्सव ! हिंदूच काय पण मुसलमान, यहुदी, पारशी, सरकारी, निमसरकारी, बिनसरकारी मनुष्यमात्र चिकार दाटलें ! शिवाजी उत्सवासच काय पण कोणच्या-हि प्रश्नास असें राष्ट्रीय स्वरूप दिलें असतां तो किती थोर पदास पावतो, राष्ट्रीय अेकी कशी आपसूक साधते त्याचें तें प्रात्यक्षिक होतें !

अुत्सवास शेवटीं अेकदांचा आरंभ झाला ! अध्यक्ष स्वतः कलेक्टर मि. ब्लॅकस्टोन साहेब होते. त्यांनीं रावबहादुर पोटाळ्यांना शिवाजीचें चरित्र सांगावयास आज्ञापिलें. त्यांनीं तें वर दिलेलें

चार ओळी चरित्र कसेंबसें वाचलें. तोंच प्रेक्षकांतून 'हुश ! हुश ! तें पुरें ! नरू न्हावी कुठें ? नागू कवि अुठा !' म्हणून गलका चालला. तेव्हां नागू कवि लगेच अुठले आणि प्रेक्षकांच्या वर्तनाचें समर्थन खणखणींत शब्दामध्यें करीत म्हणाले,

'शिवाजीचें चरित्र अैकण्यास तुम्ही अिथें आलेलां नाहीं हें मी जाणतों. मराठी शाळेंतील क्रमिक पुस्तकें, अितिहास, पोवाडा, नाटक, कादंबऱ्या जें पहावें त्यांत त्यांत शिवाजीचें चरित्र चिताडलेलें असतेंच. तें अैकून अैकून तुमचे कान खरोखरीच विटले आहेत ! शिवाजीचें आजच्या राष्ट्रीय कर्त्या पिढीला अजीर्ण झालें आहे ! त्यांना आतां ज्याच्यापासून आज उपयोगी पडेल अशी स्फूर्ति मिळवितां येईल असा कोणीतरी अद्यावत् विक्रमी पुरुष हवा होता ! आजच्या राष्ट्रीय कर्त्या पिढीला हा जुनापुराणा विक्रमी शिवाजी काय शिकविणार ? जे लोक त्याचें चरित्र गातात तेच सांगतात कीं, आजच्या परिस्थितींत शिवाजीच्या चरित्रापासून कांहीं शिकावयाचें असेल तर हेंच कीं, शिवाजीसारखें कांहीं भलतेंसलतें करण्याचा गाढवपणा न करणें हाच शहाणपणा होय ! तेव्हां पूर्वकालीन अेक थोर पुरुष म्हणून शिवाजीमहाराज जरी समजले गेले होते तरी त्यांचा अुत्सव करण्यापलीकडे आज त्यांच्या विक्रमाचा आम्हांस काय उपयोग आहे ? आज ज्या सुधारलेल्या विक्रमांचा प्रत्यक्ष उपयोग आहे असेच विक्रम आजच्या पिढीच्यापुढें आदर्श म्हणून धरावयास हवेत ! तशाच अेका विक्रमी वीराचा गौरव आज आम्ही करणार आहों ! – तो वीर हा पहा ! – (असें म्हणतांच पडद्यास सारून पवित्र्याची अुडी मारीत नरू न्हावी पुढें येतो.) – हा पहा तो नरू न्हावी ! (टाळ्यांचा प्रचंड कडकडाट ! त्यासरशीं नागू कवि बेभान भडकून ओरडतात – ) त्या रायगडचा तो पहा जुना शिवाजी ! – आणि हा पहा आमच्या शेंदाडपूरचा अद्यावत् शिवाजी ! ह्याचा वस्तारा त्या जुन्या शिवाजीची भवानी तरवार तळपत नव्हती असा तळपत आहे ! ह्याची ही धोपटी अर्जुनाच्या अक्षय्य भात्यासहि

खालीं पहावयास लावीत आहे! जर आज शिवाजी महाराज असते तर त्यांनीं Misguided patriotism ची ती भवानी तरवार फेंकून देऊन या नरू न्हाव्याचा हा Spiritual Safety Razor च हातीं घेतला असता यांत मला काडीचीहि शंका वाटत नाहीं!'

अितक्यांत खोक्यांच्या सजवलेल्या अुतरडीवरील महाराजांची तसबीर धक्का लागल्यासारखी कोलमंडली व तिला सांवरण्यास श्री. लुडबुडे पुढें होतात तों ती तसबीर गदगद हालं लागली. खालचें खोकंहि कर्रकरून डगमगलें. दोघेंतिघेजण तें पुन्हा पक्कें बसवूं लागले. अिकडे नागू कवि भाषणाच्या आवेशांत वक्तृत्वाच्या अत्युच्च शिखराच्या अगदीं कडेलोटावर येअून गर्जूं लागले, 'आज जर शिवाजी येअील! –'

इतक्यांत धाड् धाड् धाड्! तोफा अेकदम सुटाव्या तसा अेक मोठा धडाका अुडाला. सारें अुत्सवगृह गदगद हालूं लागलें. त्या तसबिरीखालची ती अुतरड कड् कड् कड् कोसळली! – आणि तसबिरींतून कवचकुंडल मुकुटासहित भवानी तरवार अुपसलेले त्यक्ष शिवाजी महाराज 'हरहर महादेव' गर्जून उभे ठाकले!

महाराज सिंहासारखे गरजले–

'कोण म्हणालें आत्तां कीं 'जर कां आज शिवाजी अिथें येअील?' हा मी अिथें आलों आहें! बोला काय हवें तें?'

त्या सिंहगर्जनेसरशीं सारी सभा थरथर कांपूं लागली! खानबहादुर फाजलखानसाहेब 'तोबा! तोबा! दगा! फिसाद!' असें ओरडत वाक्पीठावरून अुडी टाकून वाट फुटेल तिकडे पळत सुटले. रावबहादुर पोटाळे खुर्चीवरच्या खुर्चीवरच थंडे झाले. अेवढा धीट अिंग्रज तो कलेक्टर ब्लॅकस्टोन पण त्या अद्‌भुतासरशीं अंधारी येऊन तोहि चक्करला! सुरतेच्या एका वखारींत आपण

आहोंत, मराठ्यांच्या नंग्या तरवारी चारी बाजूंनीं चालून येत आहेत, टेबल होतें तें नाहींसें होऊन तिथें पोत्यांची रास दिसत आहे असें त्या घेरींत मि. ब्लॅकस्टोन ह्यांना भासून ते त्या पोत्यांच्या राशीच्या आड म्हणून टेबलाखालीं जाऊन दडले.

बिचारा नागू कवि ! मटकन् खालींच हवकत होता; पण महाराजांनीं त्याचा एक कान चटकन् ओढून त्यास उभा केला नी विचारलें, 'काय रे, मला कशाला यावें म्हणून बोलावीत होतास ? काय भकत होतास ! अं ?'

ततत... पपप करीत नागू कवि म्हणाला, 'म-म-म-महाराज श-श-श-क्षमा करावी ! आपण याल असें ठाऊक असतें तर बापजन्मीं आपल्याला बोलावण्याचें साहस केलें नसतें. 'ये शिव भूपाला !' अशा कविता जो तो गातो म्हणून मीहि तसें कांहींसें बोलून गेलों ! म-म-म-म मला च-च-च- चक्कर येते आहे ! पाया पडतों, कान सोडावा ! मूर्च्छित पडूं द्यावें या दासाला कांहीं वेळ !'

'ठीक !' महाराज हंसले– 'सोडतों तुम्हाला, पण ध्यानांत धरा तुम्ही सारेजण कीं, जर पुन्हा तुम्ही कोणीं कोणत्याहि शिवाजी-अुत्सवांत 'ये' म्हणून म्हटलेंत तर मी शिवाजी महाराष्ट्रांत पुन्हा खरोखरीच येअीन !'

'नको ! नको ! महाराज ! दुसरी वाटेल ती शिक्षा द्यावी; पण असली भयंकर शिक्षा महाराष्ट्राला देअूं नये ! आम्हांला फार फार तर शिवाजी-उत्सव झेंपतों; पण शिवाजी झेंपणार नाहीं ! आमच्या पिढीला हा नरू न्हावी आहे, त्याचा विक्रम आम्हांस पुरे ! त्याचा Razor Safety ! त्याला किंवा शेळीच्या दुधावर वाढलेल्या कुठल्याहि दुसऱ्या शेळपटाला आमचा शिवाजी करा; पण महाराज, आपण सिंहीच्या दुधावर वाढलेले सिंह ! आपण

स्वत:च्या येण्याचा धाक आम्हां बापड्यांना घालूं नका ! नुसते शिवाजी-अुत्सव करूं आम्ही हवे तितके ! –'

'नाहीं ! शेंदाडपूरच्या शेणकिड्यांनो, तुम्हांला शिवाजी नको हें तुमचें म्हणणें बरोबर आहे ! पण म्हणूनच तुम्हीं यापुढें केव्हांहि शिवाजीउत्सव करतां कामा नये. जर पुन्हा असला अेखादा राष्ट्रीय शिवाजी-उत्सव करून चंद्रराव मोऱ्यासारखी आमची विटंबना कराल तर–पाहिलेंत हें काय तें !'

लाख विजांचा लोळ तुटावा तसा असह्य प्रकाश तळपून भवानीच्या त्या झोतासरशीं सारी सभा मूर्च्छित पडली !

नागू कवीहि मूर्च्छित पडले. पण मधून मधून... 'माझी कविता... अरे कवितागायन... तसेंच राहिलें ! ... कविता !' असें चमकून कांहीं वेळ बडबडतच होते !

✠ ✠ ✠

# प्रार्थना

'माझे पत्ते ग कुठं आहेत आओी ?'

'ते बघ त्या कोनाड्यांत; अग ह्या गणपतीच्या मखराच्या कोनाड्यांत! हात नाहीं पुरत? थांब हो बाबी, मी देतें अं काढून तुला.' असें म्हणून विमल– त्या दुडदुड धांवत आलेल्या मुलीची आओी उठली नी तिनें तिच्या त्या चिमकुल्या लहान बाबीला खेळायच्या पत्त्यांचा जोड काढून दिला. त्या मखराच्या रंगविलेल्या कोनाड्यांत, तो पत्त्यांचा जोड ती काढावयास गेली असतां विमलेला अेक जाळें लागलेलें दिसलें. तिनें 'अिश्श' म्हणून तिरस्कारून तें कोळिष्टक जाळें अितक्या झटकिनी नी सहजपणें त्या पत्त्यांच्या जोडाचे दोनतीन फटकारे मारून मोडून तोडून टाकलें, कीं तिला तें जाळें मोडल्याची आठवणसुद्धां बाबीकडे वळतांच राहिली नाहीं.

पण कोळ्याच्या त्या कोळिष्टक जाळ्याचीं अेकदोन चिकट गुंडाळीं त्या पत्त्याच्या जोडास लपेटलेलीं पाहून लहानशी बाबी जेव्हां म्हणाली, कीं 'तें बघ कायसं चिकटलं आहे पत्त्याच्या जोडाला !' तेव्हां विमलचें लक्ष पुन्हा तिकडे गेलें नी तीं गुंडाळीं झटकांत ती बाबीला म्हणाली, 'जाळं तें ! तो किडा नसतो का, तो कोळी ? त्याचं हें घर असतं !'

'मग तें तर तूं चुरगाळून तोडलंस. आतां ग तो कुठं राहील आअी ? रडत असेल नं तो आतां ?'

'असेल रडत मेला. बांधील पुन्हा दुसरं घर त्याला हवं तर ! दिवसभर कोळी विणतच असतो आपलीं जाळीं नी कोणी-तरी येतांजातां झाडूनच टाकीत असतो तीं सारीं ! कसा सुंदर मखराचा रंगीत कोनाडा तो आपला ! या किड्याच्या जळमटांना सोय हवी म्हणून का असा सीमेटाचा गिलावा लावून सुरेख केला, रंगविला ?'

'अग आअी, पण त्या किड्याला तसंच वाटत असेल नं ?' विमलेचा सतराअठरा वर्षांचा पाणीदार मुलगा तीं गमतीचीं बोलणीं अैकून तिथें आला नी म्हणाला, 'मीं त्या कोळ्याला तें जाळं विणतांना परवां बघितलं, किती दंग होता तो तें विणण्यांत नी किती पटाअीत ! अेखादा मोठा यंत्रशिल्पी ( अेंजिनियर ) अितका हातखंडा नसेल ! त्या जाळ्याला हवे तिथंच काय ते बारीक तंतूचे ताण त्यानं दिले. तीं मोठालीं तंतुवर्तुळं प्रथम रचून मग त्यांच्या उभ्या तंतूंचे धागे कसे झटपट गुंतवीत, थांबत, चिकटवीत, ती त्याची चिकट धाग्याची पोटांतील गुंडी सपसपसप कशी अुकलीत चालला होता म्हणून सांगूं ? जसा कोणी पटाअीत विणकर मागांत आडवेउभे दोरे दांड्या सटासट मारीत, गुंड्या झरझर अुकलीत चालला आहे ! त्याच्या त्या तिळाअेवढ्या डोक्यांत तें

विणकामाचं शास्त्रच्या शास्त्र नी त्याच्या त्या तांदुळाअेवढ्या पोटांत अर्ध्या अर्ध्या मैल लांब धाग्याच्या गुंड्या मावलेल्या पाहून मला अितका आचंबा वाटला कीं, आपल्या मखराच्या कोनाड्यांत तें जाळं बांधीत असतांहि त्या किड्याला मारायचं वा तें जळमट सुपकनी झाडून टाकायचं माझ्याच्यानं होअीनाच ! मधें अेकदां मीं गंमत म्हणून त्याच्या जाळ्यास जोरानं बोट लावलं. त्यासरशीं घाबरून तो या धाग्यावरून त्या धाग्यावर पळत, त्याच्या मतं त्याच्या राज्याचा सुरक्षित जो भाग त्या टोंकावर जाऊन थांबला. मग परचक्राचं संकट गेलंसं पाहून पुन्हा आपल्या राजधानीच्या मध्य-विंदूत येऊन राहिला. आपण जसे वास्तुशांति करून आपल्या राजवाड्यांत प्रवेशतों नी देवाचे आभार मानतों कीं 'केवढी त्याची कृपा ! त्यानं आम्हांस हें घर दिलं ! ' तसा तोहि देवाची प्रार्थना करीत नी आभार मानीत असावा ! '

'तर तर ! हें अेवढं मोठं घर नी तो माझा सुरेख मखराचा कोनाडा तो त्या किड्याला जाळं विणून त्यांत सुखानं नांदतां यावं म्हणून बांधला वाटतं ! देवाची सोडून मोठी महा-देवाची प्रार्थना किड्यांनीं केली म्हणून किड्यांच्या सोयीसाठीं कांहीं देव माणसांचीं घरं राखून ठेवीत नसतो ! ही तिनीसांज झाली म्हणून मी जो हा दिवा लावतें आहे तो जसा त्या किड्याला दिसावं म्हणून लावीत नाहीं, तसंच हे टोलेजंग वाडे नी राजवाडे माणसं जीं बांधतात तीं कोळ्यांना जाळीं विणून त्यांत नांदतां यावं म्हणून नव्हेत हें त्या किड्यांना कळलं नाहीं तरी देवाला कळतं हो बाळा ! '

'आणि देवाला कळतं तरी आम्हां माणसांना कळत नाहीं, कीं आम्हां माणसांना हे टोलेजंग वाडे नी राजवाडे बांधतां यावे नी त्यांत नांदतां यावं अेवढ्याच सोयीसाठीं हें जगड्व्याळ विश्व रचलं नाहीं. हा दिवा त्या किड्याला दिसण्यासाठीं आम्हीं लावीत

नाहीं असं आम्ही म्हणतों, पण तो प्रचंड सूर्य मात्र मनुष्यांना दिसावं, त्यांनीं जगावं, म्हणूनच काय तो देवानं पेटविलेला आहे असं आमच्या वेद-बायबल-कुराणासारख्या धर्मग्रंथांतून देखील सांगितलेलं आहे ! किड्यांच्या वेडगळ प्रार्थनेसाठीं माणसांची गैरसोय जर देव दूर करणार नाहीं, तर या अनंतकोटि ब्रम्हांडाच्या सोयीगैरसोयी न पाहतां, 'आम्हां माणसांच्या घरकुल्यांनाच तेवढं रक्षावं' अशा आम्हां माणसांच्या प्रार्थना तेवढ्या देव अैकेलच हें तरी कशावरून ? मग प्रार्थनेस देव पावतोच पावतो, रामनाम जपा, अल्ला अल्ला म्हणा, कीं देव सहाय्यास आलाच म्हणून समजा, हें जें आमच्या पुराणकुराणादिक पोथ्यांतून सांगतात तें भाबडेपणच नाहीं का ?'

'हं विक्रम, पुरे झाला अं पाचकळपणा !' विमलेची वृद्ध सासू नी तिच्या या विक्रम नांवाच्या मुलाची नी छोट्या बावीची आजी देवघराशीं बसून स्तोत्रें पुटपुटत होती ती हा संवाद अैकत असतां विक्रम जरा वेतालपणें बोलत चालला आहे असें वाटून त्याला दाबूं लागली, 'अिंग्रजी चार अक्षरं शिकलीं नं कीं पोरं अशीं चटोर होतात मेलीं ! पोथ्यांविथ्यांविषयीं असं पाचकळपणानं बोलूं नये हो विक्रम ! कधीं तुला कळणार आतां हें ?'

हें त्यांचें बोलणें चाललें आहे तों त्या लहानग्या बावीनें त्या पत्त्यांचा तंबू हळुवार हातानें बांधला होता. तें कठीण शिल्पकार्य संपून तिसऱ्या मजल्याच्या शिखरासारखा शेवटचा तंबू उभारण्यांत यश येतांच सफळतेच्या अत्यानंदानें बावी टाळ्या पिटीत नाचूं लागली. 'बघ माझा तंबू ! आअी, भाअू, आजी ! माझ्या बाहुलीचा वाडा अं हा ! तुम्ही आतां बोलत होतेत त्या राजवाड्यापेक्षां पक्का चिरेबंदी आहे अं ! दूर अं भाअू ! फुंकर मारलास तर बघ माझ्या पत्त्यांच्या राजवाड्यावर !'

विक्रम हंसला. ‘हो का ? आमच्या चिरेबंदी राजवाड्यापेक्षां तुझा पत्त्यांचा तंबू पक्का आहे नं ? नी फुंकराला भितेस ?’

बावी मानेला एक अँटीचा हिसडा देत उपहांसली, ‘पुरे हो ! तुमचे चिरेबंदी राजवाडे नाहीं पडत वाटतं फुंकरासरसे ! काल तूंच मला तें चित्र दाखविलंस नं ! बिहारला एक नगरच्या नगर भुई फाटून धडाडधडाड कोसळलं तें !’ हें वाक्य म्हणतांच त्या सातआठ वर्षांच्या बालिकेच्या गोजिरवाण्या अल्लड तोंडावर भावी संसाराच्या चिंतेची छाया पडल्यासारखें होऊन ती केंविलवाण्या स्वरांत आजीला पुसूं लागली, ‘आजी ! तशी भुईबिई फाटून आज रात्रीं माझा हा तंबू तर कोसळणार नाहीं नं तसा ? उद्यां माझी बाहुली रहायला यायची आहे हो त्यांत !’

‘चूप ! असं अशुभ कांहीं बोलूं नाहीं हो बावी ! ये मी हीं स्तोत्रं म्हणतें आहें. देवापाशीं तूं हात जोडून बैस ये अशी. देवाची प्रार्थना करीत हीं स्तोत्रं म्हटलीं नं म्हणजे देव सारी अिडापिडा दूर करतो बरं. नाहीं पडणार हो तुझा पत्त्यांचा तंबू. ये, देवबाप्पाला हात जोडून प्रार्थना करूं ये !’

आजीपाशीं ती बालिका मनोभावानें जाऊन बसली. आजी कांहीं संकृत, कांहीं प्राकृत स्तोत्रें नित्याप्रमाणें अगदीं श्रद्धेनें म्हणत असतां बाबी मनांतल्या मनांत देवाला हात जोडून विनवीत होती, ‘माझा हा पत्त्यांचा तंबू कधींकधीं पडूं देऊं नकोस हं देवबाप्पा !’

प्रतिदिन संध्याकाळीं म्हणायचा तिचा परिपाठ असे तीं तीं स्तोत्रं आजी म्हणत होती. त्या प्रत्येकाची फलश्रुति अगदीं अगदीं खरी आहे ही तिची श्रद्धा असल्यामुळें तीं सारीं स्तोत्रें अितक्या मनोभावानें म्हटल्यावर संसारांत दुःख, दारिद्र्य, रोग, अपघात, अपमृत्यु यांची भीति आपणास बाळगावयास नकोच अशी निश्चितता तिच्या मनाला लाभे. सात चिरंजीवांचा तो ‘अश्वत्थामा बलिर्व्यासो’ हा श्लोक म्हणून तिनें हाहि श्लोक म्हटला, ‘सप्तैतान् संस्मरेन्नित्यं,

मार्कंडेय यथाष्टमम् । जीवेत् वर्षशतंसाग्रमपमृत्युविवर्जितः ॥ ' 'वाराणस्युत्तरे तीरे सुमंतुर्नाम वै द्विजः । तस्य स्मरणमात्रेण निर्धनो धनवान् भवेत् ॥ ' हा श्लोकहि म्हटला, 'हरिहरं हरिश्चंद्रं हनुमंतं हलायुधं । एतेषां स्मरणात् सायं हानिस्तस्य न बाध्यते ॥ ' अशा अनेक स्तोत्रांच्या पठणानें अपमृत्यु, निर्धनता, हानि प्रभृति सारी अिडापिडा दूर सारल्यासारखें समाधान तिला झालें. नुसत्या 'स्मरणमात्रेण' हा चमत्कार घडून येतो, या विश्वासानें तिनें ह्या लहानग्या नातीकडूनहि तीं तीं नांवें स्मरविलीं, स्तोत्रें म्हणविलीं. विक्रमदेखील आजीच्या मनधरणीसाठीं नी अेक गंमत म्हणून हात जोडून चुपचाप तीं स्तोत्रें अैकत होता. अेकदां काय तें त्यानें मधें तोंड घातलें. त्याच्या आजीनें जेव्हां 'सोमनाथं वैजनाथं धन्वंतरिमथाश्विनौ । अेतेषां स्मरणात् हानिर्व्याधिस्तस्य न बाध्यते ॥' हा श्लोक म्हटला तेव्हां तो तरुण हंसला. 'आजी, सोमनाथाचं स्वतःचं देअूळ त्या दुष्ट महंमदानं फोडलं तेव्हां त्याच्या स्वतःच्या देवळाची नी मूर्तीची हानीदेखील जर तो दुरवूं शकला नाहीं तर त्याच्या नुसत्या 'स्मरणमात्रेण' साऱ्या जगतास तो कसा रक्षील ? ' पण लगेच आजीनें दटाविलें, 'तुला सांगितलं ना बाष्कळपणा करूं नकोस म्हणून ! ' तेव्हां तो पुन्हा आपला वरवर सुतासारखा सरळ दिसूं लागला. मनांत हंसत राहिला.

सारीं स्तोत्रें झाल्यावर देवाचा अंगारा आजीनें मुलांनातवांसुनेस लावला. साऱ्यांना निर्विघ्न ठेव म्हणून देवास हात जोडले. छोट्या बावीनें पण तो अंगारा आपल्या पत्त्यांच्या तंबूस लावला. आतां तो तंबू ढांसळणार नाहीं नी उद्यां त्यांत रहावयास येणारी आपली बाहुली त्या तिच्या वाड्यांत आनंदानं मुलांबाळांसह आजीयेवढी म्हातारी होअीतों निर्विघ्नपणें नांदेल अशा लाडिक विश्वासानें आनंदून तें मूल स्वस्थपणें झोंपलें. विक्रमनें आजीस गमतीनें म्हटलें, 'या अंगाऱ्यानं बाबीचा पत्त्यांचा तंबू राजवाड्यासारखा चिरेबंदी पक्का झाला नाहीं का आजी ? बोटानं डवचळून पाहूं का ?'

मार्कंडेय यथाष्टमम् । जीवेत् वर्षशतंसाग्रमपमृत्युविवर्जितः ।। ' ' वाराणस्युत्तरे तीरे सुमंतुर्नाम वै द्विजः । तस्य स्मरणमात्रेण निर्धनो धनवान् भवेत् ।। ' हा श्लोकहि म्हटला, ' हरिहरं हरिश्चंद्रं हनुमंतं हलायुधं । एतेषां स्मरणात् सायं हानिस्तस्य न बाध्यते ।। ' अशा अनेक स्तोत्रांच्या पठणानें अपमृत्यु, निर्धनता, हानि प्रभृति सारी अिडापिडा दूर सारल्यासारखें समाधान तिला झालें. नुसत्या ' स्मरणमात्रेण ' हा चमत्कार घडून येतो, या विश्वासानें तिनें ह्या लहानग्या नातीकडूनहि तीं तीं नांवें स्मरविलीं, स्तोत्रें म्हणविलीं. विक्रमदेखील आजीच्या मनधरणीसाठीं नी अेक गंमत म्हणून हात जोडून चुपचाप तीं स्तोत्रें अैकत होता. अेकदां काय तें त्यानें मधें तोंड घातलें. त्याच्या आजीनें जेव्हां ' सोमनाथं वैजनाथं धन्वंतरिमथाश्विनौ । अेतेषां स्मरणात् हानिर्व्याधिस्तस्य न बाध्यते ।।' हा श्लोक म्हटला तेव्हां तो तरुण हंसला. ' आजी, सोमनाथाचं स्वतःचं देअूळ त्या दुष्ट महंमदानं फोडलं तेव्हां त्याच्या स्वतःच्या देवळाची नी मूर्तीची हानीदेखील जर तो दुरवूं शकला नाहीं तर त्याच्या नुसत्या ' स्मरणमात्रेण ' साऱ्या जगतास तो कसा रक्षील ? ' पण लगेच आजीनें दटाविलें, ' तुला सांगितलं ना बाष्कळपणा करूं नकोस म्हणून ! ' तेव्हां तो पुन्हा आपला वरवर सुतासारखा सरळ दिसूं लागला. मनांत हंसत राहिला.

सारीं स्तोत्रें झाल्यावर देवाचा अंगारा आजीनें मुलांनातवांसुनेस लावला. साऱ्यांना निर्विघ्न ठेव म्हणून देवास हात जोडले. छोटया बावीनें पण तो अंगारा आपल्या पत्त्यांच्या तंबूस लावला. आतां तो तंबू ढांसळणार नाहीं नी उद्यां त्यांत रहावयास येणारी आपली बाहुली त्या तिच्या वाडयांत आनंदानं मुलांबाळांसह आजीयेवढी म्हातारी होअीतों निर्विघ्नपणें नांदेल अशा लाडिक विश्वासानें आनंदून तें मूल स्वस्थपणें झोंपलें. विक्रमनें आजीस गमतीनें म्हटलें, ' या अंगाऱ्यानं बाबीचा पत्त्यांचा तंबू राजवाडयासारखा चिरेबंदी पक्का झाला नाहीं का आजी ? बोटानं डवचळून पाहूं का ? '

'जाऊं दे रे विक्रम ! लहान मुलीची समजूत आपली पटली, काम झालं.'

'आणि आजी, त्या तुझ्या स्तोत्रांनीं म्हाताऱ्या मुलांची समजूत पटते याहून त्यांचा तरी काय खरा अुपयोग ? आतां या स्तोत्रांत सांगितल्याप्रमाणं केवळ 'स्मरणमात्रेण' आपण सारं शंभर वर्षं जगूं; धनधान्य आरोग्य पावूं; अपघात-अपमृत्यु सारें टळेल; ह्ीं तरी आपली अेक मनाची, मुलासारखी समजूत घालणंच नाहीं का ?'

'तुला कनी विक्रम, लहान तोंडीं मोठा घास घ्यायची फारच संवय झाली आहे ह्ो !' विमलेनें विक्रमचें बोलणें पटलें असतांहि सासूबाअींचा पक्ष घेतलासें करून आपल्या तरुण मुलास हंसतहंसत दटावलें. 'बरं बुवा राहिलं !' असें म्हणत विक्रम त्याच्या निजायच्या खोलीकडे गेला. छोटी बाबी आपल्या पत्त्यांच्या तंबूच्या निर्विघ्न भविष्यानें जितकी आनंदून निजली होती तितकीच देवाच्या प्रार्थनेनंतर देव आपल्या प्रामाणिक भक्तिभावास पावलाच पाहिजे आणि स्तोत्रांतील फलश्रुति खरी ठरून आपलें घरदार, मुलेंबाळें, संसार, सुख, यांत निर्विघ्नपणें नांदलेंच पाहिजे अशा श्रद्धाळू विश्वासानें देवलसी आजीबाअी पण आनंदून निजल्या.

○○○ ○○○ ○○○

त्या संध्याकाळीं ह्या कुटुंबांतील देवघरापाशीं त्या आजीबाओनी बाबी जशा मनोभावें देवास आपलें चांगलें कर म्हणून प्रार्थीत होत्या तसेंच तें सारें नगरच्या नगर, घरोघर, देवळादेवळांतून, मशीदीमशीदींतून, चर्चाचर्चांतून आपल्या नित्यक्रमाच्या सायंप्रार्थना करीत होतें. देवळांतून 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः। सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखमाप्नुयात्।' हे अत्युदार शद्व प्रशांत स्वरांत ब्राम्हण अुच्चारीत होते. दिवसांतून पांचपन्नास शंभर वेळां निमाजाची प्रार्थना करण्याचें व्रत घेतलेले निरनिराळ्या संप्रदायांचे मुसलमान आपल्या दर्ग्यांतून वा मशिदींतून

शेवटचे निमाज पढत होते. चर्चांतून ख्रिश्चन, अग्यारींतून त्या नगरांत असलेले मूठभर पारशी, कांहीं ज्यू, बहुतेकजण स्वतःचें चांगलें करण्यासाठीं नी शत्रूचें तेवढें वाईट करण्यासाठीं देवाची प्रार्थना करीत होते ! कोणी सगळ्यांचेंच चांगलें कर म्हणूनहि प्रार्थीत होते. परंतु ' माझें स्वतःचें वाईट कर, मला अपघात घडूं दे, आम्हांला अपमृत्यु दे, माझें घरदार कोसळूं दे. माझीं मुलेंलेकरें ठेंचून ठेंचून मार ' असें त्या नगरांत घरांतून वा देवळां-तून वा मशीदींतून वा चर्चमधून, हिंदु वा मुसलीम वा ख्रिस्ती, वृद्ध वा बाल, पुरुष वा स्त्री कोणीहि प्रार्थीत नव्हते ! जर प्रार्थनेच्या पायावर उभारलेल्या आशा, दगडमातीच्या पायावर उभार-लेल्या साध्या कौलारू घराइतक्या तरी बळकट पायावर आधारलेल्या असतात असें समजावयाचें असेल, तर त्या संध्याकाळीं नी रात्रीं, प्रत्येक संध्याकाळरात्रीप्रमाणेंच त्या नगरांतील सहस्रावधि कंठांतून अेकच प्रार्थना ज्या अर्थीं उठत होती कीं– ' देवा आयुष्य दे, धन दे, सुख दे, आरोग्य दे, संतति दे, माझें बरें कर !' त्या अर्थीं तें नगर हिमालयाइतकें चिरंजीव नी चिरस्थिर असावयास हवें होतें; निदान त्यांतील प्रार्थनारत, मनोभावें देवास आळविणारे असे शतावधि नागरिक तरी मुळींच प्रार्थना न करणाऱ्या त्या पाखंड मास्कोमधल्या नागरिकांइतके तरी संकटापासून मुक्त रहावयाला पाहिजे होते. कारण त्या नगरांत जो तो ' माझें बरें कर, देवा, माझें घरदार बायकामुलें सुरक्षित राख' असेंच प्रार्थीत होता. कोणीहि असें प्रार्थीतच नव्हे, तर चिंतीतदेखील नव्हता कीं, ' देवा, माझा, माझ्या मुलांबाळांचा, सर्वांचा, चल चटकन् सत्यानाश कर ! आकाश कोसळून पडूं दे ! पाताळ फाटून जाऊं दे ! ! '

–पण हाय हाय ! ! जें सगळेजण प्रार्थीत होते, तेंच नेमकें झालें नाहीं, देवानें केलें नाहीं; जें कोणीहि प्रार्थिलें नाहीं, चिंतिलें नाहीं, देवानें तेंच नेमकें केलें !



'तुला सांगितलं ना बाष्कळपणा करूं नकोस म्हणून!'

–आकाश कडकडकड कोसळूं लागलें, विजांचे चावकावर चावूक अुडवीत कोणी महारुद्र साऱ्या महाभूतांची पाठ सडकीत चवताळून अुठला– पाताळ फाटलें ! !

प्रचंड सुरुंगांची रांगची रांग भूमीच्या पोटांतून फुटून टेकड्यांच्या टेकड्या दगडासारख्या वर फेंकल्या जाअून खालीं आदळल्या ! भूमीच्या चिथड्या चिथड्या अुडून समुद्राच्या लाटा फाटाव्या तशा पृथ्वीच्या फरशी फाटून, मोठमोठे अतल खड्डे पडले, नी त्यांत, मडक्यांच्या अुतरंडी धडधडत कोलमडाव्या तशीं नगरांतील यच्चावत् देवळें, मशिदी, चर्चे, घरें, वाडे, बंगले धडाडधडाड कोसळत गडप झाले. सारें नगर हादरून राहिलें. धक्क्यावर धक्के खात घरें घरांवर आदळून चूर्ण झालीं. बसलेले अुठतां अुठतां, अुठले ते पळतां पळतां, घरांतले घरांत, बाहेरचे बाहेर, पाय टाकावा तिथें भुअी दुभंगून हजारों लोक पाताळांत गडप झाले. वर मोठमोठ्या बांधकामाचे प्रचंड दगड, वृक्ष, भिंती, राशीच्या राशी कोसळून हजारों जिवंत पुरले गेले, ठेंचले गेले. अेका दोन तासांच्या आंत भयंकर भूकंपाच्या जबड्यांत तें क्वेट्टाचें नगरच्या नगर गडप झालें ! देवळाला देवानें रक्षिलें नाहीं, न मशिदीला अल्लानें ! न जीजस न जेहोव्हा ! निसर्गाच्या अिच्छेस मनुष्याच्या प्रार्थनेसाठीं म्हणून कोणीहि आड येऊं शकला नाहीं ! आडवूं शकला नाहीं ! !

विमलेच्या घरीं मखराच्या कोनाड्यांतील जाळें तिच्या सोयीच्या आड येतांच तिनें, त्या कोळ्याच्या लाख आशाआकांक्षा, सोयीगैरसोयीस न जुमानतां एका फटकाऱ्यासरशीं मोडून चुरमळून टाकलें. तसेंच सृष्टीच्या त्या कोनाड्यांत माणसांच्या किड्यानें विणलेलें तें क्वेट्टा नगराचें जळमट सृष्टीच्या स्वतःच्या सोयीच्या आड येतांच तिनें रागाच्या झाडूच्या अेका फटकाऱ्यासरशीं झाडून चुरगाळून टाकलें, होते कीं नव्हतेसें केलें ! भुकेलीं दूधपितीं लेकरें दुधाचा ओंठावरचा

घोंट गिळूंदेखील न देतां त्यांच्या डोक्यावर दगड लोटून जिथें ज्या सृष्टीनें ठेंचून टाकलीं, तिथें ती सृष्टि वा तो सृष्टिसंचालक, पोथ्यांतील लांबलांब संस्कृत स्तोत्रें वा कुराणांतील अरबी आयतें थोडींच अैकून घेणारा होता ! भूगर्भांत जे अत्युग्र स्फोटकांचे समुद्रासारखे हौद शतकोशतकें कढत, तापत, स्फोटाच्या बिंदूस आले होते; त्या प्रचंड सृष्टिशक्ति, काय 'सप्तैते चिरजीविनां'च्या वा सोरटी सोमनाथाच्या 'स्मरणमात्रेण' किंवा निमाजानंतर केलेल्या कोणा मुल्लामौलवीच्या 'दुव्या'नें द्रवणार होत्या ! आपला वैश्वनियमाचा आंखलेला बेत बदलणार होत्या !!

प्रार्थना ! त्या लडिवाळ छोटया बाबीची प्रार्थना मात्र अेका अर्थी सफळ झाली. 'माझा पत्र्यांचा तंबू चिरेबंदी वाड्याअितका टिकाऊ होअूं दे अं देवा !' असें तें अल्लड मूल मनोभावें प्रार्थून झोंपलें. तें मात्र देवानें अैकलेसें वाटतें ! तिचा पत्र्यांचा तो तंबू क्वेट्टा नगरच्या चिरेबंदी वाड्याअितका खरोखरीच टिकाअू ठरला ! कारण त्या क्वेट्टा नगरांतील यच्चावत् चिरेबंदी वाडे त्या पत्र्यांच्या तंबूसारखेच भूकंपाच्या अेका फुंकरासरशीं, हबक्यासरशीं, अेका क्षणांत कोलमडून पडले. त्या पत्र्यांच्या तंबूअितकेंच टिकाअू ठरले !!

००० ००० ०००

छोटया बाबीला पोटाशीं घेऊन आजी निजल्यानंतर दोन तास देखील झाले नाहींत, तोंच बाहेर दूरवर तोफांच्या बातेऱ्यांच्या बातेऱ्या अेकदम भडकाव्या तसे भयंकर आवाज दणाणले; हजारों लोकांच्या आरोळ्यांचा, किंकाळ्यांचा आर्त स्वर अेकदम अुठला ! अभ्यासाच्या खोलींतून विक्रम खाड्दिशीं अुठला. त्या क्वेट्टा नगरांत धर्मवेड्या कडव्या मुसलमानांची वसति मुख्य, हिंदु मूठभर. नेहमीं हिंदूंवर शेजारच्या बलुची टोळ्या दरवडे घालून मारहाण करीत. विक्रम हा 'हिंदुसंरक्षक' दळाचा अेक स्वयंसेवक, त्याचें कुटुंब

महाराष्ट्रांतून नोकरीसाठीं क्वेट्टयाकडे गेलें तेव्हांपासूनच झाला होता. त्याला वाटलें, हिंदूवर दरवडा पडला, तो झटकन् खंजीरलाठी घेऊन दार उघडून बाहेर पडतो तों- उंच माडावर चढलेला मनुष्य आदळांत तें माडाचें झाड हलतांच जसा गदगद हलतो तसा पायाखालची सारी पृथ्वी भूकंपांत थरकांपून झोंकांडचा घेत पायरीवरच पडला- मागोमाग कडकडकड आवाज होऊन त्याचें घर कोसळलें !

घर भुअींत पुरुषभर खड्ड्यांत दगड पडावा तसें खचून गेलें. त्यामुळें अंगणांतली मोठमोठ्या शिळाफट्टांची अेक टेकडीहि कोलमडून त्या खड्ड्यांत तिचे पुरुष पुरुष उंचीचे दगड धबाधबा आदळले. 'अपमृत्यु' स्मरणमात्रें टाळणाऱ्या मार्कंडेयाचें स्तोत्र सारखें स्मरत निजलेल्या नी तो अंगारा लावलेल्या नातीस पोटाशीं घेतलेल्या त्या आजीचा पोटाशीं धरलेल्या त्या छोट्या बावीसुद्धां त्या प्रचंड दगडाखालीं चेंदामेंदा झाला !! पण त्याच खड्ड्यांत चार हातावर रुतलेली विमला ! तिनें कोणचेंहि स्तोत्र म्हटलेलें नव्हतें, पण तिचा चेंदामेंदा झाला नाहीं. तिच्या तिन्ही बाजूंनीं मोठ्या शिळा पडून त्या धक्क्यानें ती सुन्न झाली, अितक्यांत पटअीचीं लांकडें तिच्या छातीवर पडून बेशुद्ध झाली- पण मेली नाहीं.

जेव्हां ती अर्ध्या शुद्धीवर आली तेव्हां तिच्या शून्यपणें उघडलेल्या डोळ्यांना वरून त्या खड्ड्यांत अुतरत आलेला एक सूर्यकिरण दिसला. रात्रीं झालेल्या भयंकर अपघातांची अंधुक जाणीव तिला होऊन 'बावी ! माझी बावी ! माझा विक्रम ! माझीं लेकरं !' अशी तिनें अर्धबेशुद्ध किंकाळी फोडली !

'थांबा ! अिथं कुठेंतरी कुणी घायाळ माणूस आहे !' असें अेक सैनिक ती खड्ड्यांतील किंकाळी अैकून वर ओरडला. चारपांच सैनिकांची ती तुकडी काल रात्रीं झालेल्या भयंकर भूकंपांत जे गाडले गेले त्यांना तत्काळ शक्य तें सहाय्य पुरवण्यासाठीं सरकारी

आज्ञेनें त्या भागांत फिरत होते. त्यांनीं लगेच तिथें तो ढिगारा खणून पाहिलें, तों तीन उंच दगडांच्या मध्यें, गुहेंत रत्न पडलेलें दिसावें तसें, त्या अर्धबेशुद्ध युवतीचें वदन दिसलें. लाकडांच्या अलगत पडलेल्या ढिगाऱ्यांतून सैनिकांनीं घायाळ विमलेला बाहेर आणलें; त्या दगडाखालचीं चेंदलेलीं प्रेतेंहि बाहेर काढलीं. त्या नुसत्या बातमीसरशीं विमला पुन्हा बेशुद्ध होऊन पडली !

मार्कंडेयाच्या 'स्मरणमात्रेण' सृष्टिशक्ति आपले अबाढव्य व्यापार या तुच्छ मनुष्याच्या अिच्छेनुसार बदलून अपमृत्यु, अपघात टळतात असें मानणाऱ्यांची ही दुर्गति ! आणि सगळ्यांत आत्याश्चर्य हें कीं, त्या मेलेल्यांत हजारों अत्यंत सच्छील, जन्मभर रामाच्या वा रहिमाच्या पूजा, निमाज, प्रार्थना, मनोभावें करीत आलेले होते ! आणि त्या वाचलेल्यांत कित्येक अत्यंत दुःशील, लुच्चे, लुटारू दारुडे आणि पापीहि होते !

ooo ooo ooo

रुग्णालयांत भूकंपामध्यें वांचलेल्या घायाळांची तात्पुरती शुश्रूषा झाल्यानंतर त्यांच्या अिच्छेप्रमाणें ज्यांना आपापल्या गांवीं जाणें, त्यांना धाडून देण्यास आरंभ झाला. बिचारी विमला ! ती वांचली, बरी झाली, तरी जाणार कुठें ! तिचा पति तरुणपणींच वारल्यानंतर तिचा विक्रम नी ती लहान बाबी हीं दोन मुलेंच काय तें तिचें जीवन नी ती तिची देवलशी मायाळू सासू हीच तिच्या जीवनाचा, आधार होता ! 'जिथें तीं तिघें गेलीं तिथें ! – त्या यमपुरीस !' असं ती धायधाय रडत, जो कोणी तिला विचारी 'तुम्ही कुठं जाणार बाअी ?' त्याला अुत्तर देअी ! शेवटीं तिनें तिचा अेक दूरचा नातलग नागपूरला होता, तिकडे जाण्याचें ठरविलें. सरकारी अधिकारी भूकंपांतील हजारों आपद्ग्रस्तांना शक्य तितक्या त्वरेनें संकटाबाहेर पडतां यावें म्हणून आगगाड्यांमागून आगगाड्या फुकट सोडीत होते. त्यांतील अेका कराचीला जाणाऱ्या गाडींत विमलेलाहि

शेंकडों अितर स्त्रियांसह धाडण्यांत आलें. कराचीपुढें ज्याचें त्यानें आपलें पुढें कुठें जायचें ती व्यवस्था स्वत: लावून घ्यावी असें सांगण्यांत आल्यावरून जसजशी कराची जवळ आली तसतसें आतां पुढें काय करूं ह्या विचाराची धडकी विमलच्या हृदयांत भरूं लागली.

रात्रीं कराचीच्या स्टेशनांत गाडी घुसतांच त्या बायकांच्या डब्यापुढें वेगवेगळ्या दळांचे पांचपंचवीस स्वयंसेवक नम्रपणें अुभे ठाकले. त्यांत मुसलमान स्वयंसेवकांची हिंदु आपद्ग्रस्तांना आपल्या शिबिरांत बळेंबळें नेण्याची घडपड चालू होती. हनुमान दळाचे हिंदु स्वयंसेवकहि त्यांच्या तावडींत ते न जाऊं देण्याची पराकाष्ठा करीत होते. पण विमला आणि दुसऱ्या दोन हिंदु स्त्रिया पीरदादशहाच्या तावडींत सांपडल्याच. पीरदाद पठाण नम्रपणें म्हणाला, ‘ वहिणींनो, ही मनुष्यमात्रावरील सृष्टिक्षोभांची आपत्ति ! यांत कसले हिंदु नी कसले मुसलमान ! अेकी झाली पाहिजे अेकी !’

विमलेस पीरदादच्या मानभावी सहानभूतीची शंका आली; पण ती मनांत म्हणाली, ‘ कांहींतरी धोका आहे. पण आतां गांगरूं तर साफ बुडूं. धीटपणें प्रसंग पडेल तसें वागूं तर कांहीं तोड मिळेल.’

आपणास कोठें नेत आहेत याबद्दल विमलनें एकदोनदां दरडावून विचारलें, पण पीरदादनें लक्ष दिलें नाहीं. शेवटीं विमला हातघाईवर आली. ओरडत आक्रंदत खालीं बसली. हिंदु ‘हनुमान दळा’चे स्वयंसेवक स्टेशनवर तुरळक फिरत होते. अेक तरुण हिंदु स्वयंसेवक त्या बाअीस नीट निरखून पाहून त्वेषानें बेभान झाला. या स्त्रियांना आम्हां हिंदूंच्या हातांत देतोस कीं नाहीं म्हणून पीरदादच्या अंगावर गेला. पीरदादनें सुरा अुपसून म्हटलें, ‘हट जाव ! यह मेरी शादी कीं औरत है ! ही माझी लग्नाची बायको !’ हिंदु तरुणानेंहि ‘ रे हरामखोरा ! ती माझी आअी !’ असें म्हणून सुरा अुपसला. पोलीस धांवले.

अुजेड येतांच विमलेनें त्या हिंदु तरुणास निरखून पहातांच अेकदम धांव घेतली 'विक्रम !' हा तर माझा विक्रम !! माझा प्यारा पुत्र !!' असें स्फुंदत त्याच्या गळयांत मिठी मारली !

होय ! तो विक्रमच होता. भूकंपाच्या धक्क्यासरशी तो घराबाहेरच्या पायऱ्यांवर पडला पण म्हणूनच घराखालीं गाडला गेला नाहीं. तिथून सुटून भटकत हिंदुरक्षक दळांत शिरून क्वेट्ट्याच्या भूकंपांतून पळापळ झालेल्या हिंदु अनाथांना यथाशक्ति सहाय्य देत होता.

ते सारेजण पोलिसांनीं आपल्या अटकेंत ठाण्यावर नेले. पहा-तात तों पीरदाद हा अेक फरारी दरवडेखोर ! लगेच जुनें वॉरंट त्यावर बजावलें गेलें. क्वेट्ट्याकडे त्यानें दोघां हिंदु सावकारांस ठार मारून संपत्ति लुटली होती. त्या नोटा, मोतीं, दागिनेहि त्याच्या-पाशीं धरले गेले. त्याच्या साथीदारांच्या वक्तव्यावरून (जबानी-वरून) सिद्ध झालें कीं, दोन वर्षें हिंदु स्त्रियांमुलांना पळवून नेअून ही टोळी सरसीमेपलीकडच्या पठाण टोळयांना विकी ! क्वेट्टा भूकंप म्हणजे त्यांना अेक पर्वणीच होती ! ह्या हिंदु स्त्रियांनाहि तो तसाच पळवून नेत होता !

विक्रमच्या हातीं विमलेसुद्धां त्या हिंदु स्त्रिया सोंपविण्यांत आल्या. विक्रम आर्यसमाजाच्या आश्रमांत आला. तों त्याच्या मित्रानें त्याला अेक वर्तमानपत्र दाखवून म्हटलें, ' बघ ! महात्मा गांधींनीं भूकंपाच्या संकटांतून मनुष्यजातीची सुटका करणारा अेक अद्भुत अुपाय शोधून काढला !' विक्रम दुर्लक्षमय स्वरांत जिज्ञा-सला, 'कोणता अुपाय बुवा ?' मित्र म्हणाला, ' प्रार्थना ! देवाची प्रार्थना करा ! भूकंपांतून सुटाल !'

' हात्तेच्या ! गांधीजींच्या आधींच माझ्या आजीबाअींनींहि हाच उपाय सांगितला होता ! पण बाबा, अनुभव असा कीं प्रार्थना ही,

भूकंप घालविण्यापेक्षां भूकंप तात्काळ आणण्याची मात्र रामबाणमात्रा असावी ! त्यांतहि या प्रकरणीं तरी माझ्या आजीबाअी महात्मा गांधीजीपेक्षां अधिक युक्तिसंगत बोलत, कारण प्रार्थनेनं भूकंप टळतो हें जरी आजी नी गांधीजी यांचं अेकच मत, तरी अस्पृश्यता पाळल्यानं भूकंप होतो असं देखील म्हणण्याअितकी माझी आजी वहावली नव्हती. अरे ! अस्पृश्यता न पाळणाऱ्या हजारों मुसलमानांचीच बहुवस्ती असलेल्या क्वेट्टा नगराची अेका घटकेंत भूकंपानं धूळधाण केलेली पाहून आतां सनातन्यांनीं कां वरं म्हणूं नये कीं, अस्पृश्यता पाळीत नव्हते म्हणूनच क्वेट्टयास भूकंपाचा भयंकर दंड देवानं दिला !!'

'पण तुला वांचवलं यासाठीं तरी देवाच्या दयाळूपणाचे आभार मान ! तूं तरी कसा वांचलास ?'

'प्रार्थना करीत नव्हतों मी कधींच म्हणून, असं कां म्हणूं नये ? अरे, द्राक्षाचा पिकला घड वरवंटयाखालीं ठेंचावा तसा हजारों दूधपित्या कोंवळ्या लेंकरांचा भूकंपाच्या वरवंटयाखालीं ज्यानं चेंदामेंदा अुडविला तो देव, देव कीं दैत्य ? दुष्ट कीं दयाळू ? खरी गोष्ट अशी आहे कीं, मनुष्याच्या दुष्टतेच्या वा दयाळुत्वाच्या गजानं देवास मोजूं पहाणं हाच मूर्खपणा ! सृष्टीच्या प्रचंड अुलाढालींत त्या वेळीं भूकंप हा अेक गणितागत आला, भूकंप झाला. माझ्या आजीचा वा माझा द्वेष कुणीं केला म्हणून नव्हे ! त्या भूकंपांत जसे अनेक धुळीचे कण वाताहत होअून अुडाले, तसाच अेक कण मी भुअींत गाडला न जातां योगायोगाच्या वाऱ्यावारीं अुडून अिथं पडलों. माझ्यावर दया करण्याच्या मुख्य नी हेतुपुरस्सर बुद्धीनं कोणीं रक्षिलं म्हणून नव्हे ! प्रार्थना ! अरे, ज्या गांधीजींना प्रार्थनांनीं नी अुपासांनीं गुरुवायुपूरचं देअूळ अुघडण्यापुरतं त्या अेका यःकश्चित

झामोरिनचं मन वळवितां आलं नाहीं ते गांधीजी केवळ प्रार्थनेनं भूकंपाचं मन वळतं म्हणून सांगतात नी तुम्ही अैकतां ! तुम्ही सारे वर्ध्याला जा नी प्रार्थना करा माझं हें घड्याळ बंद पडावं म्हणून ! त्या तुमच्या प्रार्थनेनं ह्या माझ्या चिमुकल्या हातघडींतील (रिस्ट-वॉचमधील) टांचणीसारख्या या लंबकाचे कंपदेखील निरोधिले जाणार नाहींत !! आणि त्या प्रार्थनेनं भूकंपांचीं प्रस्फोटकं नी पर्वतांच्या रांगांच्या 'रांगा' अुचलून फेंकणारीं आंदोलनें निरोधिलीं जातील असं तुम्ही म्हणतां ! हा निव्वळ खुळेपणा नव्हे काय ! प्रार्थना ही मनुष्याची आशा आहे; आशापूर्तीची हमी नव्हे !!'

* * *

# पाहिजे ! !

**पारिस नगरांतील** अत्यंत रम्य अशा 'शान्झेलीझे' नांवाच्या राजमार्गानें, यूरोपमध्यें अनेक वर्षे राहिलेले आणि मोत्यांच्या व्यापारांत मानानें नी धनानें श्रेष्ठत्व पावलेले रमाकान्त हे यूरोप अमेरिकेंत थोडे दिवस प्रवास करून देशविदेश पहाण्याची हौस फेडण्यासाठीं आलेल्या आपल्या घनश्याम नांवाच्या अेका लक्षाधीश स्नेह्यासह, शोभा पहात नी त्या नवागत मित्रास स्थलमहात्म्यें सांगत चालले होते. जातां जातां 'प्लेस दी ला कंकार्ड' अर्थात् 'अैक्याचें अुद्यान' ह्या पारीसमधील प्रख्यात स्थलीं येअून अेका अेकान्त बाजूस कोचावर दोघेहि भारतीय गृहस्थ विसावा घ्यावयास बसले असतां रमाकांत म्हणाले,

'घनश्याम, शोभिवंतपणांत ही पारीस नगरी जगांतील नगरींची केवळ राणी आहे राणी ! आणि त्या राणीच्या प्रासादांतील

देवपूजेचें पवित्र देवघरच आहे हें ' प्लेस दी ला कंकार्ड '– ' अैक्याचें अुद्यान !' छिन्नविछिन्न झालेल्या फ्रान्सला त्या सुप्रसिद्ध फरेंच राज्य-क्रांतीच्या मुशींत ओतून फरेंचांनीं त्यांच्या मातृभूमीची जी अखंड मूर्ति निर्मिली तिचें ' अैक्याचें अुद्यान ' हें राष्ट्रीय स्मारक होय. ते पहा ते सुंदर पुतळे, फरान्सांतील प्रांतांच्या त्या प्रतिनिधिक प्रतिमा, फरान्सचीं अुपांगें होत; तीं सारीं त्या राष्ट्रीय यज्ञाग्नींत आपापलीं विभिन्न जीवनें होमून अेकदेह, अेकजीव, अेकप्राण झालीं. तो अेकदेह म्हणजेच ही फरेंच भू ! तो अेकजीव म्हणजेच हें फरेंच राष्ट्र ! आणि त्या राष्ट्रीय अेकतेचें मूर्तिमान प्रतीक म्हणजेच हें ' अैक्याचें अुद्यान !' हें ' प्लेस दी ला कंकार्ड. ' येथूनच ज्या महामंत्रानें पुढें त्रिखंड हादरून सोडलें तो महामंत्र अुद्घोषित झाला– ' स्वतंत्रता, समता, बंधुबंधुता !'

' असेल सोडलें हादरून त्रिखंड त्या मंत्रानें !' रमाकान्ताच्या अवसानास हेटाळीत घनश्याम म्हणाले. ' रावणानें देखील कैलास असाच गदगदा हादरून, हालवून सोडला होता. म्हणजे रावण राक्षस नव्हता असें थोडेंच सिद्ध होतें ! भूकंपहि खंडचें खंड हादरून लक्षावधि मनुष्यास पाताळांत जिवंत गाडून टाकतो. म्हणजे तो अुत्पात ठरत नाहीं कीं काय ! तसाच हा या दांभिक गोऱ्यांचा 'समतेचा नी स्वतंत्रतेचा' महामंत्र ! अहो, राष्ट्रीय वा आर्थिक समता नी बंधुबंधुता तर सोडाच, पण ज्या समतेसाठीं त्यांच्या खिशांतली अेक कपर्दिकहि वेंचली जाती ना ती नुसती वर्णविषयक समता तरी हे गोरे लोक पाळताहेत का ? जिथें जावें तिथें आम्हां हिंदी लोकांची हेटाळणी, दुर्यो नी हिडीसफिडीस ! कां ? यांच्याहून विद्येंत, संपत्तींत कर्तृत्वांत आम्ही व्यक्तिशः कांहीं कमी म्हणून नव्हे; तर ह्यांचा व्यक्तिशः रंग गोरा नी आमचा व्यक्तिशः रंग काळा म्हणून ! ब्रिटनमध्यें मी तर काय पण आमचे देवतेसमान पूज्य असलेले विवेकानंद, टिळक, लजपतराय, गोखले यांसारखे थोर पुरुषहि मार्गानें

जातांना ह्या गोऱ्यांचीं हुच्चीं पोरेंटोरें देखील त्यांची 'ब्लॅकी' 'ब्लॅकी' म्हणून हुर्यो करीत मागें लागतात ! विद्यापीठांत काळयांना मज्जाव, वसतिगृहांत काळयांना मज्जाव, खेळांत काळयांबरोबर खेळणें अपमान, जाल तिथें काळा म्हणून त्यांच्यांतील पाजींतला पाजी गोरा देखील आमची हेटाळणी करणार– शिवणार नाहीं ! पण म्हटलें ब्रिटनचे नी आमचे राष्ट्रीय संबंध आज ते धनी, आम्ही दास, असे पडल्यामुळें त्यांच्या या वर्णद्वेषाला ही अितकी विपारी धार पाजली जात असेल; पण ज्यांच्याशीं आमचा घेण्यादेण्याचा किंवा जितजेते-पणाचा अर्थाअर्थी संबंध नसून केवळ माणुसकीचेंच काय तें नातें, त्या अमेरिकेंत, जर्मनींत फार काय, या तुमच्या समतेचा महामंत्र अुद्घोषिणाऱ्या फरान्समध्येंहि केवळ काळेपणासाठींच आम्हां हिंदी लोकांचा जो पदोपदीं अुपमर्द होतो तो पाहून या गोऱ्यांची मला अगदीं चीड येते. कालच पाहिलेंत ना, सार्वजनिक म्हणून धडधडीत पाटी असलेल्या त्या चहाच्या दुकानांत त्यांच्याच विद्येंत त्यांच्याहून श्रेष्ठ असलेल्या आणि संपत्तींत त्यांच्यासारखे दहा नोकर घरीं राबत असलेल्या मला नी माझ्या त्या विद्वान देशबंधूला केवळ आम्ही रंगानें काळे, म्हणून तुमच्या त्या पारीसमधल्याच अुपहारगृहांत त्या गोऱ्यांनीं कसा मज्जाव केला नी दीडदमडीच्या त्या बाजारी फरेंच पोरीटोरींनीं किती टवाळकी केली ती ? कोण हा अमानुष वर्णद्वेष !'

'अगदीं अमानुष नव्हे ! असमर्थनीय म्हणा, असहनीयहि म्हणतां येथील– पण अगदीं अमानुष नव्हे.' घनश्यामास थोपवीत आणि थंडावीत रमाकान्त ह्मणाले : 'यूरोपियनांना वाटणाऱ्या काळया रंगाच्या तिटकाऱ्याला तुह्मी आतां जो 'वर्णद्वेष' ह्मणून शद्व योजलात, त्यांतील, निदान तो वर्ण हा शद्व तरी आमचा अेक प्राचीन ऋणानुबंधी आहे ! आपल्या वर्णव्यवस्थेस ह्या गोऱ्याकाळ्या रंगाच्या आवडीनावडीचें गालबोट चांगलें हौसेनें रेखून लावलेलें

नव्हतें का ? गोरा तो द्विज, अुच्च. काळा तो शूद्र, तो क्षुद्र,. सत्वाचा रंग श्वेत; तमाचा कृष्ण. परंतु गोऱ्या वर्णाचा पत्ता 'ब्राह्मणवाडींत' आणि काळ्या वर्णाचा पत्ता 'शूद्रवाडींत' असा जरी नोंदला गेला तरी प्रतिलोम अनुलोम आणि गांधर्व विवाहांच्या लग्नमंडपांतून आणि लताकुंजांतून त्या पत्त्यांची सारखी पिसणी होतां होतां आणि उन्हाळ्यांमागून अुन्हाळ्यांच्या झळी लागतां लागतां तो गोराकाळा हा वर्णभेद बेपत्ता झाला. ब्राम्हणांत काळेंपण नी शूद्रांत गोरेंपण मिसळून गेलें. जो अुरला तो वर्णभेद नसून वास्तविक पहातां वर्णद्वेष, जातिद्वेष होय. यासाठीं आतां काळ्यागोऱ्या रंगांचें तीव्र भांडण आपणांत आज तितकेसें अुरलें नाहीं. तरी देखील गोऱ्या रंगापेक्षां काळा रंग हा आपणहि हीणकसच मानतों नाहीं काय ? काळा रंग आपणां श्यामलवर्णीय लोकांसहि हवासा वाटतो असें थोडेंच आहे ? अितकेंच नव्हे, तर श्यामल वर्णांतहि कमीअधिक काळसरपणाप्रमाणें आह्मीहि अगदीं काळेकुट्टपणाचा तिटकारा करतों. ज्याविषयीं आह्मांस तिरस्कार व्यक्तवावयाचा त्यास आपण 'काळतोंड्या' म्हणतों. गदळ असेल त्यास 'कळकट' म्हणतों. सुनेस 'कुठली काळुंद्री पदरीं बांधली आहे ग बाअी आमच्या ! ' ह्मणून चोंच मारणाऱ्या नाकेल्या सासवा आमच्यांतहि आहेतच ! प्रकाश, अुज्वलता आणि सौम्य चाकचक्य हीं मनुष्याच्या नयनांतील ज्ञानतंतूंस आल्हादक वाटावीं अशीच त्यांची स्वाभाविक घडण असल्यामुळें कोणाहि मनुष्यास काळेपणा हा सहजच अुद्वेजक वाटतो. मनांत कोणतीहि विशेष जातीय वा राष्ट्रीय अुद्दामवृत्ति वा विरोध नसतांहि आपणां श्यामल लोकांस अगदीं कोळशासारखा काळाकुट्ट शिद्दी पाहतांच जशी सहजच अेक नकोशी वृत्ति अुत्पन्न होते तशीच शिद्द्याहून आम्ही जितके अुजळ तितकेंच आमच्याहूनहि अुजळ असणाऱ्या अिटालीयनांस वा दुधासारखे शुभ्र असणाऱ्या गोऱ्यापान रशियनादिकांस आमचा श्यामल रंग थोडासा अुद्वेजक वाटणें साहजिक आहे हें आम्हींहि ध्यानांत धरलें पाहिजे. काळा रंग हें शारीरिक आकर्षणाच्या

दृष्टीनें आमच्यांत असणारें अेक किंचितसें व्यंग आहे. त्यास गोऱ्या लोकांनीं सहजासहजीं व्यंग म्हणून म्हटलें तरी आपण न चिडणेंच बरें. तसा अुपहास त्यांनीं केल्यास तो त्यांच्या सभ्यपणास कमीपणा आणणारा आहे– आपल्या नव्हे, असें जाणून त्याची शक्य तों अुपेक्षाच करावी!'

**घनश्याम**– परंतु जेव्हां काळा रंग पहातांच ह्या गोऱ्यांना वाटणारा, तुम्ही ज्यास 'साहजिक' म्हणतां, तो अुद्वेग साहजिकपणाची कक्षा सोडून खोडसाळ अुपद्रवाचें स्वरूप धारण करूं लागतो तेव्हां? त्यांचा वर्णद्वेष हा जातिद्वेषाचें आणि राष्ट्रद्वेषाचेंच दुष्ट हत्यार होअूं पहातो तेव्हां? तेव्हां तरी त्याची आम्हांस चीड नको का यावयाला? अहो, अिंग्लंडमध्यें असतां अेका भरसभेंत अेक मिशनरीमहाशय गंभीरपणें सांगूं लागले कीं, 'अेशिया, आफ्रिका, अमेरिका येथील काळ्या रंगाच्या लोकांवर युरोपियनांनींच प्रभुत्व गाजविणें योग्य होय. हा अीश्वरी संकेतच असला पाहिजे. आणि तो संकेत व्यक्तविण्यासाठीं देवानें आमचा वर्ण गोरा केला आणि त्यांचा काळा. कारण कोणत्याहि जातीच्या वाङ्मयांत वा समाजांत शुचिता, शुद्धता, पवित्रता, आरोग्य, बल आणि प्रभुत्व ह्यांचा रंग श्वेत, गोर, स्वच्छ असाच निर्देशिला जातो आणि काळा रंग हा हीनतेचें, क्रूरतेचें, कळकटपणाचेंच द्योतक मानलें जातें!' ह्या त्यांच्या चर्पटपंजरींतील अंतस्थ दुष्ट हेतु राष्ट्रद्वेषावांचून दुसरा कोणताहि नाहीं हें पाहून मला फार चीड आली आणि मी तिथल्या तिथेंच प्रत्युत्तरांची वेळ येतांच ताडकन् अुभा राहून त्या मानभावी मिशनरीस हटकलें कीं, 'देव, देवदूत, देवतांचा रंग गोर– शुभ्र–स्वच्छ असाच वर्णिलेला असल्यामुळें जो जो गोरा वा पांढरा तो तो देव, देवता वा देवदूतच असला पाहिजे. काळ्याहून श्रेष्ठ, सुश्रीक, बलवान आणि प्रभुत्वास पात्र असला पाहिजे. हें आपलें तर्कशास्त्र आम्हाला तंतोतंत पटलें आहे. आतां हत्ती हा बहुधा काळा

असतो आणि हजारों डुकरें पांढरीं स्वच्छ असतात. तेव्हां यापुढें डुकर हेंच हत्तीहून बलवान आणि सुश्रीक असें आपणां सर्वांनीं समजलें पाहिजे ! अंगावर कोड अुठलें कीं काळा मनुष्यहि अितका गोरापान दिसूं लागतो कीं, दुरून पहातांच तो कोणी गोरा मिशनरीच येतो आहे कीं काय असें वाटावें ! तेव्हां यापुढें कोड फुटलेल्या मनुष्यास आह्मी देवदूतासारखा सन्मान दिला पाहिजे. व्याघ्रसिंहाहून रानचे ससे अगदीं हिमगौर वर्णाचे असतात; अर्थात् यापुढें रानांतील राज्याचें प्रभुत्व सिंहव्याघ्रांस पदच्युत करून, सशांसच अर्पिलें पाहिजे. यापुढें सिंहानें सशास भ्यायलें पाहिजे ! ग्रीक सैन्याच्या त्या शिकंदरी सेनापतीस भारतीय चंद्रगुप्तानें रणांगणात जेव्हां धूळ चारली तेव्हां त्या यवनाधिपति सेल्युकसनें त्या चंद्रगुप्ताच्या पायावर जयश्रीच नव्हे तर आपली राजकन्याहि करभार म्हणून वाहिली. यास्तव ते लाखो पराभूत गोरे ग्रीक सैनिक नी तो ग्रीक सेनानी सेल्युकस हे सारे त्या लाखो श्यामल भारतीय सैनिकांहून नी त्या विजयी चंद्रगुप्ताहून शतपटीनें अधिक काळेकभिन्न असले पाहिजेत अशा अेका नवीन शोधाची भर आतां अितिहासांत घातली पाहिजे ! तुम्ही आमच्या भारतीयांतील गौरवर्णीय जातींहून जितके अधिक गोरे आहांत तितकेच ते रशियन लोक तुम्हां ताम्रमुखांहून अधिक गोरेपान– अगदीं वैदिक 'हंस' वर्णाचे आहेत. अर्थात् अिग्लंडवर रशियनांचेंच प्रभुत्व असावें ही तुमच्याच सूत्राप्रमाणें देवाची अिच्छा असली पाहिजे. तर मग बोला, अिग्लंडचा राजमुकुट रशियनांचे हवालीं केव्हां करायचा ?' रमाकांत, ह्या माझ्या भडिमारासरशीं तो मिशनरी पाण्यांत टाकलेल्या ढेंकळासारखा विरघळून गेला आणि त्या शेंकडों गोऱ्या स्त्रीपुरुषांनींच माझ्या वाक्यागणिक मला टाळ्या दिल्या !'

**रमाकान्त–** झालें तर ! आमच्या सावळ्या रंगासाठीं कोणी मर्यादेबाहेर दुष्ट बुद्धीनें अुपमर्द करूं लागला तर त्याचे दांत असे त्याच्याच घशांत कोंबले कीं झालें !

**घनश्याम**– अहो, पण, गोऱ्या लोकांतील मोठमोठे शहाणे आणि तत्वज्ञ देखील गोऱ्या जाती ह्या प्रभुत्वास निसर्गतः पात्र असून काळ्या रंगाचे लोक हे निसर्गतःच जीवनार्थ कलहांत टिकाव धरण्यास अक्षम आहेत असा ठाम सिद्धांत ठोकून देतात हें आश्चर्यंच नव्हे काय ?

**रमाकान्त** – त्यांत कसलें आश्चर्य आहे ! शहाणे लोकहि लुच्चे नसतात कीं काय ? अहो, ह्या गोऱ्या मूर्ख मिशनरींची काय कथा ? तो ॲरिस्टॉटलसारखा तत्त्वज्ञांचा मुकुटमणीदेखील एकदां असेंच भकून चुकला कीं, ग्रीस देश हा देवानें जगावर स्वामित्व गाजविण्यासाठींच अुत्पन्न केला असला पाहिजे ! कारण ? जगाचें राज्य त्याच्या मध्यभागीं राहूनच चांगलें चालवितां येणार; आणि ग्रीस हाच जगाच्या मध्यभागावर– आशिया, युरोप नी आफ्रिकेच्या संगमस्थानीं निर्मिलेला आहे. अर्थात् तोच जगद्राज्याचा औश्वरनिर्मित केंद्र असला पाहिजे ! ॲरिस्टॉटला माहीत असलेल्या 'जगा' वर त्या काळीं ग्रीसचें प्रभुत्व होतें ह्मणून त्याला हा सिद्धांत सुचला. पुढें तोच ग्रीस रोमचें पादपीठ झालें नी आज आहे कीं नाहीं तें जगाच्या आलेख्यांत ( नकाशांत ) सूक्ष्मदर्शक यंत्रांतूनच पाहिल्यास दिसतें ! गेल्या शतकांतीलच गंमत पहा. युरोप-ह्मणजेच पाश्चिमात्य राष्ट्रें हीं प्रभुत्व गाजविण्यास निसर्गतःच सक्षम आणि पौर्वात्य दास होण्यास, हा सिद्धांत बोकाळला होता, तोंच जपाननें रशियाचें कंबरडें मोडलें ! तेव्हां जपान अपवाद ठरून अिंग्लंड आणि जपान हीं दोन्हीहि प्रबल राष्ट्रें ह्या गोलार्धाच्या अुत्तरीय शीतकक्षेंत असल्यामुळें आणखी कांहीं शहाण्यांनीं नवा सिद्धांत काढला कीं, अुत्तरीय शीतकक्षेंतील देश हेच दाक्षिणात्य अुष्ण कक्षेंतील देशांचे नैसर्गिक विजेते असणार ! पण रोम दाक्षिणात्य कक्षेंतच मोडणारें असतांहि ह्या अुत्तरीय शीतप्रधान ब्रिटनभूमीला त्यानें शतकोंशतकें आपली दासी करून ठेवलेली होती ! त्या ब्रिटनाहून काळसर अस-

णाऱ्या रोमच्या साम्राज्यांत ब्रिटनच्या गोऱ्यापान रंगाचें अस्तित्व जर कशांत अुपयोगी पडलें असेल तर ब्रिटनच्या गोऱ्यापान कन्यकांचा रोमन सैनिकांसाठीं आणि सरदारांसाठीं आवडत्या दासी म्हणून पुरवठा करण्याच्या कार्यींच काय तें होय ! आपल्या लाटंबाजींचें आणि अहंकाराचें समर्थन निसर्गाच्या आणि देवाच्या नांवानें करण्याची खोड मनुष्यमात्रास लागलेली आहे. ठगांच्या अत्याचारांचीहि अेक देवता होती ! आणि सैतानहि सोयिस्कर वाटलें तर आपल्या समर्थनार्थ वायवलचा आधार घेत असतो.

**घनश्याम**– पण मग काळा रंग हें अेक नैसर्गिक व्यंग आहे हें मघां तुह्मीच कसें म्हणालांत ?

**रमाकान्त**– आमच्यांत तें अेक व्यंग आहे असें म्हटलें म्हणजे त्या गोऱ्यांत कांहींच व्यंग नसून आमच्याहून सर्वतोपरीं ते श्रेष्ठ आहेत आणि जगाच्या अंतापर्यंत श्रेष्ठच रहाणार आहेत असें ठरतें कीं काय ? देहाच्या रंगाचा संबंध मुख्यतः व्यक्तीशीं. राष्ट्रीय शक्तीशीं, क्षमतेशीं किंवा कर्तबगारीशीं गोरेपणाचा वा काळेपणाचा लवलेश संबंध नाहीं. आज आमचें श्यामलवर्णीय हिंदी राष्ट्र जर गौरवर्णीय युरोपियनांपेक्षां राष्ट्रशक्तींत कनिष्ठ ठरत असेल, अवनत असेल तर तो परिणाम आमच्या सामाजिक, राजकीय आणि धार्मिक दुर्गुणांचा नी दूधखुळेपणाचा आहे, आमच्या श्यामलवर्णाचा किंवा त्यांच्या गौरवर्णाचा नव्हे ! ते दुर्गुण नी दूधखुळेपणा नव्हता तेव्हां आम्ही राष्ट्र ह्या दृष्टीनें श्यामल असूनहि जगास भारी झालेलों होतों– ते दुर्गुण सुटतांच पुन्हाहि असेच भारी होअूं ! लंकेच्या गोऱ्या रावणाचीं दाही शिरें छाटणारा तो अयोध्येचा राजपुत्र घनश्यामलच होता ! तो गीताद्रष्टा सुदर्शनधारी श्रीकृष्णहि घनश्यामच होता ! आजहि अर्धजगत् ज्याच्या चरणांची धूळ अंगारा म्हणून मस्तकीं धरीत आहे त्या देवकल्प बुद्धाहून कुणी युरोपियन टॉमी अधिक गोरा आहे म्हणून अधिक श्रेष्ठ ठरणारा आहे

कीं काय ! जपान्यांना मिशा नसतात म्हणून जसे ते मिशाळ रशियनांहून पौरुषांत हीनतर ठरले नाहींत तसेंच आमचा रंग काळा म्हणून आम्हीहि जित झालों नाहींत ! अेक वेळ जपानच्या वैयक्तिक बुटकेपणामुळें राष्ट्रीय शक्तीशीं किंचित कमीपणा येण्याचा संभव असूं शकेल. पण आमच्या वैयक्तिक काळेपणाचा किंवा त्यांच्या वैयक्तिक गोरेपणाचा राष्ट्रीय शक्तीशीं वा श्रेष्ठकनिष्ठतेशीं लवलेश संबंध पोंचू शकत नाहीं.

**घनश्याम** – आणि वैयक्तिक श्रेष्ठकनिष्ठतेशीं तरी काळ्या वा गोऱ्या रंगाचा कोणचा मोठा संबंध आहे ? आज देखील हिंदी विद्यार्थी युरोप-अमेरिकेच्या कोणत्याहि विद्यापीठांत गोऱ्या विद्यार्थ्यांच्या रतिभरहि मागें नसतो. परकी देशाच्या, भाषेच्या पक्षपाताच्या अडचणीशीं त्याला तोंड द्यावें लागत असतांहि त्या अडचणी ज्यांस मुळींच नसतात त्या गोऱ्या विद्यार्थ्यांमध्यें हिंदी विद्यार्थी व्यक्तिशः अनेक स्थळीं अुलट सरसच ठरलेला दिसतो. वैद्यक, निबंध, शिल्प, यंत्र, गणित – कोणच्याहि विषयांत कोणच्याहि युरोपियन पीठांत हिंदी तरुण पहिल्या दहा क्रमांकांतच बहुधा झळकतो– अगदीं पहिले क्रमांकहि तो अनेकदां पटकावतो. या बौद्धिक समानतेप्रमाणेंच सैनिकयोग्यतेंतहि हिंदी सैनिक गोऱ्या सैनिकांशीं व्यक्तिशः तुल्यबळ तरी आहेच आहे ही गोष्ट जर्मन महायुद्धांत अगदीं यूरोपांतील ताज्यांतील ताज्या शस्त्रास्त्रादि शूरांतील शूर अशा गोऱ्या जर्मनसैन्याशीं आमच्या शीख, गुरखा सैनिकांनीं ज्या लढाया झुंजविल्या त्यांवरून निर्विवादपणें साऱ्या यूरोपनें मानली आहे. तीच गोष्ट श्रमिक शक्तीची आहे. मारिशसपासून तों ग्वायनापर्यंत, कानडापासून कालिफोर्नियापर्यंत, अति शीत वा अति अुष्ण अशा कोणत्याहि वायुमानांत हिंदी श्रमिक हा– त्यास कोणत्याहि राजशक्तीचा ममत्वाचा पाठिंबा नसतां युरोपियन क्षत्रियांच्या चढाओढींत टिकून रहातो; नव्हे, आपल्या साध्या रहाणीनें

आणि कष्टक्षमतेनें त्यांना न झेपेल असा प्रतिस्पर्धी बनूं शकतो. फीजी, ग्वायना, आफ्रिका, मारिशस प्रभृति जगांतील अनेक प्रदेशांत दासासारखे करारबद्ध करून नेलेल्या लाखों हिंदी श्रमिकांनी केवळ आपल्या सहिष्णुतेच्या बळावर तिकडे मोठमोठ्या हिंदी वसाहती वसविल्या आहेत आणि ज्या गोऱ्या मळेवाल्यांचे ते दास ह्मणून गेले त्यांच्याच तोडीचे धनाढ्य मळेवालेहि त्या हिंदी श्रमिकांतील कित्येक कर्तबगार पुरुष हळुहळू झालेले आहेत! तेव्हां आमच्या काळ्या रंगामुळें युरोपियन गोऱ्यांच्यापेक्षां कोणच्याहि रीतीनें शौर्य, धैर्य, बुद्धिमत्ता, साहस, श्रमक्षमताप्रभृति पौरुषाच्या वैयक्तिक गुणांत आम्ही लेशमात्र हीनतर ठरलेलों नाहीं. मग त्या काळ्या रंगास आमच्यांतलें व्यंग ह्मणून, आमच्यांतील एक उच्चार करण्यासारखी नैसर्गिक उणीव ह्मणून, आपण कोणत्या अर्थी समजावी आणि कां म्हणून मानावी?

**रमाकान्त**– केवळ ह्या अगदीं दुय्यम अर्थींच मी ती मानतों कीं, त्यामुळें आपल्या शारीरिक सौंदर्यास अंशतः बाध येतो! सौंदर्य हें माणुसकीचा कोणताहि महत्वाचा गुण नसलें, शौर्य, धैर्य, दया, दाक्षिण्य, प्रामाणिकपणा, जनहिततत्परता, थोडक्यांत म्हणजे शील हें जरी सौंदर्याहून शतपटीनें श्रेष्ठ असा सद्‌गुण असला, शील असून सौंदर्य नसलें तरी ती उणीव तुच्छ, पण सौंदर्य ओसंडत असलें तरी शील नसलें तर तें माणूस माणूस नसून राक्षसासारखें भयंकर, हें जरी खरें असलें तरी शील असूनहि सौंदर्य जर असलें तर तो मनुष्य देवदूतासारखा शोभूं लागतो हेंहि कांहीं विसरतां कामा नये.

**घनश्याम**– मान्य. पण गोरेपणा म्हणजेच सौंदर्य नव्हे. सौंदर्यांतहि-शारीरिक सौंदर्यांतहि–शरीराची सुबक ठेवण, सुरेख अंगलट हीच नुसत्या शुभ्रतेहून, नुसत्या गोरेपणाहून, अधिक नयनानंदकारी असते. आणि सुरेख अंगलटींत आणि सुबक तोंडावळ्यांत आम्ही भारतीयांचें सौंदर्य हें युरोपियनांहून एकंदरींत लवलेश कमी

असता नाहीं. मी मघां म्हटल्याप्रमाणें डुकरें पांढरींशुभ्र असतात– हत्ती काळे असतात. पण डुकर तें डुकर– हत्ती तो हत्ती !!

**रमाकान्त**– पण हत्ती असूनहि जर तो त्यांतल्यात्यांत शुभ्रहि असला तर तो शोभेच्या प्रश्नापुरता तरी अधिक अभिलषणीय ठरणार नाहीं का? अैरावत हिमधवल–यास्तवच देवांनींहि रत्न म्हटला. पांढरा हत्ती हा आम्हीहि राज्यलक्ष्मीचें शुभतम भूषण समजतों ! तीच गोष्ट या आधुनिक शरीरसौंदर्याच्या विषयीं. सुबक वा सुडौल देहयष्टि असूनहि त्यांना हेमगौर किंवा हिमगौर अंग-कांतीची देणगी निसर्गाकडूनच लाभलेली असल्यानें अेकंदर शरीर-सौंदर्यांत ते श्रेष्ठ ठरतात. कारण कांहीं झालें तरी गोरेपणा हा शरीरसौंदर्याचा एक अनुपेक्षणीय घटक आहे आणि काळेपणा हा सौंदर्यास बाधक आहे हें नाकारण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सोन्या-मोत्यांचे अलंकार कोण्या काळ्याकुट्ट शिद्दीणीला घातले तर ती होती त्याहून चांगली दिसेल, पण तिच्या काळ्या रंगास त्या सोन्या-मोत्यांच्या तेजानें जसा थोडासा अुजळा येतो तसाच तिच्या डांबरी काळ्या छायेनें त्या सोन्यामोत्यांसहि किंचित् कळकटपणा' आल्या-शिवाय रहात नाहीं. कोण्या अीषत् श्यामल कन्यकेला तेच सोन्या-मोत्यांचे अलंकार अधिकच शोभतात आणि तीं सोनेंमोतींहि सोन्या-मोत्यांसारखींच दिसतात. पण अेखाद्या गोऱ्यापान कन्यकेला तेच सोन्यामोत्याचे अलंकार घातले असतां तिची कांति किती खुलते ! सौंदर्य जसें सांडू पहातें ! आणि सोन्याचे अलंकार तिच्या कांतीनें सोन्याहूनहि पिवळे आणि मोतीं मोत्यांहूनहि पाणीदार भासतात !! माणूस हा प्राण्याचा अनेक गुणांत राजा आहे. सौंदर्यांतहि सुंदर प्राण्यांचा जेव्हां तो राजा शोभतो तेव्हां तें त्याच्या त्या अेकंदर श्रेष्ठतेस अधिकच साजतें आणि सौंदर्यांतहि निसर्गाची राणी साज-ण्यास मानवी सुंदरतेची सुवर्णप्रभ देहकांती; सोन्याच्या कोंदणांतच खुलून दिसावयास हवी. मोरासारख्या सुंदर प्राण्यास वा हरणा-

सारख्या सुरेख मृगास एखादी काळी कन्यका कुरवाळीत अुभी राहिली तर ती सुंदरतेंत त्यांची स्वामिनी शोभण्यापेक्षां दासीच भासूं लागेल. पण मोरास वा हरिणास कोणी गोरीपान सुरेख कन्यका कुरवाळीत राहिली तर ती सौंदर्यांतहि त्यांची राणीच साजेल !

**घनश्याम**— पण मी म्हणतों निदान आपणां आर्यांचा रंग वैदिक कालांत तरी हिमासारखा किंवा सोन्यासारखा गोरापान होता ही गोष्ट त्या काळच्या वैदिक वर्णनावरून स्पष्ट असतांहि आमचा रंग पुढें अितका काळा कां पडत गेला ?

**रमाकांत**— त्याची पुष्कळ कारणें सांगतां येण्यासारखीं आहेत. पण इतर कृष्णवर्णीयांसह झालेले अतिलोम अनुलोम वा संकर रक्तबीजसंबंधप्रभृति दुय्यम करणें वगळलीं असतां आपणां भारतीय आर्यांपुरतें तरी आपला गोरा रंग काळा पडण्याचें प्रमुख कारण म्हटलें म्हणजे आमच्या देशाचें ऊष्णतामान हेंच होय. म्हणूनच आपल्या देशांत काश्मीरासारख्या शीत प्रांतांत आजहि गोरापान रंग पुष्कळ प्रमाणांत टिकलेला आहे —आणि मद्राससारख्या अुष्ण प्रांतांत ब्राह्मणहि भिल्लासारखे काळवंडून गेलेले दिसतात. जे युरोपियन लोक ब्राझिल प्रभृति अुष्ण अमेरिकेंत किंवा अत्युष्ण आफ्रिकेंत वसाहती करून राहिले त्यांचा गोरा रंग अेका चारपांच पिढ्यांतच ध्यानांत येण्यासारखा काळवंडत जात आहे. मग आज पांचहजार वर्षांच्या अुष्ण वायुमानानें आम्ही भारतीय आर्य अितके काळवंडलों यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

**घनश्याम** — जर आमचा गोरा रंग अुष्ण वायुमानानें पांच हजार वर्षांत अितका काळवंडला तर तो पुढच्या पांच हजार वर्षांत आफ्रिकेच्या शिद्दयांसारखा अगदीं कोळशाप्रमाणें काळाकुट्ट होणार कीं काय ? आणखी एक गंमतीची शंका:— आज कोळशासारख्या असणाऱ्या शिद्दयांच्या काळ्या रंगावर आफ्रिकेच्या भयंकर अुष्णतेचे ताप बसतां बसतां तो पुढें माणिकरत्नांसारखा तेजःपुंज होऊन

अुठणार नाहीं कशावरून ! कारण कोळशांचींच कुठें कुठें माणिकें, रत्नें होतात म्हणून ऐकतों !

**रमाकान्त**— पण दहा हजार वर्षांनीं पुढें माणिक-रत्नासारखा चमकदार रंग व्हावा म्हणून आधीं पांच हजार वर्षे कोळशासारखीं काळींकुट्ट तोंडें मिरविण्यास सिद्ध आहांत कां ? कोळशाचींच पुढें माणिकें होतात ही तुमची क्लृप्ति गृहित धरून विचारतों.

**घनश्याम**— अहो, सिद्ध न होऊन करणार काय ? आपण म्हणतां तसा जर अुष्ण वायुमानाचा हा नैसर्गिक परिणाम असेल तर हिंदुस्थानच्या नागरिकांना दिवसेंदिवस अधिकाधिक काळें पडण्यावांचून गत्यंतरच नाहीं. अत्यंत क्षुल्लक का होईना पण शारीरिक सौंदर्यातलें हें व्यंग आम्हांस केव्हांहि पुसून टाकतां यावयाचें नाहीं. टिकाअूपणांत युरोपच्या आम्हीं व्यक्तिशः समक्ष वा वरचढ असतांहि दिखाऊपणांत नेहमींच हीन ठरणार ! कारण नैसर्गिक वातावरण कोण बदलूं शकणार !

**रमाकांन**— निसर्गच ! अहो, निसर्गाचे मनुष्यास सोयीस्कर नसलेले नियम बदलून देणारा प्रतिनियम निसर्गच आम्हांस अनेक वेळां पुरवीत आलेला आहे; विषास प्रतिविष आणि रोगास औषधें देत आलेला आहे ! ! काळ्या जातींत दोन भेद पाडतां येतील. मनुष्याची अुत्पत्ति हीं वानरां वा मर्कटांचाच विकास मानला तर ह्या प्राण्यांत कांहीं लाल तोंडांचीं, कांहीं काळ्या तोंडांचीं तर कांहीं शुभ्र असतात. ह्यावरून त्यांना मनुष्यपण येअूं लागलें. तसें मनुष्यांतहि त्या वंशपरंपरेप्रमाणें मूळपासूनच काळा, तांबुस वा श्वेत वर्ण अुतरला असावा. ज्या मानवजाती कधींतरी गोऱ्या होत्या असा पुरावा मुळींच मिळत नाहीं, त्यांना हें स्पष्टीकरण लागू पडेल. पण आपल्या भारतीय आर्यांचा रंग मूळचा अगदीं 'हंस'धवल आल्याची निश्चितीच असल्यानें आपण आज काळसर जे पडत

चाललों आहों तो मुख्यत्वेंकरून अुष्ण वायुमानाचाच अर्वाचीन परिणाम असला पाहिजे, अपरिवर्तनीयपणें ठाम झालेला आनुवंशाचा नाहीं. कारण अजूनहि आपल्या अनेक जातींत स्पेनपुर्तुगिजांअितका तरी गोरेपणा असणारीं माणसें आढळतातच. अर्थात् ज्या अर्थी सर्व आर्यांनाच अुष्ण वायुमानांत रहावें लागलें असूनहि अद्याप सगळेच अगदीं काळे झाले नाहींत तर अेका कुटुंबांतील भावंडांत सुद्धां कांहीं युरोपांतील स्पेन-इटलींत सहज मिसळून जावीं अितकीं गोरीं मुलें नी कांहीं काळीं निपजतात, त्या अर्थी भारतीय अुष्णतामानाचा आमच्या मूळच्या गोऱ्या रंगावर होणाऱ्या काळ्या परिणामास हाणून पाडून त्या वातावरणांतहि गोरेपणा टिकवूं शकणाऱ्या माता निसर्गाच्या बटव्यांत असल्याच पाहिजेत.

**घनश्याम**– आपण म्हणतां तशी माता सांपडणें मनुष्यास शक्य आहे का ?

**रमाकान्त**– मनुष्यानें आजवर जर कोणच्या शास्त्राकडे अत्यंत दुर्लक्ष केलें असेल तर तें गर्भशास्त्राकडे होय. अितर पदार्थांवर आपणास जसे वाटेल तसे विच्छेदनात्मक वा विश्लेषणात्मक प्रयोग करतां येतात तसे गर्भावर करणें अति दुर्घट हेंहि त्या दुर्लक्षाचें अेक कारण आहे खरेंच. परंतु आतां मनुष्याच्या जीवनाशीं अत्यंत संबद्ध असतांहि आज मनुष्यास ज्ञात असणाऱ्या सर्व शास्त्रांत अत्यंत मागसलेले असणाऱ्या त्या गर्भशास्त्राकडेहि शास्त्रीय शोधकांचें लक्ष वेधलें जाअूं लागलें आहे. मनुष्याची अुंची वाढविणाऱ्या ग्रंथी कोणच्या, मस्तिष्कांतील कोणच्या ज्ञानपिंडांचीं वा ज्ञानतंतूंचीं कार्यें कोणचीं, गर्भावर विभिन्न अन्न-पाणी-प्रकाश ह्यांचे काय विभिन्न परिणाम घडतात, आनुवंशाचा ( हेरिडिटी ) परिणाम कुठपर्यंत अपरिवर्तनीय समजावा लागेल आणि परिवर्तन ( व्हेरिएशन ) मग तें शारीरिक असो वा मानसिक कुठें कसें होअूं शकतें, अित्यादि अनेक महत्वाचे शास्त्रीय सिद्धांत आमच्या ज्ञानाच्या

आटोक्यांत येत आहेत. मुलगा किंवा मुलगी जें कोणचें अपत्य हवें असेल तेंच नेमकें होण्याचा वैज्ञानिक निश्चितीचा नियमहि सांपडल्यासारखाच आहे. जन्माच्या आधींच गर्भाचा लिंगनिर्णय करतां येअूं लागला आहे अितकेंच नसून जन्मानंतरहि शस्त्रक्रियादिक अुपायांनीं लिंगपरिवर्तन अनेक प्रकरणीं करण्यांत आलें आहे. कालपर्यंत ज्यांस आपण मेलेले समजून पुरून वा जाळून टाकूं अशा कांहीं हृदयविषयक रोगांनीं मेलेल्यांना जिवंत करतां येअूं शकतें ! फार काय, पुरुषसंभोगावांचून स्त्रियास गर्भसंभव नी प्रजोत्पादन नुसतें टोंचून घेतल्यानेंहि साध्य आहे ही गोष्ट डॉ. कोअेर्नर यांच्या आश्चर्यकारक प्रयोगावरून आतां मान्य केलीच पाहिजे असें दिसतें. फार नको आणखी दोनशें वर्षांच्या आंत जर शास्त्रज्ञांनीं गर्भविज्ञानावर अगदीं नेटाचा हल्ला चढविला आणि वैज्ञानिक प्रयोगांचा मारा सारखा चालूं ठेवला तर आज आपण कपडा जसा हवा तसा बेततों तसा मनुष्य मागणीप्रमाणें घडवितां आला ना— अितकी अुंची, पुरुष कीं स्त्री, असा रंग, अशी मुद्रा, असे केंस, अितकी बुद्धि, अशीं मापें घेअून मनुष्य घडवितां आला ना— तरी मला आश्चर्य वाटणार नाहीं ! कारण निसर्ग हा मनुष्यगठन ज्या अर्थी नियमांनींच करतो त्या अर्थीं ते नियम समजतांच त्यांत हवी ती निवड करणें मनुष्यांस शक्य झालेंच पाहिजे. ती शक्ति त्या निसर्गानेंच मनुष्यांत ठेवली आहे असा अनेक प्रकरणीं— अपवाद वजा जातां आजपर्यंतचा अनुभव आहे.

**घनश्याम**— परंतु असे मनुष्यनिर्मितीचे शोध ज्या ज्या शास्त्रज्ञांनीं लावले त्यांना रंगपरिवर्तनाचा शोध अजूनहि लागला नाहीं यावरून तो दुर्घटच दिसतो नाहीं का ?

**रमाकान्त**— त्याचें अेक कारण आहे. यूरोपियन वैज्ञानिकच आज संशोधनाचे नेते. ते गोरे असल्यामुळें रंगपरिवर्तनाची आवश्यकताच त्यांस नसल्यानें त्यांनीं त्या प्रकरणीं कसून यत्नच केले

नाहींत. पण ब्राझीलसारख्या अुष्ण प्रदेशांत जे गोरे वसाहतवाले काळवंडू लागले आहेत त्यांचें लक्ष गोरा रंग टिकविण्याकडे असून त्यांनीं त्या कार्यीं पुष्कळ प्रगति केली आहे. काळया अुंदिरांवर प्रयोग करून विशिष्ट रसायन टोंचल्यानें ते पांढरे शुभ्र होतात असें सिद्ध झाल्याचें अलीकडेच अैकिवांत आलें. परंतु काळ्या रंगास धुऊन देहास गौरवर्ण करण्याची आवश्यकताच भारतास आज निकडीची असल्यानें भारतीय वैज्ञानिकांनींच हा प्रश्न तावडतोब हातीं घेतला पाहिजे. जर ते त्यावर आपल्या बौद्धिक बळाचा मारा सारखा करतील तर प्रयोगांतीं असें अेखादें रसायन सांपडल्या-वांचून बहुधा रहाणार नाहीं कीं, जें अंगांत टोंचलें असतां वा गर्भांत संचविलें असतां या पिढीचा वा पुढील पिढ्यांचा रंग आमच्या पूर्वजांप्रमाणें पुन्हा गोरापान होऊं शकेल.

**घनश्याम–** खरोखरच जर असा अेखादा रंगपरिवर्तनाचा शोध लागला तर मला तुमच्याहूनहि अधिक आनंद होअील ! यद्यपि शौर्य, धैर्य, बुद्धि, युक्ति, दया, दाक्षिण्य प्रभृति माणुसकीच्या कोण-च्याहि महत्वाच्या टिकाअू गुणांत भारतीय व्यक्ति ही युरोपियन व्यक्तीशीं व्यक्तिशः तुल्यबळच ठरते आणि शारीरिक सौंदर्याच्या सापे-क्षतः अुपेक्षणीय असणाऱ्या दिखाऊ गुणांतहि देहाच्या सुरेख ठेवणींत हीनतर ठरत नाहीं तरीहि जो नसल्यास मुळींच नडत नाहीं, पण असल्यास हवासाच आहे तो गौरवर्णहि जर आम्हांस लाभला तर सोन्याहून पिवळेंच होअील ! तर मग आतां प्रथम विशेषतः आमच्या भारतीय वैज्ञानिकांचें लक्ष हा रंग-परिवर्तनाचा शोध लावण्याकडे प्रबलपणें वेधण्याचा तुम्हीं प्रयत्न करा आणि जिकडे तिकडे प्रसिद्ध जाहिराती फडकूंद्यात कीं, 'पाहिजे ! देहाचा काळा रंग बदलून गोरा करणारें रसायन पाहिजे ! ' हें काम तुमचें. मी म्हटल्याप्रमाणें जो कोणी संशोधक असा अुपाय शोधील त्यास दहा लक्ष रुपये निनांवी पारितोषक धाडून देण्याचें काम माझें ! – माझा पत्ता मात्र कुणालाहि लागूं दिला न पाहिजे !

**रमाकांत**– अच्छा; मी माझ्या कामास लागतोंच म्हणून समजा– पण माझाहि पत्ता न लागूं देतां !

असें म्हणत ते दोघेंहि अंधेरांत बेपत्ता झाले !

००० ००० ०००

हा लेखहि आमचेकडे प्रेषकाच्या पत्त्यावांचून आलेला आहे.

००० ००० ०००

नाहींतरी कोणत्याहि मानवी लेखाचा **मूळ प्रेषक** कोण याचा पत्ता कोणासहि लागत नसतोच ! !

# ध्वनिलेख

आजकाल कलकत्ता, मुंबईसारख्या मोठमोठ्या अर्वाचीन महानगरांतूनच नव्हेत, तर तालुक्याच्या लहानसहान नगरांतूनहि ध्वनिलेख (फोनोग्रॅफ) ही अेक अगदीं आगगाडी, आगपेटी-अितकीच नित्य व्यवहारांतील, बायकामुलांच्याहि ओळखीची नी आवडीची वस्तु झालेली आहे. फरक अितकाच, कीं ज्या पिढींत आगगाडी-आगपेटी प्रथम अिकडे आली त्या पिढीनें त्या वस्तूंना चट्कन् आपल्या भाषेंतलीं सोपीं नी सुरेख नांवें " आगगाडी, आगपेटी " अशीं ठेवलीं आणि आमच्या पिढीनें मात्र फोनोग्रॅफ हें परकी अिंग्लिशच नव्हे, तर थेट लॅटिन नांवच वापरण्याचा करंटेपणा केल्यामुळें तो परकी शब्द अुगीच घरींदारीं घुसला. जर टॉकिंग सिनेमाला आज जसा बोलपट हा स्वकीय शब्द आपण तावडतोब योजला नी त्यामुळें जिकडेतिकडे तो प्रचलत चालला आहे, तसेंच फोनोग्रॅफ शब्द

न वापरतां सुशिक्षतांनीं त्यास प्रथमच "ध्वनिलेख" म्हणावयास आरंभिलें असतें तर तो स्वदेशी शद्बहि आज घरोघर बोलला जाता. बायकामुलांना जर 'फोनोग्रॅफ' हा लॅटिन शद्ब बापजाद्यांनीं कधींहि न अैकलेला असतांहि शिकतांबोलतां आला तर त्यांना काय ध्वनि-लेख हा आपल्या अर्ध्यामुर्ध्या पूर्वापार परिचयाचा शद्ब तशाच संवयीनें शिकतां आला नसता ?

जरी आपल्या नागरिकांच्या घरींदारीं आज ध्वनिलेख (फोनो-ग्रॅफ) परिचित असला तरीहि अवघ्या दहा वर्षांपूर्वीं अशीं कितीतरीं खेडींपाडीं होतीं कीं, ज्यांत ध्वनिलेख पाहिलेला तर काय पण अैकलेलाहि मनुष्य विरळाच सांपडावा !

त्यांत आश्चर्यहि नव्हतें. आगगाडीची ओळख अशीच कालां-तरानें आपल्या तपोवनांतील आणि रानावनांतील लोकांस झाली. स्वामी विवेकानंद अेक गंमत सांगत, कीं मलबारांतील नंबुद्री ब्राम्हण हे जितके वेदपारंगत तितकेच कर्मठ असल्यामुळें त्यांच्यांत असे अनेक वृद्ध वैदिक असत, कीं जे आपल्या 'अग्रहारांच्या' बाहेर-च्या जगांत जन्मांत पाअूल टाकीत नसत. शूचिर्भूतपणास अितकें कडकपणें पाळणाऱ्या त्या ब्राह्मणांस जेव्हां मनुष्य, घोडा, बैल प्रभृति कोणत्याहि प्राण्यांनीं ओढल्यावांचून आपल्या आपण जिवंत मनुष्या-सारखी भरधांव भयंकर वेगानें हजारों माणसें नी खंडोगणती बोजा घेअून चालणारी अेक गाडी निघाली असल्याचें कर्णोपकर्णीं कळलें तेव्हां त्यांनीं ती वार्ता, निव्वळ थोतांड म्हणून, विश्वसिण्याचें साफ नाकारलें. आणि विवेकानंदांच्या दिवसापर्यंत, म्हणजे अवघ्या पंचवीसतीस वर्षांपूर्वींपर्यंत त्या अग्रहारांतील त्या एकलकोंड्या वैदिक विद्वानांत अेकदोन प्रसंगीं—

आगगाडी हा पदार्थ सत्य कीं असत्य याचा शास्त्रार्थ—

मीमांसादि तर्कपद्धतीनें चर्चिला गेला ! प्रत्यक्ष ती वस्तु पाहून नव्हे; तर हेतुव्याप्ति पक्षनिगमनादिक घटपटप्रमुख तर्कांनें ! शेवटीं शास्त्रार्थ

असा ठरला कीं, " जर ती वाहनावांचून चालत असेल तर ती गाडी नसून तो एक जिवंत अजस्र प्राणी असला पाहिजे आणि जर ती प्राणी नसून गाडीच असेल तर तिला कोणचेंहि जिवंत वाहन ओढीत नसतें ही थाप असली पाहिजे ! ! कारण सजीव वाहनावांचून निर्जीव वस्तु स्वतःच भरधांवशांवत सुटल्याचा शास्त्रादि ग्रंथांततरी अुल्लेख नाहीं! "

आगगाडीविषयींची ही आख्यायिका पडताळून पहातां याची अशीच स्थिति ध्वनिलेखाविषयीं दहा वर्षांआधीं अनेक खेड्यांत दिसती. ध्वनिलेखाविषयीं जर त्यांपैकीं कोणास सांगितलें असतें कीं, मेलेल्या मनुष्याचें गाणें, बोलणें, सांगणेंसवरणें जसेंच्या तसेंच अैकविणारें यंत्र निघालें आहे, तर तसें यंत्र कधींहि न पाहिलेल्या त्य लोकांना तें अेक खोटें तरी असावें वा चेटुक तरी असावें, असेंच बहुधा वाटतें.

या वैज्ञानिक युगांत जर लक्षावधि मनुष्यांची मानसिक प्रवृत्ति अितकी भाबडी तर पांच हजार वर्षांपूर्वींच्या वैदिक युगांत जर हें ध्वनिलेखयंत्र निघालें असतें तर त्याचें स्वागत त्या काळच्या लोकांनीं कसें केलें असतें असा अेक कौतुकावह प्रश्न पुष्कळांच्या मनांत मधूनमधून डोकावत असल्यास काय नवल ! नवल अितकेंच घडलें कीं, ह्या प्रश्नाचें अगदीं निष्कपट नी सहजासहजीं उत्तर मिळण्याचा योग, या गोष्टीचे नायक वे. मू. रामय्याशास्त्री यांनीं जेव्हां ध्वनिलेख प्रथमच पाहिला तेव्हां त्यांनीं त्या यंत्राचें जें स्वागत नी सत्कार ज्या प्रकारें त्यांच्या प्रामाणिक स्वयंप्रेरणेनें केला त्या प्रकारामुळें साधतां आला.

० ० ०          ० ० ०          ० ० ०

रामय्याशास्त्री हे विवेकानंदांनीं वर्णिलेल्या ज्या नंबुद्री ब्राह्मणांस वर अुल्लेखिलें आहे त्यांच्याचप्रमाणें देहानें जरी रहात होते या आजकालच्या कलियुगांत, तरी मनानें जगत असत अगदीं प्राचीन वैदिक युगांत. त्यांचें सारे वैचारिक जीवन थेट वेदकाळच्या

भावभावनांत रंगलेलें असे. ते ज्या अेका विंध्याद्रीवरील लहानसा आडवळणी अग्रहारांत रहात तिथें ध्वनिलेख तर काय, पण आगगाडी आगनाव, तारायंत्र या आतां जुनाट वाटणाऱ्या नव्या गोष्टींचाहि पत्ता नव्हता. त्या अग्रहाराबाहेर आपल्या वयाच्या पन्नाशीपर्यंत त्यांनीं पाअूलहि टाकलें नव्हतें. ते तिथें वैदिक युगांतील जीवन यथाशक्य नेत होते.

अिकडे लहानसहान नगरांतूनहि ध्वनिलेख अितका वोकाळला कीं, जें अेक सार्वजनिक करमणुकीचें साधन तें अेक सार्वजनिक अुपद्रव होअून बसावें ! ज्या लहान गल्लीच्या दोन टोंकांस दोघां रिकामटेकड्या गृहस्थांच्या घरीं ध्वनिलेख आहे त्या गल्लीचें स्वास्थ्य तरवारीच्या धारेवरच धरलेलें असतें. अेकाच्या ध्वनिलेखाची गर्जना रात्रीं दोन वाजेपर्यंत चालून तो थकतो न थकतो तों दुसरा पहांटे तीनला उठून आपला ताजातवाना ध्वनिलेख वाजवूं लागतो. शेजाऱ्यांना आपल्या या छांदिष्टपणाचा अुपद्रव होतो कीं काय, त्यांची झोंप वा स्वास्थ्य वा अेकान्त आपल्या अनर्गल लहरीपायीं किती बिघडतें याची चिंता करणें ही गोष्टच आमच्या बहुतेक नागरिकांच्या गांवीं नसते. खरोखर, मोटारनियामक दंडक ( Act ) जसा आहे तसाच ध्वनिलेखनियामक दंडक करण्यांत आला तर कित्येक निरपराध नागरिकांची नसत्या असह्य कटकटीपासून सुटका केल्याचें श्रेय अधिकाऱ्यास मिळेल.

००० ००० ०००

कल्याणचे बाळंभट हेहि एक असेच अवखळ नी रिकामटेकडे गृहस्थ होते. नेहमींच्या जुन्या पानतंबाखूविडीकाडीप्रभृति व्यसनांच्या जोडीस हें नवें ध्वनिलेखाचें व्यसनहि त्यांस बेछूटपणें लागलेलें असे. वेळकाळ कांहींअेक न पाहतां घर गाण्याची तबकडी नी दे ध्वनिलेखावर चढवून असें त्यांचें सारा दिवस नी रात्र चाललेलें असे. संगीत वा त्या गीतांतील भावना हृयांत तो तसा

९५३.३ ... १७५ ... १०७

मर्मज्ञहि नव्हता. कांहींतरी सुरेल गोंगाट अैकत बसण्याच्या होसी-पलीकडे त्याला ध्वनिलेखाची दुसरी कोणतीहि समेयज्ञता वा मर्मज्ञता ठाअूक नव्हती. अेकदां त्यांच्या अेका बापड्या स्नेह्याच्या घरीं लग्न होतें. यासाठीं बाळंभटास ध्वनिलेख घेऊन तिथें बोलावलें. लग्नाची टाळी पडून नवरानवरी बोहल्यावर बसलीं नी पानसुपारी वांटली जाअूं लागली, तों ध्वनिलेखावर बाळंभटानें अेक संपतांच हातीं येअील ती दुसरी तवकडी चढवून दिली शारदेच्या पदाची! 'किती सदय शांत, असशी मरणा!' ह्या पदाच्या पालुपदावर अर्धी पानसुपारी होते न होते तोंच तिसरी तवकडी बाळंभटानें ती केवळ दुसरीच्या खालीं ठेवलेली नी हाताशीं आली अेवढ्या सहज अनुक्रमानें घेअून लावून दिली, ती निघाली 'काय मी अभागिनी, मज मरूंहि न दे कुणी!' ह्या पदाची! त्यांतहि योगायोग पहा; तवकडींत थोडा बिघाड होअून 'मज मरूंहि न दे कुणी, मरूंहि न दे कुणी, मरूंहि न दे कुणी' हेंच चरण सारखें फिरलें जाअूं लागलें नी त्या मंगल लग्नवेळेला अेका सुरानें सारा मांडव हेंच अेक पालुपद घोळूं लागला. "मज मरूंहि न दे कुणी! काय मी अभागिनी!!!" बिचारी वधू! लग्न तिच्या मनासारखें जुळलें असतांहि केवळ ह्या भलत्याच अशुभ गाण्याच्या योगामुळें जो तो जेव्हां हंसून पाहूं लागला, तेव्हां ती अितकी खिजली कीं, क्षणभर दुर्दैवी शारदेसारखें तिलाहि वाटूं लागलें कीं, "काय मी अभागिनी। उठूंहि न दे कुणी। मज मरूंहि न दे कुणी।"

बाळंभट्टाच्या ध्वनिलेखविषयक अविवेकाची जशी ही गोष्ट, तशीच शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या अेकांताविषयींच्या वा स्वस्थतेविषयींच्या निष्काळजीपणाची गोष्ट. अेकदां अगदींच समोरच्या घरीं अेक मृत्यु घडला. तिथें हृदय पिळवटून टाकणारी रडारड चालू असतांच बाळंभट्टाच्या ध्वनिलेखावर मोठमोठ्यानें खो खो खो असे मजल्यावर मजले चढवून हंसणाऱ्या गाण्याची तवकडी फिरत होती. शेवटीं

तो बाष्कळ असभ्यपणा अेका शेजारच्या तापट म्हाताऱ्याला सहन न होऊन त्यानें बाळंभट्टाच्या घरांत घुसून काठीच्या रट्ट्यासरशीं ती तबकडी जेव्हां फोडली, तेव्हांच काय ती गाण्याच्या शेवटच्या ठेक्याची थाप पडली !

बाळंभट्टानें ध्वनिलेख विकत घेतला तोहि अेक संगिताचें साधन म्हणून नव्हे, तर पोटाचें ! भटभटकी न पढलेले ते भट आपली वृत्ति दुसऱ्यास देत. केवळ कांहीं न म्हणतां गंध लावून घेण्यापायीं किंवा लावण्यापायींच जी भटकी चाले तेवढी साध्या पूजेची भटकी स्वत: चालवीत. त्यांनीं अेकदां सत्यनारायणाच्या पूजेला ध्वनिलेख हा कोण्या जिवंत भटासारखा सुरेख सांगतो म्हणून जेव्हां पाहिलें, तेव्हां त्यांनीं तें यंत्र आणलें. आणि आडवळणी खेड्यांतील सत्य-नारायण पार पाडतांना त्या ध्वनिलेखासच आपल्या दुय्यम भटाचें काम देऊं लागले. खेडेगांवांतहि अशा सुरेल आवाजाचा नी राग-दारींत सत्यनारायणाची कथा सांगणारा हा यंत्रभट पुष्कळ घोगऱ्या, खोकल्या तोतऱ्या भटजीपेक्षां खेडवळांस अधिक आवडूं लागला.

००० ००० ०००

गेल्या तीस वर्षांत अंगणाबाहेरच्या जगाची वास्तपुस्त देखील ज्यांनीं कधीं केली नाहीं, ते त्या विध्याद्रीच्या अग्रहारांत राहणारे शुचिर्भूत वेदविद्यारत रामय्याशास्त्री अेक दिवस पाहातात तों अपरिहार्य परिस्थितीनें त्यांस त्याच कल्याणला ओढून आणलें आहे ! पेशवाईपासूनचें त्यांचें त्या गांवाकडील वतन; त्याविषयीं भाऊबंदकीच्या फिर्यादीअर्यादी होऊन रामय्याशास्त्र्यांना कोर्टाचेंच समन्स निघून कल्याणला यावें लागलें आणि बाळंभटाचीच ओळख निघून तेथेंच उतरावें लागलें.

कल्याणला येतांच कोर्टाचें काम कसेंबसें दिवसभर उरकून नर्मदेच्या दक्षिणेकडच्या या पापी अयज्ञीय भूमींतून शक्यतों शीघ्र



निघून जावें म्हणून दुसऱ्या दिवशीं सकाळींच त्या अग्रहाराकडे परत जावयाचें ठरलें होतें. निरुपाय म्हणून अेक रात्र तेवढी तिथें वसति पडली.

पण त्या रात्रींच फराळ तेवढा स्वीकारून रामय्याशास्त्री पडशी टाकून शाल ओढून पाय पसरतात तोंच—

हें काय ऐकूं येत आहे ? आं ? माझ्या गुरुजींचा खणखणीत आवाज ? दोन वर्षांपूर्वी वारलेल्या मनुष्याचें अितकें खणखणीत नी स्पष्ट बोलणें ? भास ? छट् ही शुद्ध संस्कृत नी प्राकृत सुस्वर, पोथीचीं अनुष्टुपेंचीं अनुष्टुपें, श्लोक ! छट् छट् हा भास कसला ? माझे गुरुजी मला, ह्या पापभूत मी आल्याविषयीं दटावण्यासाठीं स्वर्गलोकांतून लिंगदेहानें खालीं आले कीं काय ? आहे तरी काय !

रामय्याशास्त्री खाडकन् अुठून खोलींत टवकारून टकमक चहूंकडे पाहूं लागले. गुरुजी पोथी शांत, सुस्वर, सुस्पष्टपणें वाचीत चालले ! पण कुठून नी कसे ?

रामय्याशास्त्र्यांना अंगांत आल्यासारखें होअून त्यांनीं खोलीचें दार खाडकन् अुघडलें. आवाज जिन्याकडून येतो हें पाहून झपझप जिना चढले. माडींत डोकावले. पहातात तों बाळंभट तेवढा तिथें. फाटक्याशा तक्क्यास टेंकून स्वतः ढुंगणापर्यंत पसरून अेका पायाच्या गुडघ्यावर दुसरा पाय आडवा चढवून स्वारी विडी ओढीत पडली आहे. आणि गुरुजी अदृश्य ! पण सत्यनारायणाची कथा त्यांनींच म्हणावी तशी सुरेल स्पष्टपणें अैकूं येत आहे!

रामय्याशास्त्र्यांनीं भारून टाकल्यासारख्या स्थितींत बाळंभट्टास विचारलें, 'गुरुजी कुठें आहेत ? माझे गुरुजीच ही सत्यनारायणाची कथा वाचीत आहेत ! सांगा, काय चमत्कार आहे हा— कुठें आहेत गुरुजी ?'



बाळंभटानें सारें प्रकरण ताडलें आणि त्याच्या टवाळ स्वभावास अनुसरून हंसत अुत्तर केलें– 'हे पहा ह्या मंत्रित यंत्राच्या ह्या कर्ण्याच्या आंत लिंगदेहधारी आपले गुरुजी बसले आहेत ! माझ्या मंत्रबळानें ही तबकडी आपोआप घरघरघर फिरूं लागली कीं, लिंगदेहधारी मृतात्मे बोलूं लागतात !'

'या अद्‌भुत दैवी यंत्राचें नांव काय ? आणि त्या मंत्राची ऋषि-देवता कीलक ?' रामय्याशास्त्री वैदिकभाषेंत जिज्ञासले.

हंसून बाळंभट्ट म्हणाला, 'या दैवी यंत्राचें नांव फोनुग्राफ–ध्वनिलेख ! आणि त्या अद्‌भुत मंत्राची ऋषिदेवता जरी मला माहीत नसली तरी हा पहा कीलक ! ह्या यंत्राची किल्ली !' असें म्हणत बाळंभट्टानें ती तबकडी कशी बसवितात, ध्वनिलेख कसा वाजवितात तें थोडक्यांत हंसत हंसत सांगितलें.

पण शास्त्रीबुवांनीं हें सर्व अशा वैदिक गांभीर्यानें समजून घेतलें कीं, जशी अग्निहोत्रप्रक्रिया ! त्यांच्या जिज्ञासेनें गंमत वाटून बाळंभट्टानें अेक षोडषोपचार म्हटलेल्या पूजेची तबकडी लावली. तों कोण नवल ! शास्त्रीबुवांचे गुरुजी सांगत, थेट तशीच ती पूजा ! छट्, तेच सांगताहेत ती ! हें आहे तरी काय अद्‌भुत ! बाळंभट्टानें दोनतीनदां सांगितलें कीं 'तुमचे गुरुजी अिकडे मुंबअीला येतजात तेव्हां त्यांच्याच तोंडून बहुधा ही तबकडी ह्या यंत्रकारानें भरून घेतली असावी.' हें स्पष्टीकरण बाळंभट्टास तो विषय समजावून घेण्यास पुरेसें वाटलें –पण वैदिक युगांतील भावभावनांतच जगणाऱ्या रामय्याशास्त्र्याच्या मनास ती भाषा अगदीं अनोळखी. गुरुजींची तबकडी घेतली म्हणजे काय ! ज्या तबकडीला न कंठ, न जिव्हा, न ओष्ठ. जी निर्जीव, ती जिवंत विद्वानासारखी पंडित व्हावी–थेट गुरुजीसारखी बोलूं लागावी !

ज्ञानेश्वरानें रेड्याकरवीं वेद बोलविले, ह्या अेका घटनेनें कांय तें ह्या गूढाचें झालें तर थोडेसें स्पष्टीकरण झाल्यासारखें

रामय्यांना वाटलें, दुसरी तुलना नाहीं. रेड्याला ज्ञानेश्वरांनीं बोलकें केलें—माझ्या गुरुजींनीं ह्या तबकडीला ! धन्य आहे गुरूची —धन्य आहे ध्वनिलेखाची ! धन्य आहे या तबकडीची !

रामय्याशास्त्र्यांनीं बाळंभट्टानें मागितलें तें मूल्य देऊन त्यांच्या गुरुजींचा लिंगदेह ज्यांतून प्रत्यक्षपणें बोले त्या दोन सत्यनारायणाच्या नी पूजेच्या तबकड्या विकत घेतल्या, कशा चालवायच्या तें तंत्रहि अभ्यासिलें, आश्चर्यांत रात्रभर मग्न राहून सकाळींच त्या ध्वनिलेखासह अग्रहारास प्रयाण केलें.

ooo ooo ooo

ज्ञानेश्वरांच्या वेद बोलणाऱ्या ह्या रेड्याची पुढें काय प्रतिष्ठा वा गति झाली, कांहीं निश्चतपणें सांगतां येत नाहीं. या अलौकिक रेड्याचें मंदिर बांधलें असो वा नसो, रामय्याशास्त्र्यांनीं आपल्या गुरुजींचा लिंगदेह ज्या अद्‌भुत ग्रंथांतून बोलतो त्यास देवतेसमान सन्मानून अेका स्वतंत्र देव्हाऱ्यांत देवघरांमध्यें स्थापिलें. जर पूजेचें प्रत्येक साधन देवता आहे, तर पूजा सांगणारा ह्या ध्वनिलेख देवता असलाच पाहिजे. कलशस्य मुखे विष्णु: कंठे रुद्र: ! असा महिमा; घंटा ही देवताच. तिची पूजा आहे, तिला प्रार्थनाहि समजते, म्हणूनच ‘आगमार्थंतु देवानाम् गमनार्थंतु रक्षसाम् ॥ कुरु घंटे रवं तत्र’ असें आम्ही घंटेस प्रार्थितों नी ती प्रसन्न होऊन वाजूं लागते. फार काय शंख हीहि देवता आहे. शंखासहि संस्कृत येतें ! शहाण्यांना देखील पूजेस बसतांच शंखाला हात जोडावे लागतात, फुलें-गंध वाहून स्तवावें लागतें ! ‘त्वं पुरा पांचजन्योसि विष्णुना विधृत: करे ॥ नर्मित: सर्व देवेभ्यो पांचजन्य नमोस्तुते ॥’ त्याच शास्त्रानुसारें रामय्याशास्त्र्यांनीं त्या ध्वनिलेखयंत्रासहि प्रत्यहीं पूजेआधीं पूजावें नी देवतासमान प्रार्थून विनवावें— ‘सांगावी आपण आतां आम्हांस पूजा !’

पण ही प्रार्थना ते आपल्या मनोमनेंच करीत असल्यामुळें त्यांचें समाधान होऊं नये. तें अवैदिक आहे; ध्वनिलेखाची वैदिक प्रार्थना कुठंतरी असलीच पाहिजे. ग्रंथांतरीं ती पहावी अशी तळमळ लागून ते ऋग्वेदांतील सूक्तांपासून ब्राह्मणग्रंथांतील प्रक्रियेपर्यंतचे आधारहि अवलोकूं लागले.

कारण त्यांचा अेक ठाम सिद्धान्त हा असे कीं, मनुभगवानानें म्हटल्याप्रमाणें वेद म्हणजे " सर्वज्ञानमयो हि सः " आजचें आणि जगाच्या अंतापर्यंतच्या अुद्यांचें सर्व ज्ञान त्यांत असलेंच पाहिजे. मीमांसेची ही प्रतिज्ञाच ! त्यामुळें आगगाडी, तारायंत्र प्रभृति आजपर्यंतचे शोध हे वेदांत आहेतच, असें सनातनी पंडितांचें म्हणणें यांस मान्य होतें. ह्याविषयीं त्यांच्याहि श्रद्धेस मागें टाकणारे अतरहि अनेक पंडित प्रत्यहीं आढळतातच. फार काय, फोर्डची मोटार हीदेखील कांहीं नवीन गोष्ट नसून त्या मोटारीहूनहि वेगवती नी सुखवाहक मोटार वेदकालीं सडके-सडकेवर जाये करी, असा शोध अलीकडेच अेका प्रकांड विद्वानानें लावला आहेच कीं नाहीं !

त्या सर्वज्ञानमय वेदांत ध्वनिलेखासारखें अद्‌भुत यंत्रहि संकीर्तलेलें नसेल हें संभवतें तरी कसें ! श्रुतींत बाणदेवतेचें, धनुष्यदेवतेचें, सोमदेवतेचें, फार काय, बेडूकदेवतेचेंहि जर सूक्त आहे, तर ध्वनिलेखाचें तसें अेक सूक्त असण्याअितकी ह्या ध्वनिलेखदेवतेचीहि योग्यता असलीच पाहिजे ! पण तें सूक्त रामय्याशास्त्र्यांस ठाऊक असलेल्या चारी वेदांत आढळेना. अर्थात् नसलेल्या श्रुतींत—लुप्तश्रुतींत तें असलेंच पाहिजे ! या कल्पांत जें नवीन तें गेल्या कल्पांत तरी असावयाचेंच. कोणचीहि गोष्ट 'धातायथा पूर्वमकल्पयत्' हा सिद्धान्तच ! तेव्हां या असलेल्या वेदांत जें नाहीं, पण यास्तवच जें नसलेल्या वेदांत, निदान गेल्या कल्पांतील वेदसंहितेंत असलेंच पाहिजे, तें आज लुप्त असणारें ध्वनिलेखसूक्त आपणास कोणी प्रकटवील काय अशी अुत्कट अिच्छा रामय्याशास्त्र्यांना व्याकुळवूं लागली.

००० ००० ०००



" गुरुजी कुठें आहेत ? 'माझे गु रुजीच ही सत्यनारायणाची
कथा ाचीत आहेत ! "
' हे पहा ! ह्या मंत्रित यंत्राच्या ा कण्यांच्या आंत लिंगदेह-
धारी ापले गुरुजी बसले आहेत ! "

आज संध्याकाळपासून तर त्यांना त्या विषयावांचून कांहींच सुचेनासें झालें. अेखादा संशोधक (Researcher) किंवा प्रकल्पक (Inventor) जसा त्या शोधांच्या वा प्रकल्पांच्या नादें गुंग होअून जातो, तसें रामय्याशास्त्री ध्वनिलेखसूक्त कसें असेल या विचारानें ग्रासून गेले. ऋग्वेद चाळतां चाळतां त्या रात्रीं दोनतीन सूक्तें त्यांनीं पुन:पुन्हा जीं चाळलीं, त्यांत धनुष्यबाणाचें, सहाव्या मंडळांतलें ७५ वें सूक्त होतें. राजा युद्धास निघाला कीं, त्याला धनुष्य देतांना पुरोहितानें मंत्र म्हणावा– " आम्ही गाअी धनुष्यानें जिंकूं, युद्ध धनुष्यानें जिंकूं" मग राजानें मंत्र म्हणावा, " ही दोरी धनुष्यावर चढवून अेकदां ओढली कीं पतीला आलिंगणाऱ्या स्त्रीप्रमाणें मधुर गुणगुणत कानांशीं लागते. " पुरोहितानें लगेच म्हणावें, "या धनुष्याचीं दोन टोंकें अेकविचाराच्या नवराबायकोप्रमाणें जवळ राहून स्फुरण पावत शत्रूंना ठार करोत !"

'भाता बाणांचा बाप आहे. अनेक बाणांचा तो जनक पुत्रवत् त्यांना पाळतो !' 'हे रश्मि, हे लगाम, घोड्यांना नियंत्रितात. हे स्तोत्यांनो, लगामांचा महिमा गा' 'बाणाला चांगलें पीस बसविलें आहे, कातड्यानें धनुष्य बांधलें आहे. बाण आम्हांस सुखवोत !' 'हे प्रतोदा, घोड्यांच्या मांड्यावर नी ढुंगणावर सारथी तुझे तडाखे मारतो तेव्हां तूं युद्धांत घोड्यांना सडकून पिटाळ अं !' 'जी विषानें माखली आहे त्या पोलादी तोंडाच्या त्रिषुदेवते, धनुष्यदेवते तुला माझा नमस्कार असो ! शेंडी ठेवलेल्या बटूप्रमाणें असणाऱ्या बाणांनो, हें कवचा, तुम्हांला नमस्कार असो, सुखप्रद व्हा !'

००० ००० ०००

म्हणतात ना वैरी चिंती ना तें मन चिंती ! हें युद्धोन्मुख अवसानानें मुसमुसलेलें सुरेख सूक्त वाचतांना रामय्याशास्त्र्यांच्या मनांत अेक दुष्ट शंका पालीसारखी नकोनको म्हणतां चुकचुकून

गेली– 'ज्या अर्थी या सूक्तांत आजकालच्या धनुष्याहून अत्यंत मारक अशा दारुगोळा, बंदूक, सशस्त्र मोटारी, तोफा प्रभृति शस्त्रास्त्रांस अुल्लेखिलें नाहीं त्या अर्थी त्या काळीं हीं शस्त्रें माहीत नसावीं. नाहींतर रथ पिटाळणाऱ्या घोड्यांच्या लगामदेवतेस नी चाबूकदेवासहि प्रार्थिणाऱ्या ह्या सूक्तांत वा अितर कुठेंतरी बंदूक उडविणाऱ्या केपास, तोफेस, बॉम्बगोळ्यास नुसता शिष्टाचाराचा नमस्कार तरी केला असताच असता ! अर्थात् रथ, घोडा, धनुष्यबाण अितकींच शस्त्रें माहीत असणाऱ्या काळांतील मनुष्यांनीं हीं सूक्तें रचलीं असावींत; सर्वज्ञानमय वेदानें नव्हेत. त्या काळाला तीं पुरलीं; आज तोफा बॉम्ब, विमानें, टार्पेडो, चिलखती मोटारींचीं सूक्तें हवींत !' पण रामय्यांनीं त्या शंकेच्या पालीला लगेच मीमांसक झाडूच्या फटकाऱ्यासरशीं मारून पाडली नी म्हणाले– 'तीं हीं सूक्तें वेदांत नाहींत, म्हणून वेद सर्वज्ञानमय नाहीं असें ठरत नसून, तो सर्वज्ञानमय असल्यामुळें तोफाबंदुकांचींहि सूक्तें त्यांत असलींच पाहिजेत; आजआहेत त्या वेदांत सांपडत नसलीं तर आज नाहींत, व्यासांच्या काळींहि नव्हते, अशा नसलेल्या वेदांत तरी तीं असलींच पाहिजेत, असेंच सिद्ध होतें. क्वचित देवाला असेंहि वाटलें असेल कीं, हें दोरीचें धनुष्य, पिसांचे बाण नी हे मंत्र हातीं असल्यावर पन्नास पन्नास मैलांवरून शंभरशंभर पौंडाच्या हजारों कुलुपी बॉम्बचा वर्षाव करणाऱ्या शत्रूंची कथा काय ! वेदमंत्रांनीं स्तविलेल्या या चाबुकदेवतेनें मांडीवर नी ढुंगणावर तडाखे मारून ज्या रथाचे घोडे पिटाळले, त्या रथाला कोणची चिलखती मोटार वा मशीनगन्सनीं हजार हजार गोळ्या वर्षत धांवणारे पोलादी हौद (टॅंक्स) वा अजस्र तोफा अडवूं शकणार आहेत ? यास्तव चाबुकदेवतेला सूक्त हवें– त्या मशीनगन्स, तोफा, दारूगोळा प्रभृति सटरफटर आयुधांना का कोणी देवतासूक्तांचा मान देतो !

०००   ०००   ०००

नंतर रामय्याशास्त्र्यांच्या पुढें अक्रमवशात: नवव्या मंडळांतील सोम-स्तोमाच्या सूक्तांचीं पानें आलीं– " हे सोमा, तूं अेव्हां दुधांत मिसळला जातोस, तेव्हां तुझ्यांत पाणी मिसळलें जातें ! गाळण्यांतून गाळतांना तुझ्या धारा खालीं पडतात. हिरवट रंगाच्या सोमा, तूं लोंकरीच्या फडक्यांतून गाळला जातोस ! मेंढीचे केंस नी पाणी यांत बनविलेल्या सोमा, देवांनीं मादावें, यास्तव, मी तुझ्यांत दूध मिसळतों ! दाही बोटांनीं पिळलेल्या ह्या सोमाचीं, हे स्तोतेहो, त्वरित स्तोत्रें म्हणा. रणांत जसा योद्धा उभा असतो तसा पात्रांत हा सोम अुभा आहे ! हा सोम भांड्याकडे जातो, गाळण्याकडे जातो, सोमा, तूं मधुर रस देत गाळण्यांत पड ! राजाप्रमाणें आमचीं स्तोत्रें अेक ! शत्रूंचें सामर्थ्य नष्ट कर. अन्न, बल, तेज आम्हांस दे ! दगडांनीं कुटलेला, पिण्याकरितां बनविलेला हा सोम स्त्रीकडे जाणाऱ्या जाराप्रमाणें द्रुततेनें आमच्या देहांत संचारतो. ओरडत कळपांत शिरणाऱ्या बैलाप्रमाणें आवाज करीत भांड्यांत गळणाऱ्या सोमास पिअून लढाअीस जातांना आम्हांस मद चढतो ! " सोमदेवतेचीं अशीं नाना सूक्तें त्यांनीं चाळलीं.

००० ००! ०००

तोंच पानें अुलटतां मंडूकसूक्त पुढें आलें. सातव्या मंडळांतल्या १०३ वें सूक्तांचे अृषि वसिष्ठ, देवता मंडूक आहे– ' व्रती ब्राह्मणाप्रमाणें वर्षभर पडून राहिलेलें बेडूक पर्जन्यप्रिय शब्द बोलूं लागले ! अेक बेडूक गाअीसारखा, दुसरा शेळीसारखा, अेक हिरवट, तर अेक चित्रविचित्र रंगाचा ! सोमयागांत ब्राह्मण मंत्र पढतात, तसे सरोवरांत बेडूक ध्वनिता आहेत. वर्षभर मातीला मिळून गेलेले, सुकलेल्या पखालीप्रमाणें पडलेले हे संत्रस्त बेडूक पाअूस पडूं पहातांच बिळाबाहेर येतात. ह्या मंडुकांनीं पर्जन्य पडण्याच्या माझ्या प्रार्थनेस संमति दिली. शेंकडों गाअींनीं दीर्घायुष्य आम्हांला दिलें. मंडूकदेवतेचें सूक्त आह्मी स्तवितों !' ज्या वेदांत

बेडकांचें देखील सूक्त आहे, त्या सर्वज्ञानमय वेदांत ह्या ध्वनि-लेखासारख्या देवतेचें सूक्त नसेल हें शक्यच नाहीं ! रामय्याची अशी निश्चितीच झाली !

००० ००० ०००

तशा तंद्रींतच त्यांना झोंप लागली. स्वप्नांच्या अेकाहून अेक अुंच सोनेरी मनोऱ्यांवर चढत चढत ते स्वर्गाच्या अगदीं जवळ आले. तोंच कोणी देवर्षि आकाशांतून अुतरतांना पाहून रामय्याशास्त्री नमनपूर्वक म्हणाले, 'हे तर भगवान् नारद !'

' हे नारदमुने, वेदवेत्त्यांत आपण अग्रगण्य, म्हणून विचारतों, धनुष्य, प्रत्यंचा, घोडा, रथ, सोम, नदी, चाबूक, बेडूकसुद्धां जसें सूक्तांतील देवतांचा मान पावलीं आहेत तसें ध्वनिलेखदेवतेचेंहि अेक स्वतंत्र सूक्त वेदांत आहे काय ?'

**नारद्**- काय ? ध्वनिलेख ? हा कोणाचा लेख ?

**रामय्या**- ध्वनिलेख म्हणजे फोनोग्राफ. फोनोग्राफ अैकलाच असाल तुम्हीं ?

**नारद**- असं म्हणा. फोनोग्राफ ठाअूक आहे तर ! संस्कृत शद्ब आजकाल देवहि विसरले आहेत त्यामुळें घोंटाळलों जरा. वेदकाळीं फोनोग्राफ होताच होता आणि त्याचें, ध्वनिलेखाचें सूक्तहि आहेच आहे वेदांत. अेक तें पवित्र सूक्त—

००० ००० ०००

स्वप्नांत नारदानें शिकविलेलें तें ध्वनिलेखदेवतेचें आजच्या अुप-लब्ध वेदांत न सांपडणारें पण लुप्त वेदांत असलेलें सूक्त राम-य्याशास्त्र्यांना मूळ संस्कृतांत येत आहे. परंतु तो वैदिक मंत्र तसाच प्राकृत मासिकांतून छापणें निषिद्ध, कारण या मासिकांचा फैलाव स्त्रीशूद्रांत बहुत; त्यांच्या कानांवर तें वैदिक सूक्त जाणें

शास्त्रविरुद्ध; त्यांना वेदांचा अधिकारच नाहीं. यास्तव अियें त्या सूत्राचें मराठी भाषांतर तेवढें देता येणें शक्य.

ज्यांना वेदकालीं ध्वनिलेख नव्हताच, असें वाटतें, त्या वेद-निंदक नास्तिकांना देखील हें मानावेंच लागेल कीं, जर वेदकालीं ध्वनिलेख असता तर होय न होय त्या अद्‌भुत यंत्रासहि दैवताचा मान मिळून त्याचें असेंच अेखादें सूक्त आणि स्तोम रचलें गेलें असतें!

**लुप्त श्रुतींतील श्रीध्वनिलेखसूक्ताचें मराठी भाषांतर; ऋषि मारद, देवता ध्वनिलेख नी त्याची तबकडी.**

(१) हात, मांडया, पाय, पोट, छाती, प्रभृति अधमांग अवयव ज्याला मुळींच नसून अुत्तमांग जें मस्तक तेवढेंच काय तें ज्याचा देह आहे, तो हा पवित्र देहधारी ध्वनिलेख सर्व देवांत अेक असामान्य देव नव्हे काय! धडापासून छाटून वेगळें केलें असतांहि ज्याचें शीरच काय तें जगतें तो पराक्रमी राहू जसा दैत्यांत शोभतो तसाच शिर हाच काय तो ज्याचा देह तो हा अुत्तमांगधारी ध्वनि-लेख देवांत शोभत आहे!

(२) अिंद्र जसा सहस्राक्ष तसा हा ध्वनिलेख सहस्रजिव्ह आहे. आपल्या चौरंगाच्या पाठीवर बसून तो जेव्हां शृंगार, वीर, करुण आणि बीभत्स रसासुद्धां यच्च्यावत् रसांनीं ओथंबलेलीं संगीत प्रवचनें तालसुरावर गाअूं लागतो, तेव्हां तो आद्यकवि वाल्मीकीसारखा, आद्य पुराणिक जो व्यास त्याच्यासारखा शोभूं लागतो.

(३) त्याचा कर्णा ( फनेल ) त्याच्या तबकडीवर लावा, किल्ली द्या, पहा तो कसा डौलदार दिसूं लागला! वेटोळें घालून बसलेल्या आणि फडा अुपसून संगीताच्या नादें डुलत असणाऱ्या शेषासारखा जो शोभत आहे, त्या कर्णा अुभारून डोलणाऱ्या ध्वनि-लेखास आम्ही वारंवार वंदितों! पेटींत घालतांच गारुड्याच्या

टोपलींत झांकलेल्या नागाप्रमाणें जो गुपचूप पडून रहातो, त्या ध्वनिलेखास आम्ही वारंवार वंदितों.

(४) ह्या ध्वनिलेखाची तबकडी हीच त्याचा मेंदु, ही सुई हीच त्याची प्रतिभा आहे; तिच्या प्रेरणेसरशीं त्याची स्मृति स्फुरते; मेंदूंत जीं मज्जाछिद्रें नाना भावनांच्या घरट्यासारखीं असतात, तशींच ह्या तबकडीचीं हीं छिद्रें नाना विचारविकारांचीं नीं आलाप-प्रलापांचीं चिमुकलीं घरटीं आहेत. घरट्यांतून जाग येतांच, पक्षी जसे गाऊं लागतात, तसे ह्या छिद्रांतून किल्ली देतांच ते ते भाव आपापलीं गीतें गाऊं लागतात ! घरट्यांत रात्रीं पक्षी जसे गुपचूप निजतात, तसे किल्ली संपतांच ह्या छिद्रांतून तीं सारीं गीतें अदृश्य होऊन झोपीं जातात !

(५) ह्या ध्वनिलेखाची ही किल्ली अमृतमय सोमाची एक चिळकांडी आहे ! सोमाची चिळकांडी अंगीं भिनतांच गुंगलेलें ब्राम्हणहि जसे स्फूर्तीनें तरारून जातात, नी त्यांच्या मज्जापिंडांतील सुप्त शब्द डवचले जाऊन ते मोठमोठ्यानें वेदघोष करूं लागतात, तसेच ह्या किल्लीच्या संचारासह ह्या तबकडींतील छिद्रांमधलें हे सुस्वर चैतन्यानें तर्र होऊन त्यांच्यांतील सुप्त गीतें जागतात आणि गोड असा गानघोष दुमदुमूं लागतो.

(६) हे अश्चर्यकारक ध्वनिलेखा, देव, दैत्य, मानव कुणी झाला तरी त्याचें मुख खालीं नी मज्जास्मृतियुक्त मस्तक वर असतें. परंतु तुझा देह त्या साऱ्या देवदानवमानवांत अत्यद्भुत आहे ! कारण तुझ्या तबकडीचें तुझें मज्जस्मृतियुक्त मस्तक खालीं असून त्याच्या-वर तुझ्या ब्रम्हरंध्रालाच मुख फुटलेलें आहे. मस्तकावर असलेल्या कर्ण्याच्या मुखानें शब्द करणाऱ्या ह्या अद्भुत देहधारी ध्वनिलेखास आम्हीं वारंवार वंदितों !

(७) पूर्वी सरस्वतीला चालतां चालतां यमानें धक्का दिला, त्यामुळें ती देवी रागावतांच यम म्हणाला, 'तुम्ही सगळे मर्त्य, मी तुम्हास मारणाराच आहे; म्हणून धक्का मारला. त्यांत काय आहे?' तेव्हां सरस्वती ब्रम्हदेवापाशीं हट्ट धरून बसली कीं 'सर्वांना मारण्याची यमाची शेखी अुतरली पाहिजे.' तिचा हट्ट पुरविण्यासाठीं ब्रम्हदेव म्हणाले, 'प्राणी मेल्यावर त्याचे रूप, रंग, दृष्टि, श्रुति, स्वरप्रभृति सारे गुण मरतात. ती यमाची सत्ता. पण मी कलियुगांत ध्वनिलेखाचा अवतार घेअीन तेव्हां कोणत्याहि प्राण्याचा स्वर नी वाणी ही त्या ध्वनिलेख देवतेच्या आश्रयास जाईल, तर तीवर मात्र यमाची सत्ता चालणार नाहीं. मनुष्य मेला तरी त्याच्या स्वरांत त्याची वाणी पन्नासाव्या पिढीस देखील तशीच अमरपणें बोलेल कीं जसा तो जिवंतच आहे! यमाच्या हातून सोडवून प्राण्यांच्या वाणीस स्वर अमर करणाऱ्या या ध्वनिलेखदेवतेचें, स्तोते हो, स्तवन करा! ध्वनिलेखानें आमची वाणी अमर केली!

(८) सत्ययुगांतील अृषीपेक्षां सुद्धां ह्या ध्वनिलेखाच्या कृपेनें कलियुगांतील वाचस्पति भाग्यशाली आहेत. वसिष्ठ, कसे शांतपणें बोलत, विश्वामित्रानें शिव्या किती अुंच स्वरांत कशा तावतावून दिल्या तें आतां कोणासहि प्रत्यक्ष अैकावें तसें अैकतां येणार नाहीं! पण कलियुगांतील संतहो, अणि शिवराळहो, तुमचे अुपदेश नी शिव्याशाप तसेचे तसेच, त्याच आवाजांत, पुढील पन्नासाव्या पिढीला देखील आतां तुम्हांला अैकवितां येतील! कलियुगांतील बालअबाल सवाअी बालगंधर्वांनो, तुम्हीं मेलांत तरी तुमची छेडलेली तान आतां कधींहि मरणार नाहीं. पांचशें वर्षांनीं देखील तीं तुमचीं गाणीं तुम्हीं तशींच गातांना अैकू येतील. कलियुगांतील कविसंमेलनांतील रडगाण्यांनो, तुम्हीहि आतां तुमच्या कवीच्या मृत्यूनंतर विस्मृत व्हाल म्हणून रडूं नका! ते कवि मेले तरी ह्या रडगाण्यांनीं, तुम्ही तुमच्या त्या घोगऱ्या, खोकल्या, खांकरल्या, तोतऱ्या ठेक्यांसह नी अुच्छृंखल

श्रोत्यांनीं पिटलेल्या टवाळ टाळ्यांसह पांचशें वर्षांनीं देखील वाटेल त्या कविसंमेलनाचा विरस करूं शकाल ! ध्वनिलेखास शरण जा ! म्हणजे ही सिद्धि पावाल !

(९) हा ध्वनिलेख अेखाद्या ब्रह्मनिष्ठासारखा जातपात मानीत नाहीं. फार काय, माणसांत नी पशूंतहि भेद ठेवीत नाहीं. सर्वांस उत्तम समबुद्धीनें अंगिकारतो. गवयांचीं गाणीं जशीं तो अमर करतो तशींच आजच्या गाढवांची खिंकाळणींहि तो अमर करतो !

(१०) ध्वनिलेख लावण्याच्या आधीं त्याची पूजा करून, हें सूक्त म्हणावें; आणि मग ध्वनिलेख वाजवावा. घंटेची वा शंखाची पूजा केल्यावांचून नी त्यांचे मंत्र म्हटल्यावांचून जसे भटजी घंटेस वाजवीत नाहींत, शंख फुंकीत नाहींत, तसेंच हें सूक्त म्हटल्यावांचून जो कोणी ध्वनिलेख वाजवील त्याच्या ध्वनिलेखाची किल्ली बिघडेल, तबकड्यांची पेटी हातांतून निसटून त्या फुटतील. पण जो ईश्वरप्रणीत अपौरुषेय वेदांतील हें श्रीध्वनिलेखसूक्त यथाविधि म्हणून मग ध्वनिलेख वाजवील त्याच्या घरीं अनेक ध्वनिलेख वाजूं लागतील, धनधान्य वाढेल, त्यांच्या ध्वनिलेखपेटींत मोजून ठेवलेल्या तबकड्यांहून दहादहा अधिक मजुळ तबकड्या वाढलेल्या दिसून येतील. यम त्याला भिअील हें सूक्त म्हणणाऱ्याला ह्या जन्मीं मृत्यु नाहीं. मेला तरी तो हा जन्म संपल्यानंतरच मरेल !

# मढीं अुठवतात !

“रामदासांना नमस्कार करण्यास आलेल्या स्त्रीला त्यांनीं तिच्या नवऱ्याचें प्रेत स्मशानांत नेलें जात आहे हें न कळल्यामुळें सहजगत्या आशीर्वादिलें कीं, ‘ अष्टपुत्रा सौभाग्यवती भव !’ आणि त्यासरशीं तिच्या नवऱ्याचें प्रेत तिकडे स्मशानांत तिरडी खालीं ठेवतां ठेवतां जिवंत झालें— ही कथा तर तुम्हांस खोटी म्हणतां यावयाची नाहीं ना ? कारण कल्याणस्वामी हे त्याच स्त्रीला तिच्या त्या रामदासांच्या वाचासिद्धीच्या चमत्कारानें पुन्हा जिवंत झालेल्या पतीपासून झालेले पुत्ररत्न होते असें निर्विवाद सत्य त्यांच्या समकालीन लोकांनीं अेकमुखानें मानलेलें आहे ! ” रावसाहेब भावे हे रावबहाद्दुर सहस्रबुद्धे यांस आव्हानूं लागले.

“ आम्ही त्याविषयीं खरें वा खोटें असें कोणचेंच विधान करूं अिच्छित नाहीं. ” रावबहाद्दुर सहस्रबुद्धे शांतपणें म्हणाले, “ कारण

दोन्ही पक्षीं पुरावा बळकट असा मिळविणें आज शक्य नाहीं. तरीहि अितर्के म्हणावयास हरकत नाहीं कीं, बोलाफुलास गांठ पडूनहि अशी घटना घडूं शकते. मी अेका तुरुंगाचा पर्यवेक्षक (सुपरिंटेंडंट) असतांना मेलेला म्हणून आणलेला बंदिवान शवविच्छेदनालयांत हालचाल करूं लागला नी पुन्हा जिवंत व्हावा तसा सुधारला अशी गोष्ट घडली होती. कारण अवश्य तितक्या कसोशीनें तो मेला किंवा नाहीं तें न पहातांच त्यास रातोरात शवविच्छेदनालयांत मेल्यासारख्या स्थितींत फेंकून दिलें गेलें होतें. तत्काल चिरफाड केली गेली असती तर तो परत येताच ना पुन्हा या जगांत. पण सहजगत्या तें शवपरीक्षण व्हावयास सकाळपर्यंत वेळ लागला आणि मध्यंतरीं त्याची मृत्युवत् असणारी मूर्च्छा संपून तो चलनवलन करूं लागला. भूकंपांत मातीच्या ढिगाखालीं गाडून गेलेल्या माणसांत ते ढीग अुकरतांना अनेक मेलेले—पण त्यांतच अेखादा जिवंत सांपडण्याचे चमत्कारहि होतातच कीं नाहीं ! तो योगायोग, अचुक मंत्रसामर्थ्य वा वाचासिद्धीचा नियम नव्हे ! बरें, मी तुम्हांस अुलट विचारतों कीं, रामदासांना मंत्रबळें वा अिच्छाबळें प्रेत अुठविण्याची सिद्धि नियमबद्ध पूर्णत्वानें अवगत वा प्राप्त झालेली होती अशी तुमची तरी निश्चिती आहे का ?"

"अर्थात् ! त्यांच्या अिच्छामात्रें करून ते नियमपूर्वक प्रेतें अुठवूं शकत. तो केवळ योगायोग नव्हता. हेतुपूर्वक नियमानें अचुक घडवून आणतां येणारी ती सिद्धि होती ! जगत्कल्याणार्थ झटणाऱ्या त्या महान तपस्व्यास अशा सिद्धि साध्य होत्या म्हणूनच त्यास शिवाजीराजे देखील 'समर्थ' म्हणत ! तुमच्याआमच्यासारख्या वावदूकांस नी संशयात्म्यांस नाहीं कोणी 'समर्थ' म्हणत ते !" जरा खोंचून रावसाहेब भावे हातवारे करीत म्हणाले.

"शिवाजीची गोष्ट तुम्हींच काढलीत हें बरें झालें" सहस्रबुद्धे हंसले, "आतां तुमचींच वाक्यें जरा जुळवून मी विचारतों

कीं, जगत्कल्याणार्थच झटणाऱ्या समर्थांस जर अिच्छामात्रें करून अचूक नियमानें – योगायोगें नव्हे – प्रेतास जिवंत करण्याची वाचासिद्धि साध्य होती, तर तिचा अुपयोग त्या स्त्रीवर जसा त्यांनीं केला तसा तानाजी सिंहगडीं पडले तेव्हां, किंवा प्रत्यक्ष शिवाजीराजे मृत्युशय्येवर पडून त्या मरणोन्मुख हिंदुपदपादशाहीवर आकाशाची कुऱ्हाड कोसळूं लागली तेव्हां कां बरें केला नाहीं ? त्या यःकश्चित् स्त्रीला सौभाग्यदान देण्यापेक्षां या हिंदुस्वातंत्र्यश्रीस शिवछत्रपतींचे प्राण वांचवून तें सौभाग्यदान देण्यानेंच जगत्कल्याण सहस्रपटीनें साधतां येणारें होतें–नव्हे काय ! अेकतर असें म्हटलें पाहिजे कीं, शिवछत्रपत्रींचें वाढतें महत्त्व पाहून, त्यांचें प्रेत जिवंत करण्याची वाचासिद्धि अंगीं असूनहि मत्सराच्या बळें रामदासांनीं तो चमत्कार तिथें केला नाहीं ! तानाजी, बाजी, शिवाजी असे असे राष्ट्रधुरंधर त्यांचीं प्रेतें अिच्छामात्रें अुठवितां येण्याची शक्ति अंगीं असूनहि, त्यांनीं मरूं देण्याचा भयंकर राष्ट्रद्रोह केला. पण हा आरोप त्या थोर राष्ट्रीय पुरुषावर करणारी दुसऱ्याचीच नव्हे तर माझीहि जिव्हा मी छाटून टाकीन !!! नाहींतर असें तरी आणि हेंच मानलें पाहिजे कीं, प्रेतें अुठविण्याची ती सिद्धि त्यांस सनियम साधली नव्हती, तिचा नक्की नियम किंवा अचुक नी अव्यभिचारी प्रयोग त्यांस अवगत नव्हता; योगायोगानें अेखादे वेळीं तशी बोलाफुलास गांठ पडून गेली, पण कां नी कसें तें घडलें हें त्यांचें त्यांसच कळत नव्हतें !"

"आणि ज्यांस असें कांहींच कळत नव्हतें त्यांस शिवाजीसारखे जे लोक 'समर्थ' म्हणून म्हणत ते सगळे गाढव होते ?" चिडल्यासारखें भावे मध्येंच म्हणाले.

"तसेंहि नाहीं ! कारण त्या स्त्रीचा मेलेला तो नवरा त्यांनीं जिवंत केला नाहीं असें ठरलें तरीहि मी त्यांस 'समर्थ'च म्हणेन. अितकेंच नव्हे, तर त्यांनीं अेकदांतरी मढें अुठविण्याचा चमत्कारहि केला होता असें पुराव्यासह सिद्ध करून देतों !"

“काय म्हणतां ?” अविश्वासू आनंदानें भावे उद्गारले, “सांगा, सांगा; तुमच्यासारख्या सशयात्म्याचेंहि ज्या चमत्कारानें संशय फेडले तें रामदासांचें कोणतें कृत्य तें सांगा ! कोणाचें मढें त्यांनीं खरोखरच अुठविलें ?”

“महाराष्ट्राचें ! महाराष्ट्राच्या प्रेतास त्यांनीं आपल्या वाचासिद्धीनें पुन्हा प्राणविलें ! हा मात्र खरा खरा चमत्कार त्यांनीं केला आणि म्हणूनच त्यांस आम्हीहि ‘समर्थ’च म्हणतों ! !”

००० ००० ०००

रावसाहेब भावे म्हणजे अेक देवमाणूस, म्हणजेच स्वभावानें भाविक, जवळजवळ भावडे ! अशीं माणसें जितकीं शीघ्रकोपी तितकींच शीघ्रसंतोषी ! रावबहादूरांनीं समर्थांची जी शेवटच्या वाक्यांत स्तुति केली ती अैकतांच रावसाहेब भावे अगदीं प्रसन्न झाले. अितके कीं, ती स्तुति काय अर्थी केली, त्यांच्याशीं बोलण्यांत आपलें मूळचें विषय काय होतें, तें मागचें पुढचें सारें अनुसंधान सुटून सहस्रबुद्धेहि आपल्या मताला अनुकूल तेंच बोलले असा अेक संतोषाचा गोळाबेरीज संस्कार तेवढा भाव्यांच्या आठवणींत अुरला ! “शाबास रावबहादुर, शाबास ! लाखाची गोष्ट बोललेत !” असें धन्यवादीत भाव्यानीं सहस्रबुद्धयांची अगदीं चक्क पाठ थोपटली. कढत तापलेलें दूधभांडें मुलगी चालतां चालतां लवडून देते तेव्हां या सांडलेल्या कढत दुधापेक्षां तिचा पाय पोळला कीं काय ह्याच चिंतेनें कासावीस झालेली आअी तो पाय पोळला नाहीं अितकें पहातांच दूध लवंडल्याचा मुलीचा अजागळपणा विसरून जसें कांहीं अेकंदरींत त्या मुलीनें कांहीं वाखाणण्याजोगेंच कृत्य करावें तसें बोलून जाते ‘शाबास मुलीची पण अं ! पाय संभाळला ! !’— अगदीं तसेंच सहस्रबुद्धयांच्या पाखडी शंकांचे मागचे सारे दोष ह्या शेवटच्या वाक्यानें विसरून भाव्यांनीं अगदीं कळकळीनें म्हटलें, “शाबास ! रावबहादुर, शाबास ! पण आतां मला सांगा पाहूं— मी आज मेलेल्या माणसास अुठविण्याच्या

चमत्काराविषयींच कां बोलणें काढलें ? नाहीं लक्षांत येत ?" भावड्या माणसाला आपणहि कांहीं थोडे लवाड नाहीं, आपणहि दुसऱ्यास टोपी घालतों असें दाखविण्याचा फार मोह पडतो. तशाच प्रकारें 'कशी चलाखी केली पण मीं !' असें विचारणाऱ्या मुद्रेनें रावसाहेब भावे यांनीं रावबहादुर सहस्रबुद्धयांकडे पहात डोळे मिचकावले. "नाहीं लक्षांत आलें ? अहो, तुमचें म्हणणें हेंच ना कीं, पुरावा पक्का असला तर मग तुम्ही कितीहि अद्‌भुत नी चमत्कारिक सिद्धि असली तरी हट्ट न धरतां तत्काळ मानाल ? बरें, सगळ्या पुराव्यांत निर्विवाद प्रमाण कोणचें– अगदीं तुम्हां :संशयात्म्यांनाहि गप्प बसविणारें प्रमाण ? प्रत्यक्ष ! हेंच ना ? तर मग, रावबहादुर, मी आज प्रत्यक्ष प्रमाणानें तुम्हांस सिद्धवून देणार आहे कीं, मेलेलें माणूस अुठविण्याची सिद्धि संपादिलेले योगी अगदीं या युगांत म्हणजे अगदीं आज– आणि या जगांत म्हणजे अगदीं याच गांवीं विद्यमान असूं शकतात !" सहस्रबुद्धयांच्या अगदीं जवळ लवून दावल्या आवाजात भावे गंभीरपणें सांगूं लागले, "बोलावयाचें नाहीं कुठें !– अिथें परवां रात्रीं अेका महान् योग्यानें माझ्या समक्ष स्मशानांत अेक मढें अुठविण्याचा अद्‌भुत चमत्कार केला ! तोच प्रयोग मीं आजहि पुन्हा करण्याचें ठरविलें आहे–केवळ तुमच्याकरितां ! आज वद्य त्रयोदशी, रात्रीं बाराला स्मशानांत जायचें ! कां ? स्मशानाची भीति भरली वाटतें मनांत ?"

"स्मशानाची नाहीं, जाग्रणाची ! या भोळसर प्रयोगापायीं फुकट थंडीवाऱ्यांत जाग्रण मात्र व्हावयाचें ! अहो, मेलेलीं माणसें जर जिवंत करतां येतात ह्यांना तर हे त्या सिद्धीचा नियम वा निदान अुपयोग तरी सगळ्या जगास सांगून-सवरून कां करूं देत नाहींत ? ज्या त्या सिद्धीचें अेवढें गौप्य कां ? बोलतां कामा नये सार्वजनिकपणें, हा त्यांचा दंडक !"

विभाग ... क्र. ...

" त्यांच्या गुरूची त्यांना तशी शपथच असते त्याला हे काय करणार ! बरें, ही त्यांची भावना, कीं प्रसिद्धीनें मंत्रबळ घटतें. चुकीची समज; पण म्हणून जे कांहीं प्रयोग ते योग्य प्रसंगीं करतात, ते पडताळून पाहून अशी सिद्धि असूं शकते अितकें तरी ठरविण्यास हरकत कोणती ?"

" तुमचें हें म्हणणें वावगें नाहीं. ठीक तर. मी येतों. पण हे योगी कुठले, त्यांनीं अशीं जिवंत केलेलीं माणसें कांहीं आहेत का, हे आले कधीं, तुम्हांला यांची ओळख किती दिवसांची, याची कांहीं-तरी फोड मला तुम्हीं करून दिली पाहिजे !" सहस्रबुद्धे विचारपूर्वक अेकेक वाक्य अुच्चारूं लागले.

" माझ्याहूनहि स्वानुभवानें ती माहिती पडताळून निष्ठावंत बनलेले एक दुसरे साक्षीदारच ते तुम्हांस सांगतील. अेकसे दो भला !" असें बोलत रावसाहेब भावे अुठले, खोलीचें दार अुघडले, बाहेरच्या बंगल्यांत पानसुपारीच्या तबकाभोंवतीं बसलेल्या मंडळींतून अेका गृहस्थास बुलावून आंत घेतलें, दार पुन्हा लावलें नी म्हणाले, " ह्यांचें नांव धनजीशेठ. कलकत्त्याचे श्रीमंत व्यापारी. त्या सिद्ध पुरुषाचें पूर्ण परिचित. ह्यांचा अेकुलता अेक मुलगा असाध्य रोगानें पछाडल्यामुळें त्या सिद्धपुरुषास कलकत्त्यास येअून आपल्या मुलास जीवदान द्यावें असें विनविण्यास अियें आले आहेत. ह्यांनींच मला त्यांची ओळख घालून दिली नी परवाचा प्रेत अुठविण्याचा चमत्कार यांच्याच कृपेनें नी वशिल्यानें मला पहावयास मिळाला !"

धनजीशेठजींस सहस्रबुद्ध्यांनीं नानाप्रकारचे प्रश्न काढून अितकी माहिती मिळविली कीं, ह्या सिद्धानें अनेकदां मढीं अुठविलीं आहेत. पण जगाची रहाटी बिघडूं नये म्हणून त्यांस पुन्हा निर्जीवहि केलें. तीनचार मृतांस मात्र त्यानें नित्याचें जीवदान दिलें, त्यांपैकींच अेका सरदाराचा मेलेला मुलगा जो त्यानें अुठविला तोच आज त्या

सिद्धाचा पट्ट शिष्य म्हणून त्याच्यापाशीं आहे ! त्या प्रत्येक अद्भुत प्रयोगाची यज्ञदक्षिणा म्हणून निदान अेक हजार रुपये साधूस द्यावे लागतात. पण ते परस्परें त्यांच्या महंताच्या हिमालयांतील आश्रमांत धाडले जातात. सिद्ध पूर्ण विरक्त, दिवसभर ध्यानमग्न. ह्या सिद्धि मंत्रबळें साधल्या. पण सोन्याच्या रसांत वेडकांचीं हृदयें अमावस्येस अुकळून त्या मंत्राचें साधन करावें लागतें नी तें दहा शेर सोनें "यमदूतेभ्यस्वाहा" म्हणून दक्षिणसमुद्रांत फेकून द्यावें लागतें ! प्रयोगाच्या अशा व्ययासाठींच दक्षिणा द्यावी लागते ! धनजीशेठ अत्यंत आवडते शिष्य; म्हणून अितकीतरी माहिती त्यांना मिळू शकली होती. आजच्या प्रयोगास्तव धनजीशेटनीं अेक हजार नी रावसाहेब भाव्यानीं अेक हजार अशी दक्षिणा दिली होती. रावबहादुर सहस्रबुद्धयांनीं नुसती प्रयोग अवलोकन करण्याची कृपा केली तरी पुरे ! तें दाक्षिण्य हीच त्यांची दक्षिणा !!

००० ००० ०००

मध्यरात्र किर्रर करीत होती. काळोख मी म्हणत होता. स्मशानांतील त्या कभिन्न अंधःकारांत अेक धुनीसारखें लहान कुंड पेटून धगधग करीत होतें. त्या कभिन्न काळोखाचा जसा लाल डोळा !

योग्यानें खुणावलें. त्या धगधगणाऱ्या लहान कुंडाच्या अशाश्वत प्रकाशाचे पलीकडे भावे आणि सहस्रबुद्धे अुभे होते, तेथून धनजीशेट पुढें आले. त्यांच्यावर मंत्रित पाणी शिंपडून त्यांस भारून सिद्धानें धनजीशेटांसह जवळून आधींच अुकरून ठेवलेलें अेक मढें आणलें. त्यावर पांढरी स्वच्छ चादर घातली होती.

"हेंच मढें ना ? ह्यासच हे सिद्धपुरुष अुठविणार ?" सहस्रबुद्धे यांनीं भाव्यांस विचारलें. "हो." भावे हळूच म्हणाले. तत्काळ सहस्रबुद्धयांनीं मनांत 'मख्खी ती हीच !' म्हणून म्हटलें आणि मला ती चादर काढून जवळ जाअून मढें आधीं पहातां आलें पाहिजे असा

आग्रह धरला. न जाणों कुणी बुवांचा सांगालागून मनुष्य मढ्याचें सोंग घेअून चादरीखालीं निजला नसेल म्हणून कशावरून! ह्या सहस्रबुद्ध्यांच्या शंकेचा भाव्यांस रागहि आला. संशय घ्यावा—पण त्याचाहि अतिरेक फाजीलपणा आहे, असें ते कातावले देखील; पण सहस्रबुद्धे पुढें झाले. सिद्धपुरुष चादर काढण्यास अनमान करूं लागले!— तेव्हां तर सहस्रबुद्ध्यांनीं चादर काढलीच पाहिजे म्हणून निक्षून सांगितलें. बिंग फुटलें हें त्यांस धडधडीत दिसून आलें! आणि त्यांनीं सिद्धपुरुषाच्या अनुज्ञेची वा भाव्यांच्या रागाची पर्वा न करतां चादर स्वतःच ओढून बाजूस सारली!

—तों काय? तें धडधडीत मढेंच होतें!!!

सहस्रबुद्धेहि ओशाळले. भावे म्हणाले, "संशयात्मा विनश्यति!" तो सहस्रबुद्ध्यांना देखील खरा वाटूं लागला. अिथें कांहीं गडबडगुंडा नाहीं खराच, हें नाणें खरें आहे, असें त्यांचें मनच त्यांना सांगूं लागलें! "चालूं द्यावा प्रयोग" असें म्हणून भावे आणि सहस्रबुद्धे पुन्हा मागें सरकून अंधेरांत दूर अभे राहिले. अभिमंत्रित जागीं त्या धगधगीत कुंडाच्या ज्वालेसह येत्याजात्या अंधुक अुजेडांत मढें ठेवून तो सिद्धपुरुष आहुति टाकूं लागला!

"आतां भुतें येतील! पण बेटा, डरना नही!" असें योग्यानें सांगितलें न सांगितलें तों त्याच्यामागें अेकटेच अुभे असलेल्या धनजीशेटांचे बाजूनें अगदीं अमानुष आणि घोगरा असा आवाजाचा कल्लोळ अुठला!— हीः हीः हीः! अूं ऽऽऽ! ह्याः ह्याः ही:ऽऽ ही:ऽऽ हीः!!!

सहस्रबुद्धेहि चमकले, भावे थरथर कापत त्यांच्या हातास घट्ट धरून राहिले. सहस्रबुद्ध्यांनीं आपले हातांतील चमक (बॅटरी) दाबून प्रकाश दूरवर पाडला; पण त्या चौघांवांचून पांचवा प्राणी म्हणून कुठेंहि आढळेना.

काळचाकभिन्न अंधेरांतून आवाजांचा थवा भयंकर पण दाबल्या, घोगऱ्या स्वरांत सुन्न मसणवटच बोलावी तसें पुन्हा मिसळून अुठला– हीः हीः हीः ! अूं ऽऽऽ ! ह्याः ह्याः हीः ऽऽऽ ! !

अकस्मात तो सिद्ध अुभा राहिला, "चुप्प ! रे यमदूतो ! चुप्प ! लोट जाव !"

दंड थोपडून तो हें ओरडतांच तो हलकल्लोळ चुप्प झाला ! मसणवटी, गळा घोटावा तशी, सुन्न झाली !

शेवटची आहुति पडली. सिद्धानें "ओम् फट् !" म्हणून टाळी मारली ! त्यासरशीं—

मढें हालचाल करूं लागलें ! त्या धगधगीत कुंडाच्या अंधुक अुजेडांत चक्क दिसलें–तें मढें अुठूंहि लागलें ! !

सहस्रबुद्ध्यांच्याहि अंगावर शरकन शहारे आले ! धनजीशेठ दूर होते ते झपकनी येअून खेटून अुभे राहिले नी भयभीत स्वरें म्हणाले, "तें पहा ! !"

थरारलेलें चित्त ठिकाणावर आणून सहस्रबुद्ध्यांनीं शेवटची शंका फेडण्यासाठीं– सिद्धाची अनुज्ञा नसतांहि–पुन्हा आपल्या हातातली चमक दावली आणि ते किरण मढ्यावर पाडले; तों काय ?–

बाप रे ! मढें नुसतें अुठलें होतें तें झोकांडया खात चालूं लागलें ! ! ! सहस्रबुद्धेसुद्धां अितके दचकले कीं, चार पावलें झटकन मागें झाले !

"अरे बापरे ! यापुढें क्षणभर जरी तें मला दिसलें ना तरी मी कोसळलोंच खालीं म्हणा !" असें थरथरथर कांपल्या स्वरांत बोलून धनजीशेटांनीं ती चमक सहस्रबुद्ध्यांच्या हातून हिसकावून विझवली; आणि "बस्स ! क्षमा करा योगीराज ! नी संपवा हा

चमत्कार" ! अशी सिद्धास काकुळती केली ! त्यासरशीं पाण्याची कळशी पटकन यज्ञकुंडावर ओतून सिद्धांनीं यज्ञहि विझवला !

त्या स्मशानांत पुन्हा जिकडेतिकडे सुन्न झालें. मध्यरात्र किर्रर्र करूं लागली. तो काळाकभिन्न काळोख, त्याचा घुनीसारखा धगधगलेल्या लहान कुंडाचा तो अेकेरी लाल डोळाहि मिटून अखंड अंधारांत झोंपीं गेल्यासारखा वाऱ्यावारी लागला.

०००　　　　०००　　　　०००

भाव्यांनाच नव्हे तर सहस्रबुद्धयांनाहि स्मशान सोडून घरीं केव्हां येईन असें झालें होतें. त्यांचें हृदयहि धडकी बसल्यासारखें अुडत होतें. घरीं जातांना भाव्यांनीं अेकदां अितकेंच विचारलें, "रावबहाद्दुर, आहे ना चमत्कार खरा ?" सहस्रबुद्धे अुत्तरले, "खोटा कांहीं म्हणतां येत नाहीं खराच !"

रात्रभर सहस्रबुद्धयांना गाढ झोंप आली नाहीं. डोळा लागतांच, तें मढें झोकांडया खात पुढें सरकत आहे, – असें भासून ते वारंवार दचकत होते.

अितर जिवंत केलेल्या मढ्यांप्रमाणें पुन्हा निर्जीव करून न टाकतां जिवंतच ठेवलेल्या त्या सिद्धाचा तो तरुण शिष्य आपल्या ओळखीचा व्हावा, त्याची माहिती त्यांच्याच तोंडून अैकावी, अशी मनावर अिच्छा सहस्रबुद्धयांस झाली. त्या शिष्यास सहसां फिरूं देत नसतात– सकाळीं नदीवर तेवढा अेकटा असतो हें त्यांस कळलें होतें. ती संधि साधायचा त्यांनीं बेत केला. दुसरे दिवशीं सकाळीं अेकटेंच नदीवर टेहळीत राहिले. तो येतांच त्याची गांठहि घेतली.

त्या दिवशीं संध्याकाळींहि तो तरुण शिष्य रावबहाद्दूरांचे घरीं अेकटाच गुप्तपणें येअून कांहीं वेळ कांहीं गोष्टी बोलतहि बसला होता.

जातांना त्याच्या हातावर नोटांचें अेक पुडकें रावबहाद्दुरांनीं 'भेट' म्हणून दिलें आणि मोकळेपणीं हंसून म्हटलें, "आहे खरा! हे सिद्ध मढीं अुठवतात हा जमत्कार तरी आहे खराच बुवा!!! आपण हा प्रयोग पुन्हा अेकदां तरी करविणारच!!!"

००० ००० ०००

सहस्रबुद्धयांचा, स्वतः दोन हजार यज्ञदक्षिणा देअून हा प्रयोग पुन्हा करविण्याचा, हा श्रद्धामय आग्रह पाहून भाव्यांना तर आणखी अेक दुसरा अभ्दुत चमत्कार झाल्यासारखा आनंद झाला. पेरावे कुळीथ आणि हंगाम यावा गव्हांचा तसे धनजीशेटहि आनंदानें चकित झाले. गांव सोडण्याच्या आधीं पुन्हा प्रयोग करण्यास, हो ना करतां करतां सिद्धहि सिद्ध झाले. आमावास्येचाच मुहूर्त ठरला.

त्या भयाण मसणवटींत, त्या अमावास्येच्या मध्यरात्रींच्या काळ्याकभिन्न अंधारानें, लहानशा धगधगीत यज्ञकुंडाचा आपला अेकेरी लाल डोळा पुन्हा अुघडला! त्या आहुती, त्या भुतांचा तो अमानुष किंकाळ्यांचा कोलाहल, ते दंड थोपटून सिद्धानें अज्ञापिलेले 'चुप,' तो 'ओम् फट्,' यथापूर्व होअून 'अूठ! मृता अूठ!!' हृणून सिद्ध ओरडतांच त्या दिवशींचें तें दुसरें मढेंहि अुठूं लागलें!!

तोंच!—

मंत्राचें कोणचें अक्षर चुकून मागेंपुढें झालें काय कीं, त्या मढ्यांत प्राण संचारतां सहस्रबुद्धयांच्याहि अंगांत कुणी भूत संचारलें! आपल्या चमकीचा झोत त्या मढ्यावर पाडून, बेछूट धांवून सहस्रबुद्धयांनीं लाथेसरशीं तें मढें पुन्हा खालीं पाडलें,– तों काय? त्या मढ्यांच्या मागें अेक जिवंत माणूस अुभा!!

त्यास गच्च धरून सहस्रबुद्धे ओरडले, "भावे रावसाहेब पुढें या! मढें अुठविणारा तो अभ्दुत मंत्र हा पहा मीं मूर्तिमंत पकडून ठेवला आहे!"

तो मनुष्य– तो मूर्तिमान मंत्र दुसरा कोणी नसून त्या सिद्धाचा तो तरुण शिष्यच होता!

चमकेच्या झोतांत मुखदुर्बळ झालेल्या रावबहादुर भाव्यांस परिस्थिति दाखवीत सहस्रबुद्धे म्हणाले, "हा खड्डा पहा मढें ठेवायच्या जागीं मनुष्य वर अगदीं न दिसेसा खोल बसेल असा हा खड्डा हे सिद्ध पुरुष खणून ठेवतात. त्यांत हा तरुण शिष्य छपून बसतो आणि 'ओम् फट्!' म्हणून त्या धूर्त गुरूनें म्हणतांच मढ्यामागें अगदीं सफाअीनें लपत छपत त्याला पुढें अुभें करून आपण मागें धरून राहतो!! आणि हें कपट ताडण्याअितका प्रेक्षकांचा धीर आधींच खचलेला असावा म्हणून तीं भुतें अमानु गलबला आधींच करीत असतात!"

"म्हणजे? भुतें तरी अुठतातच? तोहि अेक–"

"चमत्कारच– हा पहा! असेंच म्हणणार असाल? या, तोहि चमत्कार हा पहा. हीं पहा तीं भुतें! गोंधळून गांगरून गेलेल्या धनशेटजीस आसस्मात् धरून त्याच्या मोठ्या खिशांतून अेक रबरी फुग्यांचा वेडेवांकडे आवाज काढणारा बाजा सहस्र-बुद्धयांनीं बळानें अुपसून काढला आणि वाजवीत म्हटलें, "हीं तीं भुतें! आणि ह्या सगळ्या भुतांत अत्यंत खोडसळ भूत जर कोणचें असेल तर तें तो ढोंगी सिद्ध नव्हे, हा भिकारडा तरुण नव्हे– तर हा अट्टल बदमाष धनजीशेटच होय! तिन्हाअीत म्हणून हा गांवो-गांवीं ह्या साधूची प्रसिद्धी करी आणि रावसाहेब, आपल्यासारख्या श्रीमंत पण भोळ्या जीवांस जाळ्यांत पकडी! पण अुपटलेली हजारों रुपयांची यज्ञदक्षिणा हे दोघे बिलंदर भामटेच खातात हें पाहून हा भिकार तरुण आतांशीं बिघडला होता. आजची यज्ञ-दक्षिणा मीं त्यास आगाअूच देअून टाकल्यामुळें ह्या मढीं जिवंत करणाऱ्या अभ्दुत चमत्काराचें मांत्रिक कुलुप अुघडणारी ही किल्ली

त्यानें गुपचूप मला दिली ! त्यास अभयवचन मीं दिलें आहे म्हणूनच ह्या बिलंदरास मी पोलिसाच्या हवालीं करीत नाहीं. पण अशा अवडंबरास पुन्हा कोणी फसूं नये म्हणून या हालचालीचें हें बिंग मात्र प्रकटपणें फोडणार ! ”

ते बिलंदर रातोरात बेपत्ता झाले ! पण बिचारे रावसाहेब भावे ! सगळ्यांच्या चेष्टेचा विषय झाला बिचारा ! जो तो म्हणे—रावबहाद्दुर कांहीं अगदींच फसले नाहींत अं ! मढीं जिवंत करण्याचा नसला तरी मढीं अुठविण्याचा चमत्कार तरी खरा आहे !! अुठवून अुभी करीतच होता तो सिद्ध मेलेलीं मढीं !!!

# अपघात कीं आत्मघात ?

‘ कर, नमस्कार कर अं बाळा वडाला ! अस्सा ! देवबाप्पा आहे बरं हा वड !’ भिमाबाई पाटलिणीनें आपल्या दोनअडीच वर्षांच्या लहानग्यास भक्तिभावानें वडाच्या मुळावर डोकें ठेवावयास सांगितलें. त्या वडास भिमाबाअी गेलीं आठ वर्षें, लग्न होऊन ह्या तिच्या सासरीं आल्यापासून, नित्य नेमानें शंभर तरी प्रदक्षिणा घातल्यावांचून जेवत नसे. ती जरी त्या गांवच्या मराठी पाटलाच्या जुन्या घराण्यांत दिली होती, तरी सध्यां त्यांच्याकडे नांवापलीकडे पाटिलकी अशी नव्हती. उलट अगदीं निर्धन होतें तें कुटुंब. त्यांतहि दीड वर्षापूर्वी तिचा नवरा प्लेगांत वारला, तेव्हां तिचें हें अेकुलतें अेक मूल घेऊन ती त्या वडाशेजारीं विखुरलेल्या दहापांच झोपड्यांपैकीं अेका झांपाच्या झोपडींत राही, दिवसांरात्रीं वेळ सांपडेल तशा विड्या वळी, नी अेका मराठा पानतंबाखूवाल्या

दुकानदारास त्या घरवसल्या विकून त्या तुटपुंज्या उत्पन्नावर आपलें पोट भरी. ती आतां मध्यम वयाची होती. त्या अेका लहान मुलांवांचून तिला मागेंपुढें कोणीहि नव्हतें. तो वड तिचा देव, नी तें मूल तिचा जीव.

वडाच्या प्रदक्षिणा संपवून त्या मुलास त्या वडाच्या पायावर घालून, नैवेद्याचें थेंबभर दूध त्या मुलास तिनें प्यावयास दिलें. दुधाचा असा त्या मुलास तेवढाच अुकाडा! पण तें थेंबभर दूध वडाच्या-देवाच्या– नैवेद्याचें! तिला वाटे, तें प्याल्यावर अितर मणभर दुधा-दह्यानें जी पुष्टि तिच्या बाळास येणार नाहीं, ती त्या वडोबाच्या प्रसादानें आल्यावांचून राहणार नाहीं. तें मूल मुळीं जन्मलें तेंच वडोबाच्या प्रसादानें! कारण लग्न होतांच शेजारच्या चार आया-बायांच्या सांगण्यावरून वडास प्रदक्षिणा घालण्याचें जें व्रत तिनें घेतलें तें मुलगा व्हावा म्हणूनच होतें. तशा नवसावांचूनहि तिच्य बरोबरीच्या बायांना अेक सोडून तीनतीन मुलगे झाले होते. पण पांच वर्षें प्रदक्षिणा घातल्यावर झालेलें हें अेक मूल त्या वडाच्याच सेवेनें नी प्रसादानें झालें असें तिलातेवढें वाटे. वडपिंपळाला वस्तुतःच देवता मानणाऱ्या त्या भाविक हिंदु वस्तींत तिच्या या श्रद्धेचें सर्वत्र कौतुक होअी. अितकेंच नव्हे, तर तिची ती श्रद्धा त्या वडाच्या जागृत दैवताची प्रतिष्ठा नी पूजा विशेषच भक्तिभावानें दूरवर फैलावण्यास कारण होअी.

समोरच्या माळावर असाच अेक जुनाट सुकट पोखरलेला वड होता तो माळ मिशनरी साहेबानें विकत घेअून तिथें दुसरीकडून दुष्काळाविष्काळांतून बाटवून वा पळवून आणलेलीं मुलें पाळण्यासाठीं अेक मिशनची चाळ नी बंगला बांधला; तेव्हां तो निकटचा वड नी दोनतीन तसलेच रोगट पिंपळ बंगल्याच्या नी चाळीच्या रचनेस आड येतातसे पाहून मुळांसुद्धां अुखडून टाकले. नंतर त्या माळा-लगत जो नवा पथ बांधला त्याच्या दोन्ही रांगांस नवे वड नी पिंपळ

असे छान रेखून लावले कीं, त्यांच्या सलग कमानीखालीं तो पथ-म्हणजे अेखाद्या सुदीर्घ कुंजासारखा भर अुन्हाळ्यांत देखील शीतल वाटावा. त्या वडपिंपळाच्या तिरप्याशिरप्या फांद्या प्रतिवर्षी काटून छाटून त्यांना माणसाळविलेल्या हत्तीच्या सोंडेंत धरविलेल्या चवरी-सारखे मनुष्याच्या सोयींसोयीनेंच डोलत झुलत रहावयास भाग पाडलें होतें. वड पिंपळ मुळासकट उपटणाऱ्या, प्रत्यहीं त्यांच्या फांद्या कापणाऱ्या, अेकहि प्रदक्षिणा न घालणाऱ्या त्या मिशनला कोणत्याहि त्वड पिंपळानें 'मुलें न होण्याचा' शाप कसा दिला नाहीं? अुलट यिा मिशनमधलीं मुलें अधिक गुटगुटीत नी वाढत्या संख्येची कशीं, अितकेंच नव्हे तर अेकदोन प्रसंगीं अलीकडेच त्यांच्या बंगल्यांतील दोधी बाळंतणींस सुरेख असे जुळे मुलगे अुपजून ते दुडुदुडु त्या माण-साळलेल्या वडपिंपळांच्या छायेंत खेळत असतां त्यांना त्या तोडलेल्या वडपिंपळावरील रागीट मुंजोवानें अेकहि बोचकारासुद्धां आजपर्यंत कसा घेतला नाहीं? असें भिमाबाईस त्या भागाच्या वतीनें त्या गांवच्या नगरसंस्थेंत सभासद म्हणून निवडून गेलेले डॉ. मोहिते हे पुष्कळ वेळां विचारीत आणि समजावून सांगत कीं, ज्या अर्थी तो वड अगदीं पोखरलेला, रोगीट छायाशून्य नी पडावयास आलेला आहे त्या अर्थी त्याच्या आसपासच्या झोंडच्यावरचें तें अेक संकटच टाळ-ण्यासाठीं तो पाडून अुखडून टाकणेंच अिष्ट.

डॉ. मोहिते हे भिमाबाअीचे दूरचे नातलग. त्यांना म्युनिसि-पालिटींत निवडून देतांना त्या विचारीला स्वताचें मत नव्हतें, तरी दोनतीन नातलगांचीं मतें तिच्या यत्नानेंच मिळालीं होतीं. पण पुढें नगरसंस्थेंत गेल्यावर डॉक्टर मोहित्यांनीं आपल्या भागांतील वाटा, आळी, अंगणें, चौक स्वच्छ, बिनधोक नी रेखीव करून तिकडचें आरोग्य वाढवावें असें मनांत आणून काम चालू केलें. खळगे-खांचा भरून वाटा सुधारल्या, बोळांतील उकरिडे, घरांच्या रांगा-मध्येंच सांचलेलीं डबकीं, माजलेलीं झुडपें, सडलेले गडगे साफसूफ नी नीटनेटके केले आणि आतां मुख्य सडकेच्याच कोंपऱ्यावर तिरप्या

पुढें आलेल्या अेका दगडी ढिगाऱ्यांतून ज्याचा जुनाट, पोखरलेल नी सुकट सोट वर गेला आहे, अेक आडवी अस्ताव्यस्त वांकलेली फांदी सडकेच्या डोक्यावर अुगारलेल्या लाठीप्रमाणें आलेली आहे; नवीन पालवीचे अुगीच कांहीं झुबके वर्षाकांठीं फुटत, तेव्हां काय तें तें झाड आहे, पुरलेला नी बांधलेला वासा नव्हे असें वाटे, अितका जो निर्जीव निःसत्त्व नी छायारहित झालेला आहे, असा तो वड पाहून तो तिरपा ढिगारा काढून सडकेवरील ती आडकाठी नी त्या ढिगाऱ्याच्या भोंवतीं वेडयावांकडया बांधलेल्या झोंपडयांतील माणसांवरचें तें संकट दूर करावें, असा डॉ. मोहित्यांनीं बेत केला. पण ही गोष्ट लोकांस कळतांच त्या वसहातींत अेकच गवगवा नी आरोळा अुठला ' आमचा वड ! आमचा वडोबा देव ! पाडूं देणार नाहीं ! आमच्या धर्मभावना दुखवितां कामा नये ! '

भिमाबाई पाटलिणीला तर तो तिचा पूजेचा वड पाडूं पहाणाऱ्या डॉक्टर मोहित्यांचा मनस्वी राग आला होता. ज्या वेळीं नगरसंस्थेंत तो ठराव येणार होता. त्याच्या आधींच त्या वस्तीच्या लोकांनीं वड पाडून आमच्या धर्मभावना दुखवूं नयेत, अशा निषेधाचा अेक अर्ज करण्याचें ठरविलें होतें; आणि त्यावर सह्या घेण्याचें काम जोरानें चाललें होतें. त्याविरुद्ध वड तोडावा असें म्हणणाऱ्यांचा अर्जहि अर्थात व्हायचा; पण त्यावर सह्या मिळणें फार कठीण जाऊं लागल्यामुळें त्या दिवशीं डॉ. मोहिते हे स्वतः घरोबर हिंडून लोकांची समज घालीत होते. त्याच भागांत मोडणाऱ्या त्या मिशनच्या चालक मिस ल्यूसी ह्या अमेरिकन बाई तो वड तोडावा ह्याच मताच्या; त्याहि नगरसंस्थेच्या मिशनरी सभासद; ह्यासाठीं त्याहि वड तोडण्यास अनुकूल मतें मिळविण्याचें काम काढून घरोघर हिंडत होत्या. परंतु वडाच्या प्रकरणापेक्षां हिंदुधर्म किती ' सुपरस्टिशस ' —धर्मभोळा आणि ख्रिश्चन धर्म हाच कसा धर्मभोळेपणापासून सर्वस्वीं अलिप्त, हें पुराण पाल्हाळानें सांगत बसण्यामध्येंच मिस ल्यूसीबाअी त्या संधीचा अुपयोग अधिक प्रामुख्यानें करीत होत्या.

भिमाबाअी आपल्या मुलास वडाच्या पायथ्यावर डोकें ठेवण्यास सांगून पूजा आटोपून त्या ढिगाऱ्याच्या खालीं मुलास अुतरवून जों आपल्या खोपटाशीं येअून पहाते तों मिस ल्यूसी हंसतमुखानें तिथें अुभ्या असलेल्या तिला दिसल्या. वड तोडावा अशा मताची सही भिमाबाअीनें द्यावी असें त्या म्हणाल्या तेव्हां 'मी काय तें उद्या सांगेन' असें म्हणून भीमाबाअीनें वेळ मारून नेली. मिस ल्यूसी त्या झोंपडयांतील मंडळींत नेहमीं मिसळे, खाअू वाटी, बायबलचीं गाणीं गाअी. 'वडाच्या पूजेचें फळ म्हणजे हें माझें बाळ' असें भिमाबाअीनें बोलण्याच्या ओघांत गहिंवरून सांगितलें, तेव्हां मिस ल्यूसीनें त्या विषयाचा ओघ आपल्या आवडत्या प्रकरणीं मिळवून म्हटलें, 'वेडें खरें! पण आअीचें प्रेम हो टुमचें हें! या प्रेमानें देवादिकांना सुद्धां गहिवर येतों वरें! आमच्या देवी मेरीचेंच पहा ना! गाणेंच म्हणणें अं हें!' असा उपक्रम करून मेरीला येशूची मूर्ति पाहून प्रेमाचा पान्हा कसा फुटला त्याचें अेक बायबलांतील कथें-वरचें मराठीं गाणें म्हणण्यास तिनें आरंभ केला! बाअी गोरी, गाणें मराठी, गळा गोड, नको म्हटलें तरी भिमाबाअीस तें अैकावेसें वाटलें. दहा पांच अितर बायामुलेंहि जमलीं. तें गाणें चाललें आहे तोंच डॉ. मोहितेहि सहयांचा अेक कागद घेअून तिथें आले. त्यांस पहा-तांच मिस् ल्यूसी अुठल्या नी विषय झटकन् बदलून म्हणाल्या, 'हॅलो डॉक्टर! या टुमच्या हिंदु लोकांट काय धर्मभोळेपणा भरला हें बघा! अे बाअी समझटे है की वडाचे प्रसाडानें टिला मुलगा झाला! विश्वास टरी कसा बसटो अशा भाकड समजुटीवर? टुमच्यासारखें 'रॅशनॅलिस्ट' लोक यांना सुधारीट कां नाहींट?'

डॉ. मोहिते थोडे हंसून म्हणाले 'मिसीसाहेब, माझ्यासारख्या खऱ्या रॅशनॅलिस्टसंबंधीं विचाराल तर मला तुम्ही दोघींहि सारख्याच धर्मभोळ्या वाटतां! अहो, तुम्ही आत्तांच श्रद्धापूर्वक जें गाणें म्हणत होतांत तेंच आठवा! वडाच्या प्रसादानें मुलगा झाला ही ह्या भिमाबाअीची श्रद्धा बुद्धिवादानें टाकाअू ठरते हें तुमचें म्हणणें

जितकें:खरें आहे, तितकेंच कुमारी मेरीच्या पोटीं देवाच्या तेजानें येशू ख्रिस्त जन्मले ही तुमची श्रद्धासुद्धां टाकाऊ ठरते हेंहि खरें नाहीं काय ?

' पण ही आमची धर्मभावना है !'

' आणि वडहि ईश्वराचें प्रतीक, त्याच्या प्रसादानें मूल होतें ही भिमाबाओीची धर्मभावनाच आहे. ती तिची भावना खुळी आहे असें बुद्धिवादाच्या, ' रॅशनॉलिझम 'च्या प्रचारार्थ जर तुम्ही सांगतां आणि तें चांगलेंच करतां, तर त्याच बुद्धिवादाच्या कसोटीस तुमच्या धर्मभावना लावण्याचा अधिकार मलाहि असला पाहिजे ! अहो, पृथ्वी वाटोळी आहे हें सांगणाऱ्यालाहि धर्मभावना दुखवितो म्हणून ख्रिश्चनांनीं ठार केलें. पृथ्वी फिरते हें सांगण्याविषयींहि दंड झाला ! फार काय, अमेरिका खंड शोधणाऱ्या कोलंबसासहि बायबलमध्यें न सांगितलेले देश आहेत असें म्हणून आमच्या धर्मभावना हा दुखवतो, या आरोपाखालीं ख्रिस्ती धर्मगुरूंनीं अपराधी ठरविलें नव्हतें काय ? धर्मभोळेपणाचा मक्ता हिंदु लोकांनाच तेवढा दिलेला आहे ही तुमची समजूत नी शेखी हाहि अेक धर्मभोळेपणाच आहे. खरा बुद्धिवादी ज्या ज्या समजुती असत्य वा लोकहितास प्रत्यक्षपणें अपायकारक आहेत त्या त्या सुधारूं झटतो, मग त्या ख्रिस्ती असोत, हिंदु असोत, मुसलमानी असोत ! आणि अशा खुळ्या समजुती सर्व धर्मांतील लोकांत धर्माचें कातडें पांघरून बोकाळलेल्या आहेत. हिंदूंतील धर्मभोळ्या समजुती काढून त्यांच्या गळ्यांत मुस्लिम वा ख्रिस्ति धर्मवेडेपणाचा धोंडा बांधणें हा कांहीं बुद्धीवादाच्या प्रचाराचा प्राणाणिक मार्ग नव्हे ! '

अितक्यांत समोरच्या चर्चमध्यें सकाळचे अकरा वाजल्याचे ठोके पडले. मिस ल्यूसीसमोर भिमाबाओी वडाविषयीं मनमोकळें बोलणार नाहींत असें वाटून नी घरीं जाण्याची वेळ होअन गेली म्हणून

डॉ. मोहिते भिमाबाईस 'आतां मला गेलंच पाहिजे, संध्याकाळीं येअीन अं !' असें सांगून मिस ल्यूसीबाअीसह बोलत बोलत परत गेले. भिमाबाअीनाहि हायसें वाटलें. कारण त्या डॉ. मोहित्यांच्या भिडेस बळी पडण्याचें टाळीत होत्या. 'वड पाडूं नये या अर्जावर सही मागणारे लोक आधीं भेटावे अशी त्यांची अिच्छा होती.

'वडदेवा, तुला पाडून टाकणारांचेच दांत पडोत !' असा भिमाबाअीनें आज पूजा संपतांना त्या वडालाच नवसहि केला होता.

अितक्यांत पंचवीसतीस लोकांचा घोळका घेअून भिगार्डे वकील य । वस्तींत वादळासारखे आले. 'सह्या करा ! खोड मोडा ह्या वडपाड्यांची ! तुम्ही कोणत्या पक्षाचे ! वडपाडे कीं वडराखे ? सनातनी कीं सुधारक ? असा ते लोक अेकच गलका करीत सह्यांवर सह्या घेत चालले. सही नसली तर आंगठ्याचे ठसे. त्या वस्तींत बहुतेक वस्ती वडराखे पक्षाचीच होती. भिमाबाअींनींहि आपण होअून सही दिली नी वडाचें तें दैवत किती जागृत आहे हें आपल्या स्वतांच्या अनुभवें सर्वांना कळकळीनें सांगितलें. कडेवरच्या मुलाची हनुवटी वर अुचलून भिमाबाअी आंसवें गाळीत म्हणाली, 'माझ्या प्रदक्षिणांच्या व्रतास वडोबा पावला नी हें बाळ मला दिलें ! माझ्या वंशाच्या वेलीला फूल आलें ! पुढें लगेच ह्या तान्हुल्याचे वडील प्लेगांत अिथेंच ज्या दिवशीं वारले त्या दिवशीं मीं या लेंकराला ह्या वडाच्याच पायावर घातलें नी म्हटलें, 'देवा वडा, आतां तूंच माझ्या लेंकराला सांभाळ ! तुझ्या सांवलींत तुझ्या पायावर हें माझें मूल लहानाचें मोठें होअून कापसारखें पांढरे शुभ्र केंस होअीतों नांदूं दे. चिरंजीव होअूं दे !' दहापांच वेळां दहापांच येत्याजात्यांना तिनें तेंच तें सांगितलें नी प्रत्येक वेळीं कथेचा पूर्णविराम झाला कीं अेक असे त्या लेंकराचे दहापांच मुके घेतले.

वडराखेपक्षाचा तो घोळका परत चालला. सगळ्यांच्यापुढ श्री. भिगार्डे वकील तावातावानें प्रतिज्ञा करीत होते कीं, 'ह्या

वडपाड्यांचे दांत पाडीन तरच मी भिताडें ! ह्या सगळ्या पाखं-डांचा मूळकंद म्हणजे हा धर्मबुडाअू डॉ. मोहिते ! पण त्याचा तरी दोष काय ? अशा अस्त.नींतल्या निखाऱ्यांना म्युनिसिपालिटीच्या अस्तनींत ठेवणारें तुम्ही मतदारच दोषी आहांत ! आतां द्याल का पुन्हा त्याला निवडून ?'

सारे लोक अेकमुखी कण्यासारखे ओरडले, 'अुभा तर .राहू द्या आतां त्या गॉक्टर मोहित्याला पुन्हा ! आतां भिगार्डे वकिलांनाच निवडून देणार ! वकील महाशय, तुम्हीं राहिलेंच पाहिजे आं अुमे. अेक वेळ हा वड पडूं देअूं पण भिगार्डे वकिलांना निवडणुकींत पुन्हा पडूं देणार नाहीं !'

लोकांची ही प्रतिज्ञा अैकतांच भिगार्डे वकील 'आतां वड पडला तरीं चिंता नाहीं' असें सपकन् बोलून जाणार होते; पण वेळींच त्यांनीं ते शद्व गिळले. भिगार्डे वाणीजातीचे. पूर्वीं अेकदां कथेंच्या वेळीं देवळांत त्यांना ब्राम्हणांनीं बुक्का लावण्याचें नाकारलें; तेव्हां ते स्वत:स सुधारक म्हणवून ब्राह्मणांस यथेच्छ शिव्या हांसडीत. त्याचें प्रायश्चित्त गेल्या :निवडणुकींत त्यांना मिळून ते पडले नी डॉ. मोहिते निवडून आले. ही वड न पाडण्याची चळवळ त्यांनीं कां हातीं घेतली हें आतां न सांगतांहि समजण्यासारखें आहे. सनातनी ब्राह्मण बहुसंख्य मंडळींचीं मतें आतां त्यांना नक्की मिळणारीं होतीं. धर्मबुडव्या डॉ. मोहित्यांना आतां लवकरच होणाऱ्या निवडणुकींत चारीमुंड्या चीत पाडण्याचा त्यांचा डाव, हा वडाचा हुकमी अेक्का त्यांच्या हातांत आल्यामुळें जिंकल्यासारखाच होता. वकिलींत नी निवडणुकींत पक्षकार नी मतदार मिळवून देणारा जो सोप्यांतील सोपा उपाय– तो सनातन धर्म, ही त्यांची व्याख्या होती.

००० ००० ०००

नगर संस्थेच्या सभेंत, वड पाडून, तो कोलमंडावयास आलेला पाराचा ढिगारा काढून, सडक सरळ करावी म्हणून ठराव



“ ह्या हिंदु लोकांत काय धर्मभोळेपणा आहे बघा ! ”

येण्याच्या दिवशींच वड पाडूं नये ह्या अर्थाचा शेंकडों नागरिकांच्या सह्यांचा तो अर्जंहि दाखल झाला! वडराखे नी वडपाडे ह्या दोन पक्षांतील चुरस अगदीं विकोपास गेली. सडकेवरून जाणाऱ्या नागरिकांच्या जिवावर, त्या कोलमंडलेल्या अुंच ढिगाऱ्याचें, त्या पोकळ पतनोन्मुख फांद्यांचें नी त्या सोटाचेंहि संकट तरवारीसारखें लटकतें आहे हें बहुतेक सभासदांना मान्य होतें. पण विरोध चिघळलेला! शेवटीं अध्यक्षांनीं समोपचारानें त्या बाजूच्या वस्तीची समज पाडण्याचा यत्न करण्यासाठीं तिकडच्या पंचवीस पुढाऱ्यांची सभा भरवून तडजोड करवावी असा सभासदांस अभिप्राय दिला. स्वतः अध्यक्षसुद्धां समज पाडण्यासाठीं नेमलेल्या मंडळांत होतेच. ही तडजोड घडेतों त्या सडकेच्या फाट्यास 'वाट बंद' म्हणून दोन्ही तोंडावर पाट्या लावाव्या आणि गाड्या प्रभृति वाहनांना तरी बंदी असावी, अशी तात्पुरती व्यवस्था झाली! माणसांना वाट बंद केली– पण तो सुकट वड नी पडाअू पार पाडला नाहीं! झाडाच्या सोयीसाठीं माणसांची गैरसोय!! झाड देव, मनुष्य झाडपाला!

००० ००० ०००

समजूत पाडण्यासाठीं बोलावलेली सभा भरली. त्या वस्तीचे पंचवीसतीस पुढारी आणि अध्यक्षांसुद्धां बरेच नगरसंस्थासभासद अुपस्थित होते. वडराखेपक्षाचे शेंकडों लोक सभागृहाबाहेर लोकमताचा दाब पाडण्यासाठीं भिगार्डे वकिलांनीं जमवून ठेविलेले होते. स्वतः भिगार्डे, हरभटशास्त्री प्रभृति मडळी पुढारी म्हणून सभेंत होती. नगर-संस्था-सभासद म्हणून मिस ल्यूसी नी पीरजादे हेहि आले होते.

वड कां पाडूं नये याचीं कारणें सांगण्यास प्रथम हरभटशास्त्री अुठले. 'वड ही देवता आहे. त्यास पुजावें, प्रदक्षिणावें, आणि कधींहि तोडूं नये असें शास्त्र आहे. जे हिंदु लोक वडाला तोडतील ते 'पतन्ति नरके घोरे' असा शास्त्राचा स्पष्ट दंडक आहे! माझ्या

आजोबांना अेक भूमि दान मिळाली. घर लहानसें तीवर बांधलें; पण वडाचें झाड मधें असें होतें कीं, त्याला टाळून घर सलग बांधणें कठीण. अशा अडचणींतहि तें झाड न तोडतां, घर तिरपें-शिरपें बांधलें; पण वड तोडला नाहीं. अुलट त्याच्याभोंवतीं लहानसा चौक सोडून, कौलारांतून त्याला धुराड्यासारखा मार्ग वर मोकळा सोडला. त्याचीं पानें, कचरा सारा कौलारावर घरच्या आंतबाहेरहि पडे. त्याला लागून असणाऱ्या भिंतीखालीं, त्याचीं मुळें घुसून अेक भिंत ढांसळली ती पुन्हा बांधली, पण त्या धर्मपरायण ब्राह्मणानें वड पाडला नाहीं. आजहि त्याच घरांत आम्ही राहतों, आणि वडाची पूजा, नैवेद्य झाल्यावांचून जेवत नाहीं. आम्हां हिंदूंची धर्मभावना अशी ! आणि तुम्ही वड तोडूं म्हणतां ! हिंदुधर्म अुच्छेदतां ! आम्हीं हें घडूं देणार नाहीं !'

' वड तोडणें म्हणजे हिंदुधर्म अुच्छेदणें, आणि वड पुजणें म्हणजे हिंदु असणें, अशी हिंदु धर्माची अुथळ नी भिकार व्याख्या कोणत्याहि ग्रंथांत मला आढळत नाहीं. ' डॉ. मोहिते शांतपणें बोलूं लागले, तोंच भिगार्डे वकील मध्येंच अुठून चवताळले,

' तशी व्याख्या तुम्हाला आढळत नसली तरी मला आढळते. अहो, वडाची पूजा जी आमच्या धर्मांत सांगितली, :ती कांहीं धर्म-भोळ्या अशा कोण्या वेडगळानें नव्हे. अगदीं तुम्ही ज्या विज्ञानाच्या ( Sciences च्या ) नांवाची शपथ घेतां जातां घेतां, त्या विज्ञाना-च्या आधारें वडाची थोरवी किती आहे तें बघा ! त्याच्या पारंब्या औषधी, त्याची छाया, त्याचीं पानें, त्याचें दूध, त्याचा अणू नी अणू अेकाद्या हुतात्म्यासारखा, मनुष्याच्या हिताला वाहिलेला आहे. तो पडला तरी, मरणानंतरहि त्या वडाचा देह म्हणजे त्यांचीं लांकडें, फांद्या, पाचोळा आपल्या झोंपड्यांच्या वाशांस आणि चुलीच्या जळ-णास अुपयोगी असतो. अर्थात् हुतात्म्याहूनहि परोपकारांत वड श्रेष्ठ आहे. कारण मेल्यानंतर हुतात्म्यांच्या हाडांचे वासे आमच्या

२।०।१८
४ ५९८
१९९१८५



झोंपड्यांस अुपयोगी पडत नाहींत, त्यांचा कोणचाहि भाग चुलीचें सर्पण म्हणून जाळतां येत नाहीं. अहो मूर्खहो, यास्तवच आमच्या त्रिकालदर्शी ऋषिवर्यांनीं वडास देव मानलें, वड अीश्वराचें प्रतीक आहे! अीश्वराची विभूति आहे!! वडच अीश्वर आहे!!! जो वडा-पिंपळाला तोडील तो हाडाचा हिंदूच नव्हे! तो मुसलमानच होय!'

भिगार्डे वकील भर रंगांत येअून, आणखी बोलणार होते, पण मूळ वक्ते डॉ. मोहिते असतां आंपण मध्येंच बोलत आहां, असें अध्यक्षांनीं घंटी वाजवून वाजवून दरडावल्यामुळें ते थोडे थवकले; तों दुसरेंच प्रकरण मध्यें आलें!– कारण हिंदुहिंदूंच्या रूढीविषयक वादांत शक्यतों बोलूं नये, अशा शिष्टाचाराचा अवलंब मिस ल्यूसी आणि पीरजादे यांनीं करावा असें साधारणपणें ठरलें होतें. पण भिगार्डे वकिलांचे शेवटचे शद्व अैकून पीरजादे यांस हंसूंच आंवरेना! ते खदखदा हंसूं लागले. भिगार्डे वकील त्यामुळें चिडून विचारतात– 'त्या तिथल्या माननीय सभासदास येवढें हंसावयास झालें आहे? अिथें कांहीं तमाशा नाहीं!'

भिगार्डे यांचें हें आव्हान अैकून पीरजादेहि खवळले, 'सांगणार नव्हतों वकीलसाव! पण आतां स्वतःच विचारतां म्हणून सांगतों. वडपिंपळ तोडतो तो हाडाचा हिंदु नव्हे, तो मुसलमान असें आपण आतां ठामपणें गर्जलांत ना? म्हणून शंका आली—आपण स्वतः हिंदु कीं मुसलमान? कारण लोकहो, चार वर्षांपूर्वी या भिगार्डे वकील साहेबांनीं माझी अेक जमीन विकत घेतली. तींत चारपांच वड-पिंपळ होते ते या वकीलसाहेबांनीं स्वतः अुखडून पाडून अेक टुमदार बंगला बांधला! माफ कीजिये वकीलसाव, लेकीन यह बात सच या झूट?'

साऱ्या सभेंत अेकदम हंशा पिकला. भिगार्डेंहि हंसले, पण वकीलच तो! कांहींतरी उत्तर येणारच त्याच्या तोंडून! सपकन् बोलून गेले, 'अहो, तेव्हां मीहि अेक सुधारकच होतों!'

‘ मग आतांहि व्हा कीं दोन दिवस तसेच सुधारकर्तेहि तोडून टाका कीं तो वड ! ’ पीरजादे लोकप्रियतेच्या ओघांत सांपडून वहा-वत चालले, ‘ त्या सडकेवर दोनचार माणसें दर्गावरील त्या वडा-पायीं ! काय धर्मवेडेंपण बघा हें तुमच्या हिंदु लोकांचें ! आम्ही अेक सोडून असे अेकशें वड तोडून टाकूं पण सडक आडवणार नाहीं. आम्हां मुसलमानांत सारे ‘रॅशनल !’ धर्मवेडेपणा नाहींच ! झाडाची पूजा ! असें म्हणून पीरजादे पुन्हां अेकदा खो खो हंसले ! पण या वेळीं ते अेकटेच हंसत होते. लगोलग डॉक्टर मोहिते पुन्हा अुभे राहिले नी म्हणाले,

‘ खांसाहेब, झाडांची पूजा मुसलमानांत नसते हाडांची असते ! वड पाडूं नये, त्यानें आमच्या धर्मभावना दुखावतात असें हिंदु नुसत्या कोटिक्रमानेंच भांडत आहेत; पण पलिकडल्या वर्षींच जेव्हां हिंदूंच्या भर वस्तींतील एका घराच्या आंतल्या चौकांत कांहीं कबरीसारखें बांधकाम असल्याचें कांहीं मुसलमान पिंजाऱ्यांनीं त्या घरीं कामकाजास जातांना पाहून ती पिराची जागा आहे म्हणून धिंगाणा घातला नी तें घर पाडून तिथें दर्गा स्थापून, निमाज पढून त्यास अडथळा होअूं नये यासाठीं त्या साऱ्या हिंदु वस्तींतील वाद्यें बंद करावींत येथपर्यंत हट्टवादाचा टप्पा गाठला तेव्हां आपण स्वतः त्या मुसलमानांच्या म्हणण्याच्या समर्थनासाठीं लाठीक्रमानें देखील भांडावयास सिद्ध झाले होतेत ! तीं पिराचीं चार हाडें सन्मान-पूर्वक तेथून काढून दुसरीकडे पुरलीं असतीं तर ? अशा हाडांपायीं कितीक राजमार्ग हिंदुस्थानांत बंद पाडण्यांत येतात ! मशिदीवरून राजमार्गानें सुद्धां वाद्यें वाजअूं नयेत म्हणून प्रतिवर्षी मुसलमानांच्या दंग्यांत किती डोकीं फुटतात ? खानसाहेब, धर्मवेडे-पणा हा सर्व धर्मानुयायांत आज तरी ह्या वा त्या स्वरूपानें भरलेला आहे. मनुष्यहिताच्या आड येणाऱ्या अशा भावड्या धर्मभावना कोणच्याहि समाजांत असल्या तरी जो सुधारूं इच्छितो तोच खरा

बुद्धिवादी; खरा धर्मभीरू. कारण धर्म म्हणजे मनुष्यसमाजाच्या उद्धाराचा, धारणाचा मार्ग. भिगार्डे वकील माझ्याविरुद्ध म्हणून जे बोलावयास गेले तेच माझ्या विधेयाचे समर्थक झाले ! ते म्हणाले वडपूजा नी देवप्रतीक मानण्यांत आमचे पूर्वज चुकले नाहींत; कारण वडपिंपळ हीं झाडें मनुष्यास अतिशय उपयोगी आहेत. मग मी तरी अगदीं तेंच म्हणतों आहें ! पण त्यांतूनच निघणारा उपसिद्धांतहि भिगार्डे यांस कसा नाकारतां येईल बरें ? सिद्धान्त हा कीं

**गायींबैलासारखे पशु काय किंवा वडपिंपळासारखीं झाडें काय, तीं मनुष्यास अत्यंत उपयुक्त असतात, म्हणून त्यांच्याविषयीं आम्हांस प्रेम वाटावें, त्या प्रमाणांत किंचित पूज्यताहि वाटो. त्यांचें संरक्षण, पालन नी कौतुकहि करणें आमचें कर्तव्य, ह्या अर्थीच काय तो, तो आमचा धर्म ! पण त्याचाच उपसिद्धांतहि हाच नव्हे काय कीं, ज्या परिस्थितींत ते पशु वा तीं झाडें मनुष्यास उपद्रव देण्यास कारण होतात, तेव्हां तीं पालनीय वा रक्षणीय रहात नाहींत आणि जेव्हां त्यांच्या नाशानेंच मनुष्य जातीचें वा राष्ट्राचें हित साधणारें असतें, तेव्हा त्यांचा नाश हाच मनुष्यधर्म वा राष्ट्रधर्म होणार !**

या पायीं मनुष्यें मेलीं तरी वड न पडला पाहिजे असें म्हणणें म्हणजे निर्भेळ मूर्खपणा आहे. भिगार्डे वकील यांनीं त्या कृत्यास शहाणपणा ठरविण्यासाठीं केलेल्या बुद्धिवादानें हेंच सिद्ध केलें. धार्मिक अज्ञानाचें समर्थन विज्ञानानें अद्यावत् सायन्सनें करूं पाहणाऱ्या या सर्व अर्धवट लोकांचे कोटिक्रम हे नेहमीं असेच त्यांच्या गळ्यांत येतात ! यापेक्षां युक्तिवादाचा कोणताहि ढोंगी मुखवटा न घालतां या आमच्या शास्त्रीबोवासारखे जो चक्क सांगतो कीं, 'वड हा देव आहे– त्यास तोडलें तर तो आम्हांस शापतो असें शास्त्र आहे; त्यास आम्ही मानतों' तो धर्मभोळा असला तरी लुच्चा तरी

नसतो. त्यास अितकेंच विचारणें पुरें आहे कीं, ‘ वडपिंपळ हे पदार्थ वस्तुतःच जर देव, तर ते स्वतःच कुऱ्हाडीनें तोडले, आगींत जाळले, वादळांत मोडले कसे जातात ! आणि त्यांना पुजलें नाहीं वा तोडले तर, जर वडोबा किंवा मुंजोबा रागावतो तर हे मुसलमान, ख्रिस्ति किंवा आमच्यासारखे सुधारक हिंदु त्यांना वाटेल त्या दुसऱ्या झाडासारखे माणसाच्या सोयीसाठीं तोडीत वा जाळीत असतां ते आमचें कांहींअेक वांकडें कसें करीत नाहींत ?’

‘ अहो डॉक्टर, तुम्ही वाऱ्याशीं भांडतां आहां ! वडपिंपळच देव असें मी तरी कुठें म्हणालों ? हे सारे भावनेचे खेळ. शास्त्र चक्क सांगतें ‘ न काष्ठे नच पाषाणे न शिलायाम् न च मृण्मयें। भावेहि विद्यते देवो तस्मात् भावोहि कारणम् ॥’ आम्ही वडाच्या ठायीं वडोबाची भावना ठेवून पूजतों म्हणून आम्ही तोडलें कीं आम्हांस पाप लागतें, पाप नाश करतें, पण ख्रिश्चन, मुसलमान वडपिंपळांना मुळीं झाडेंच मानतात, तें त्यांत दैवी भावना ठेवीतच नाहींत, म्हणून त्यांनीं वडपिंपळ तोडले तर त्यांना पाप लागत नाहीं, देव त्यांना दंड देत नाहीं ! वड आमच्या नवसास पावतो हें आमच्या भावनेचें फळ असेंच का म्हणाना !’

‘ वा शास्त्रिबुवा ! वा ! लाखाची गोष्ट बोललांत ही ! अहो, मग उत्तम मार्ग म्हणजे अशी अडाणी भावना मुळांत ठेवूं नये म्हणजे झालें ! राक्षसाला प्रथम जाणून बुजून राजा म्हणा कां आणि नंतर राजा म्हणून त्याला बळी देत बसा कां ? दोरीला जाणूनबुजून साप समजा कां नी नंतर थरकापत तिच्यापासून दूर पळा कां ? आम्हीहि गायबैलांना पशु, वडपिंपळांना झाडें, असेंच मानलें आणि त्यांना पूजिलें नाहीं म्हणजे आम्हांला सुद्धां पाप लागणार नाहीं. हा वड गैरसोयीचा म्हणून कापूं नी सोयीच्या ठिकाणीं दहा वड दुसरे लावूं ! **ह्या वस्तु मनुष्याला उपयोगी म्हणून प्रथम रक्षणीय ठरल्या, दैवी ठरल्या. पण पुढें तें उपयुक्ततेचें**

**मूळ कारण विसरून त्या वस्तूच रक्षणीय, पूजनीय देवता वाटूं लागल्या.** ती मनुष्याच्या अज्ञानयुगांतील चुकी आतां या विद्वानयुगांत सोडून दिली पाहिजे!'

अितक्यांत बाहेरच्या लोकांत मोठा गलगा झाला. डॉ. मोहित्याचें भाषण अैकूं येईनासें झालें. लोक दारांत घुसूं लागलें, 'भिगार्डे वकील!' म्हणून हांकावर हांका आल्या! भिगार्डे वाटच पहात होते जणूं काय त्या क्षणाची! ते ताडकन् अुठून दाराशीं आले आणि अेक चिठी हातांत घेऊन घांपा टाकीत म्हणाले, 'सभा बंद करा! लोकक्षोभ अनावर होत आहे; कारण हें पहा! ही चिठी भिमाबाई पाटलिणीकडून आली असून त्यांत त्यांनीं असें लिहिलें आहे कीं, 'जर वड पाडाल तर मी त्या जागीं मरें तो अुपास करीन!' लोक ओरडत होते, 'सभा बंद करा! आम्हीं वड पाडूं देणार नाहीं!' अध्यक्षहि 'तडजोड अशक्य, सभा बंद!' असें सांगून अुठून गेले. 'सनातन धर्म कीं जय' करीत लोकहि हळुहळू परतले. जो तो भिमाबाअीच्या श्रद्धेची नी देवलसीपणाची वाहवा करीत होता!

००० ००० ०००

सभा अशी अुधळली तेव्हां संध्याकाळ होअून पाअूस पडूं लागला होता. तरी देखील भिगार्डे वकील अेकटेच भीमाबाईच्या घरीं गेले. 'का? कशी बिनतोड युक्ति मीं सुचविली? माझ्या सांगण्याप्रमाणें तुम्ही ती चिठ्ठी लिहवून अगदीं वेळेवर धाडलीत हो भीमाबाअी! सोळा आणे काम झालें! वड कोण पाडतो तें बघतों आतां!'

हें भिगाडर्यांचें अवसान पाहून भीमाबाअी संतोषल्या. पाअूस वाढत चालला. वकील घरीं गेले. वडाच्या पायाची धूळ अंगारा म्हणून मुलाला लावून 'माझ्या बाळास वडोबा शतायुषी करो!' असें म्हणून तिनें त्याला झोंपीं घातलें. दिवसभर थकलेली ती बाअीहि तशीच झोंपीं गेली! वारा नी पाअूस वाढतच गेला!

रात्रीचे बारा वाजले असतील. त्या सडकेनें अेका लांब प्रवासाहून आलेली तट्टूयाची बैलगाडी अकस्मात शिळंधार लागलेल्या त्या पावसांत नी सोसाटयाच्या वाऱ्यांत सांपडून रेंगाळत, चांचपडत चालली होती. तोंच कडाड् कडाड् असे दोनचार आवाजावर आवाज झाले. ती सडकेवर आलेली त्या वडाची लांब फांदी तुटून भिरकावलेल्या गदेसारखी त्या गाडीच्या तट्टूयास लागली; अेखाद्या साहेबाची टोपी वरच्यावर अुडवावी तसा तो तट्टूया अुडवून गाडीवर कोसळली; गाडीवान ठिकच्या ठिकाणीं फटकाऱ्यासरशीं ठार होअून खालीं पडला; तोंच त्या वडाचा तो मुळाशीं खिळखिळा झालेला अुंच सोट अुलट बाजूस कोलमडून पायथ्याच्या झोंपडयांवर पडला !

'अग आअी ग !' अशी किंकाळी त्या छप्परभिंतीसुद्धां कोसळलेल्या झोंपडींतून आली ! ती किंकाळी भीमाबाअीचीच होती ! कोसळलेल्या झाडलाकडाखालीं तिचें डोकें फुटलें होतें, आणि त्या वडाच्या सोटाखालीं– हायहाय ! तिचें तें लेंकरूं चेंदामेंदा होअून गेलें होतें !

✠ ✠ ✠

# एक नवा अध्याय

## गोष्टीचा मूळ सांगाडा

अगदीं सत्य, घडलेली गोष्ट पण सांगतांना नांवेंगांवें गाळून जरा जुळवून सांगितली गेली म्हणूनच काय ती तिला कथा म्हणावयाचें, असा जर सत्यकथा या शब्दाचा अर्थ केला तर आम्ही सांगत आहों ही अेक शंभर टक्के सत्यकथा आहे. कारण ही गोष्ट अशी अगदीं खरोखरीच घडली आणि तीहि अवघ्या चारपांच वर्षांपूर्वी !

ज्या विठोबाचें देवळांत ती घडली तें अेक त्या नगरांतील लहानसें, अेका विरळ वस्तींत बांधलेलें, भंडारी-मराठा अित्यादि वर्गांतील कामकरी मंडळी कधींकधीं ज्यांत जात येत, असें बापडेंसें देऊळ आहे. अेक भाविक आणि निर्धन वर्गांतील मध्यम वयाचा मनुष्य मात्र नेमानें त्या देवळांत जाअून विठ्ठलाची पूजा करी. दिवसभर काम धंदा केल्यानंतर रात्रीं

अेकटा दुकटा कसाहि असला तरी टाळ घेअून 'वेडेंवांकुडें' हें विशेषण ज्यास लागूं पडेल असें भजन नित्य नेमानें करी आणि गातां गातां गुंगी आली कीं तिथेंच अेकटादुकटा निजे.

त्याच्या भाअूबंदांतील कोण्या बाईनें त्याच्या घरादारांत भाग मिळावा म्हणून भांडण काढलें होतें. तिला कोणीं सांगितलें, ह्या भाबड्या माणसाचा कांटा जर वाटेंतून निघेल तर! – तो भयंकर विचार तिला पटला. गुंड लोकांच्या संगतींत ती फसलेली होती; त्यांनीं कांहीं ठराविक रक्कम घेऊन तिचें तें काम पारहि पाडून टाकण्याचें अंगावर घेतलें! –

त्या चांडाळचोकडीवांचून तो मनुष्य अेक भाबडा आणि निरुपद्रवी प्राणी म्हणूनच तेथील लोकांना परिचित असे. त्याचा देवलसीपणा पाहून त्याला कोणी कोणी बुवाहि म्हणत. त्याच्याशीं नेहमीं भांडण करणाऱ्या त्या बाअीच्या वळणांतील त्या गुंड लोकांनीं त्याला हाणमार करण्याच्या धमक्याहि दिल्या आहेत हें अैकून अेकदोघांनीं बुवास सांगितलेंहि होतें, कीं 'रात्रीं बेरात्रीं जपून रहात जा! तीं वाअीट माणसें आहेत!' पण गजेंद्रमोक्षाच्या, दामाजीच्या, द्रौपदीच्या, चोखोबाच्या, कबीराच्या ज्या अनेक कथांचीं त्यानें पारायणें केलीं होतीं त्यांतील कोणाची तरी कथा सांगून त्यानें म्हणावें, 'अेकटा असलों, दुकटा असलों तरी माझा पाठीराखा पांडुरंग माझी पाठ राखीलच राखील!' असें म्हणत विठ्ठलाच्या मूर्तीकडे त्या मिणमिण्या समयीच्या अंधुक अुजेडांत पाहून त्यानें अभंग आळवावा 'जेथें जाअी तेथें तूं माझा सांगाती। संभाळिसी हातीं धरूनिया ॥'

००० ००० ०००

खून! खून!! अरे बापरे! भयंकर खून!!!

पहांटेच्या वेळीं कुणी मनुष्य त्या विठोबाच्या देवळांतून जात असतां अकस्मात मोठमोठ्यानें बोंब ठोकीत ओरडला.

आजूबाजूच्या घरांझोंपड्यांचीं कवाडें, खिडक्या खाडखाड अुघडून कोणी अुघडे, कोणी बोडके असे कांहीं लोक अंथरुणावरून अुठले तसेच तिकडे धांवत आले.

त्या बुवाला कोणीतरी भयंकर हत्यारांनीं घायाळ करून शेजारच्या शेतांत फेंकलें होतें. रक्ताच्या डबक्यांत तो मरणाचा घोर लागून पडलेला त्या बोंब मारणाऱ्या वाटसरूस दिसला होता. भोंवतीं जमलेल्या मराठा-भांडारी वर्गाच्या बायामाणसांसुद्धां सगळे हळहळत होते.

बुवाला कण्ह लागला होता. मधून मरणाच्या धक्क्यासरशीं अुचक्या येत; पण तो मेला नव्हता. लोकांतून अेकास अेक ह्मणूं लागले, 'अैकलेंत ? बुवाच्या तोंडीं विठाल ! विठाल !' 'अुचकी-सरशी येतो खराच तो ध्वनि.' 'देवाचें नांव सुटलें नाहीं त्याचें !' 'धांवा करतो आहे देवाचा !' 'देवाला ह्या घाव्यासरशीं ही बातमी पोंचली तर विठोबा अजूनहि येऊन त्याला हात देतील.' बुवा ह्मणतच असे 'जेथें जाअी तेथें तूं माझा सांगाती । चालविशी हातीं धरूनियां.'

पोलीस घाअीघाअीनें पहिलें लिखाण थोडेंबहुत करून बुवाला रुग्णालयांत धाडून देअूं लागले. कांहीं लोक परत जात होते– कांहीं येत होते. कांहीं आपसांत म्हणत होते, 'बुवानें विठ्ठलाचा नामघोष चालविला आहे !' 'बुवा मरणार नाहीं !' 'अहो, मरायचा असता तर अितक्या घावांतून वांचलाच नसता !' 'अहो, तो देवळांत असता तर घायाळच झाला नसता !' विठोबा जागृत दैवत, पण देवाच्या पाठीमागें या शेतांत मारेकऱ्यांनीं घात केला त्याला काय अुपाय !' 'देव द्वारकेंत होते म्हणून द्रौपदीमातेस दु:शासन गांजूं शकला; पण तिचा धांवा कानांवर पडतांच देव धांवले तेव्हां तिचें तो काडीभरहि वांकडें करूं शकेना !' पोलीसहि म्हणतच होते, कीं

'त्या मारेकऱ्यांची आम्हांस वित्तंबातमी मिळाली आहे. शेवटीं त्यांचाच नाश होणार !' 'अहो, सत्यमेव जयते ! नानृतम् !!' पूजेला चाललेले भटजीहि विटाळ होअूं नये म्हणून लोकांच्या वाटेच्या बाजूस होते ते, जतां जातां म्हणून गेले.

जमलेल्या थव्यापैकीं तींच वाक्यें घोळीत मुली शाळेंत गेल्या, मुलें शाळेंत गेलीं, बाया घरीं गेल्या, भाजीवाल्या बाजारांत गेल्या, कामकरी कामधंद्यावर गेले. सकाळचे दहा वाजत आले. दोनतीन पोलीस जाग्यावर टेहळीत होते, कांहींजण दुरून पहात जात होते. एकदोघेच देवळांत जाअून विठोबांवर पाणी घालून घाअीघाअीनें पूजेचा नियम कसाबसा पाळून निघून गेले होते.

००० ००० ०००

साडेदहा वाजून गेल्यामुळें त्या नगरांतील अेक प्रमुख वकील असतांहि सार्वजनिक कथाकीर्तनांतून प्रमुखपणें भाग घेणारे स्नानसंध्याशील गृहस्थ पांडुरंगराव हे कोर्टांत जाण्यासाठीं अुठू पहात होते. पण त्यांच्या बैठकींत जमलेले लोक वादाच्या भरांत आल्या-मुळें तेथून कांहीं हालेनात. जो तो बुवाच्या झालेल्या हत्येची कांहींतरी नवीन अद्‌भुत माहिती घेऊन तिथें येअी. पांडुरंगराव स्वतः संतलीलामृतादि ग्रंथांचे मोठे चहाते असल्यामुळें बुवाच्याविषयीं घडत चाललेल्या चमत्कारिक घटनांचा त्यांसहि विस्मय वाटूं लागला होता. अितक्यांत मोरे नांवाचे तेथील खोतच आंत आलेले पाहून पांडुरंगराव म्हणाले, 'तुम्ही आतां अगदीं चूप बसा. सुसंगत बातमी आणण्यासाठीं गेलेले खोतच आतां काय सांगतील तें खरें ! काय मोरे, बुवा रुग्णालयांत शुद्धीवर आला हें खरें काय ?'

'खरें म्हणजे काय विचारतां, पांडुरंगराव ! अहो, त्यानें जो 'विठ्ठल विठ्ठल' म्हणून अुचकी-अुचकीसरशीं नामघोष चालविला होता ना त्या धांव्यानें द्रवून तिकडे प्रत्यक्ष विठोबाच्या डोळ्यांतून

अश्रूंच्या धारा लागल्या आहेत, मूर्तीच्या अंगास घाम सुटला आहे– आणि अिकडे बुवा साफ अुठून बसून भजन करीत आहे. औषध न लावतां रक्तप्रवाह् बंद झाला !'

आश्चर्य ! काय ? विठोबा रडूं लागतो ? अगदीं प्रत्यक्ष पाहतात लोक ? अशा अुद्गारांची, प्रश्नांची आश्चर्याची अेकच सर झडली. मोरे ह्या झडींतील शेवटच्या बिंदूस झेलून म्हणाले, 'कोणी प्रत्यक्ष पाहिलें काय विचारतां ! शेंकडों लोक जाअून येताहेत विठोबाच्या देवळांत. सान्या बाजारांत जो तो म्हणत आहे– विठोबा रडत आहेत ! आणि बुवा अुठून बसला आहे ! भक्ताच्या दुःखानें देव कळवळले, नेत्रीं अश्रुधारा वहात आहेत ! जणुं काय भक्ताला ते घाव न लागतां देवालाच ते लागले !'

'संत चोखोबाविषयीं अशीच आख्याअिका आहे' गंभीरपणें पांडुरंगराव म्हणाले, 'त्याला मारलेल्या चापट्यांनीं देवाचे गाल सुजले. चोखोबांच्या डोक्यावर काठी पडे नी विठ्ठलाच्या मूर्तीच्या डोक्यावर टेंगूळ अुठे ! ग्रंथांतरींचे चमत्कार आज आम्हांला प्रत्यक्ष पहावयाला मिळतात ! सुधारक मतांनीं या नगरांतील लोकांची ढळूं लागलेली भक्तीवरची श्रद्धा पुनः बसावयासाठींच विठ्ठलानें हें नाटक कशावरून केलें नसेल !'

'मी म्हणतों, डॉ. विचारे हे जे त्या सुधारकांचे आग्रणी त्यांसच हा चमत्कार प्रत्यक्ष दाखवावा ! डॉ. विचाऱ्यांची लोक-मतावर मोठी छाप पडते !'

'मीच म्हणणार होतों तें, मोरे. डॉक्टर विचारे माझे मित्र आहेत. बुद्धिवादी आहेत– पण हट्टवादी नाहींत. आणि प्रत्यक्ष गोष्टीस बुद्धिवादी झाला तरी नाकारणार कसा ! पण आतां त्यांच्याकडे जावें तर कोर्टास अुशीर होतो. संध्याकाळीं मी डॉ. विचारे यांस घेअून विठोबाच्या देवळांत स्वतःच येतों.'

पांडुरंगरावांच्या ह्या अडचणीची टर अुडवून मोरे म्हणाले, 'कोर्ट ! तुम्हां वकिलांना वैकुंठास न्यावयाला विमान आलें तरी तुम्ही कोर्टाला अुशीर होतो म्हणून तें परत धाडाल ! अहो, ज्ञानेश्वर-तुकारामाच्या कालापासून न घडलेली अशी देवाची करणी आज अिथें घडत असतां, भक्ताच्या दुःखानें विठोबा रडत आहे तोंच, तो सोहळा लगेच प्रत्यक्ष न पाहतां म्हणे कोर्टाला अुशीर होअील म्हणून संध्याकाळीं जाअूं ! संध्याकाळपर्यंत मूर्तीचें रडें बंद झालें तर ? तें कांहीं नाहीं, वकीलमहाशय, आतां चलायचें डॉ. विचाऱ्यांकडे, नी त्यांना घेअून विठोबाच्या देवळाकडे !'

सर्वांनीं 'हो हो चलाच !' म्हणून मोठा गिल्ला केला. तेंच ठरलें. खोत मोरे नी पांडुरंगराव वकील डॉ. विचाऱ्यांकडे निघाले. कांहीं मंडळीहि बरोबर चालली.

मार्गानें सकाळच्या शाळेंतून सुटलेलीं, दुपारच्या शाळेस जाणारीं मुलें—मुली, बाजारांतील थवे, येतीजाती मंडळी, जो तो दुसऱ्यास विचारीत तरी होता वा सांगत तरी होता—तीच अद्‌भुत गोष्ट, विठोबा रडतो आहे !

पांडुरंगरावांस वाटूं लागलें आपण ज्ञानोबा-तुकारामांच्याच देवलसी काळांत क्षणभर वावरत आहोंत ! रेडा वेद बोलतो आहे ! पंढरीनाथाचें देअूळ फिरलें आहे ! देव जनीबरोबर दळत आहेत ! रोहिदासाबरोबर जोडे शिवत आहेत ! अशीं अद्‌भुत वृत्तें त्या काळीं लोक अेकमेकांस असेंच अुत्तेजित होअून सांगत असतील ! त्या विचारांत तन्मय होतां होतां त्यांस वाटलें, 'अहाहा ! जर आज अेखादे महिपति आसते ! या बुवाच्या या भक्तिविजयाचे आणि देवाच्या या रडण्याचे त्यांनीं किती रसांत वर्णन केलें असतें !' त्यांचें चित्त त्या विचारांत अितकें तल्लीन झालें, कीं चालतां चालतां, महिपति आज असते तर त्यांनीं जो रसाळ अध्याय लिहिला असता त्यांतील कांहीं संभवनीय ओंव्या जुळत चाललेल्या देखील त्यांस दिसूं

लागल्या ! मनांतल्या मनांत ते त्या वाचूं लागले–'ॐनमोजी पंढरी-राया । अतर्क्य ममता अतर्क्य माया । भक्त दुःखें देवराया । रत्नपुरीं रडलासी ॥ १ ॥ धन्य धन्य तो बुवा संत । ज्याचेनि कारणें भगवंत । कटी ठेवूनिया हस्त । रडत रहावा ॥ २ ॥ संता गांठोनी मारेकरी । घाव घाली घावावरी । देव त्या दुःखें रावुळीं । रडूं लागले ॥ ३ ॥ भक्तिविजयांतील या नव्या अध्यायाची अशी कांहीं रूपरेषा जुळते न जुळते तोंच डॉ. विचाऱ्यांचें घर आलें.

०२० ००० ०००

'या पांडुरंगराव ! माझ्या अिथें आधींच ही पहा मंडळींची झालेली दाटी ! जो तो म्हणतो विठोबा रडत आहेत ! मोठा चमत्कार घडतो आहे !' डॉ. विचारे हंसत म्हणाले,

'मग तुम्ही अेकदां चक्क सांगून तरी टाका, कीं तुमचा चमत्कारावर विश्वास नाहीं– मग शेंकडों लोक प्रत्यक्ष ती गोष्ट पहात असले तरी ते सगळे आंधळे !' पांडुरंगराव जरा त्रासिक स्वरानें खोंचून म्हणाले.

'अहो, चमत्कार जर घडला असेल तर तो चमत्कार असला तरी मी त्यावर विश्वास ठेवणारच ठेवणार. कारण जें कधीं पाहिलें नाहीं तें घडतें किंवा जें घडतें त्याचा अुलगडा आपल्या ज्ञात कार्य-कारण संबंधानें लावतां आला म्हणजे त्यास आपण चमत्कार म्हणतों अितकेंच त्याचें चमत्कारिकत्व. मनुष्यास सृष्टीचे सर्व नियम अजून कळले असें आम्ही समजत नाहीं. अुलट आम्ही म्हणतों, सृष्टीच्या विश्वरूपाच्या नखाचेंहि पुरतें दर्शन अजून आम्हां मनु-ष्यांस झालें नाहीं. पूर्ण रूप दिसणें तर असंभवनीय ! तेव्हां चम-त्कारास वाव हा नेहमींच असणार. प्रश्न, घडलें तें चमत्कारिक कीं साधें हा नाहीं; प्रश्न आहे तो हा, कीं घडलें म्हणून जे म्हणतात तें तसेंच घडलें आहे कीं काय ? बरें, तो बुवा जिवंत झाला, रक्त-स्राव आपण होअून बंद झाला, ती बातमी तरी अगदीं पक्की कां ?'

'अगदीं पक्की ! बुवा खडखडीत वरा होअून बसला आहे. स्वतः सिव्हिल सर्जन डॉक्टरांनीं तोंडांत बोट घातलें, आश्चर्यानें शेकडों लोक पाहून आले !' मोरे अुत्तेजित स्वरें म्हणाले. बुवा विठोबास नेहमीं आळवीत 'जेथें जाअी तेथें तूं माझा सांगाती, वागविशी हातीं धरोनिया ॥' तें अुगीच नाहीं !'

'थांबा, हे आलेच मी बोलावल्याप्रमाणें स्वतः सिव्हिल सर्जन महाशय ! ! या, या ! प्रथम हें सांगा कीं, ते बुवा कसे आहेत ?'

डॉ. विचाऱ्यांच्या या प्रश्नानें जरा आचंबा वाटल्यासारखें पहात सिव्हिल सर्जन म्हणाले, 'कोणता बुवा ? तें सकाळीं खुनाचें प्रकरण माजलें तो बुवा कीं काय ? कां त्याची अेवढी चौकशी ? आम्हीं रुग्णालयांत त्याला आणला तोच मुळीं जवळजवळ मेल्यासारखा, दहा पांच मिनिटांत तो लगेंच मेला !'

पांडुरंगराव दचकून खुर्चीवरून अर्धे अुठले नी ओरडले, 'म्हणजे ! तो खडखडीत बरा झाला, त्याचा रक्तस्राव आपोआप बंद झाला, तुम्ही डॉक्टरांनीं देखील आश्चर्यानें तोंडांत बोट घातलें—हें सगळें—'

'साफ खोटें ! बुवा मेला तेव्हां मी कांहीं तोंडांत बोट घातलें नव्हतें. ही तुमची भोळसट कथा अैकून मात्र आश्चर्यानें तोंडांत बोट घालावेसें वाटतें खरें ! कोणीं सांगितलें हें तुम्हाला ?'

'ह्या खोतांनीं ! शेंकडों लोक तें स्वतः पाहून आले म्हणून हे ह्मणाले, काय खोत ?'

'हो, तुम्हाला मीं सांगितलें खरें; पण मला स्वतः भिकंभटांनीं सांगितलें शेंकडों लोक पाहून आले !'

डॉ. विचारे हंसणार होते; पण प्रकरण चिरडीस जाअू नये ह्मणून गंभीरपणें सिव्हिलसर्जनांना विचारूं लागले, ' बरें, पण मरणाआधीं शेतांत घायाळ होअून पडलेला असतां शेंकडों लोकांसमक्ष विठ्ठल, विठ्ठल ह्मणून त्यानें नामघोष चालविला हें तरी खरें ना ?'

सिव्हिल सर्जन पुन्हा अेकदां मानेला तिरस्काराचा झटका देअून अुसळले, ' छट् ! साफ खोटें ! अहो, त्याच्या खुनाची बोंब होअून दहापांच लोक जमतात तोंच मी सरकारी नात्यानें तिथें पोंचलों. शेंकडों लोक कुठले नी नामघोष कुठला ! बेशुद्ध, मृतप्राय दहापांच, अुचक्या आल्या असतील नसतील ! श्वासोच्छ्वासाला ' कोहं ? सोहं !' असें जपणारी ' अजपा गायत्री ' असें नांव वेदांती जसें देतात तसें मरणाच्या अुचकीस ' विठ्ठल ' असें नांव द्यायचें असलें तर माझें कांहीं ह्मणणें नाहीं ! अहो ! मरणाची घरघर, दोनचार अुचक्या, यांपलीकडे ब्रहि त्या बुवाच्या तोंडून निघण्यापूर्वींच तो मरूनहि गेला होता !'

' बरें, तें असो. ' डॉ. विचारे अुपहासाचा लवलेश अवलंब न करतां अेखाद्या न्यायाधीशासारखे कांटेतोल बोलूं लागले, ' आतां विठोबाच्या मूर्तीच्या डोळ्यांतून या भक्ताच्या घातानें दुःखाश्रूंच्या धारा लागल्या आहेत, अंगास दरदरून घाम सुटला आहे अशी जी बातमी गांवभर पसरली आहे ती घटना तरी कोणी प्रत्यक्ष पाहिली आहे का ?'

' शेंकडों लोकांनीं !' मोरे ठांसून म्हणाले. सारा प्रदेश शत्रु हस्तगत करीत आल्यानंतर शूर सेनापति शेवटचा बालेकिल्ला तरी पडूं द्यावयाचा नाहीं अशा बाण्यानें जसें अढळ ठाण मांडतो तसें अढळ ठाण मांडलेलें तें अुत्तर पुन्हा देअून मोरे म्हणाले, ' शेंकडों लोकांनीं तें प्रत्यक्ष पाहिलें !'

'तुम्हीं स्वतः पाहिलेंत का!' 'नाहीं! मी जातोंच आहे तिकडे स्वतः बघावयास!'

'बरें, पांडुरंगराव, तुह्मीं स्वतः पाहिलेंत?'

'नाहीं! पण साने आणि गाडगीळ यांनीं स्वतः पाहिल्याचें अेकतों.' पांडुरंगरावांनीं पुरावा दिला.

'हे अिथेंच आहेत पहा साने आणि गाडगीळ! तुमच्या आधींच ते आले होते. काय साने, तुम्ही मघां सांगितलात तो अनुभव कृपा करून पुन्हा सांगा अेकदां.' डॉ. विचाऱ्यांनीं विनविलें.

'मीं मघां सांगितलेंच, कीं मी ही बातमी अैकून, आश्चर्यानें थक्क होअून, देवळांत गेलों होतों. पण दाटीमुळें मूर्तीजवळ जातां आलें नाहीं; त्यांतहि गाभारा अंधारलेला. मला कांहीं तसा प्रकार आढळला नाहीं; पण गाडगीळ पुढें होते, ते म्हणाले, कीं मूर्तीच्या डोळ्यांतून धारा वहात आहेत, म्हणून तेंच मी म्हणालों." सान्यांचा पुरावा संपला. मंडळी हंसूं लागली; पण डॉ. विचारे हंसत नाहींतसें पाहून दबली. डॉ. विचाऱ्यांनीं गाडगीळांना 'आपला अनुभव?' म्हणून पृच्छा केली.

'मीं अंधारलेल्या गाभाऱ्यांत जर कांहीं पाहिलें असेल तर तें अितकेंच, कीं विठोबाच्या मूर्तीचे डोळे नी गाल ओलसर दिसत होते. आणि कांहीं बाया मंडळी म्हणत होती– 'अयाया, विठोबा रडतो आहे!'

'पण गाडगीळ तुम्हीं स्वतः मला म्हणालांत विठोबाच्या डोळ्यांतून धारा वहात आहेत!' सान्यांनीं हटकलें.

'आणि तेवढेंच खरें आहे!' डॉ. विचारे सर्वांकडे पाहून म्हणाले, 'हे चंद्रचूड अिथें आहेत. हे आणि मी पोलीस चौकशी प्रथम चालूं होती तेव्हांच, म्हणजे देवळांत दहापांच लोक देखील

गेले नव्हते तेव्हांच तिथें गेलों. त्या वेळीं कोणी ह्या मूर्तीच्या डोक्यावर पाणी ओतून घाओीघाओीनें अेकदोन फुलें पायावर टाकून निघून गेले. त्या देवळांत तो बुवाच काय तो नीट पूजा करी. मूर्तीचें अंगबिग नीट पुसण्यास दुसरा कोण आज येणार ? तें तसेंच राहिलें. आम्ही चौकशीचा रागरंग पाहून परततों तों त्या ओतलेल्या पाण्याचे थेंब नी ओलावा तोंडावर पाहून दोघेतिघे 'विठोबाच्या डोळ्यांतून पाणी येतें आहे बघा ! ' म्हणून आश्चर्यचकितपणें म्हणतांना आम्हीं अैकलें ! त्यांस खरें कारणहि आम्हीं सांगितलें; पण त्यांस तें पटलेलें दिसेना. आम्ही परतलों आणि पहातों तों तीन तासांत गांवभर ' विठोबा रडतात !' ही अेकच हुल्लड अुठली आहे !!! दुसरें असें पहा, कीं प्रथम जेव्हां विठोबासमोर बुवावर त्या दुष्टांनीं घाला घातला–'

' चूक ! चूक !' मोरे निराशेच्या अवसानानें मध्येंच अुसळले, ' देवासमोर बुवावर घाला पडला नाहीं. वाटेंत देवाच्या पाठीमागें शेतांत त्याला गांठला. देवाच्या समक्ष काय माय व्याली होती त्या दुष्टांची–'

' छट् छट् ! काय बकतां आहां !' सिव्हिल सर्जन तिरस्काराचा झटका मानेस पुन्हा देत कातावले, अहो, बुवाला रात्रीं नेहमींप्रमाणें देवळांत निजलेला शेजारच्या माणसांनीं पाहिला. मध्यरात्रीं देवळांत छपरावरून, अुतरून बुवाच्या तोंडांत बोळा देअून, दोनचार घाव घालून, फरफटत मारेकऱ्यांनीं बाहेर नेला नी शेतांत फेंकला ! अुपसलेलीं कौलें, तोंडांतला बोळा, देवळाच्या अुंबरठ्यापर्यंत रक्ताचे अुडालेले डाग, शेतापर्यंत रक्ताळ भाग– सारा पुरावा माझ्या समक्ष पाहून पंचनाम्यांत नोंदला आहे !'

सुरेख मांडीत आणलेली गोर खालची घडवंचीच अकस्मात पडून ती सारी शोभा कोसळली असतां तो ढीग पाहून मुलींना जसें

खट्टु वाटतें तसें पांडुरंगरावांचें मन खट्टु झालें. चमत्काराला चमत्कार जुळत जुळत कोण रसाळ कथा—भक्तिविजयांत शोभावा असा किती प्रासादिक तो त्यांच्या मनांत जुळत आलेला देवलसी अध्याय !— कोणीतरी कोट-पाटलूण घातलेला राक्षस महिपतीच्या हातांतून हिसडून लिहितां लिहितां फाडून टाकीत आहे असें त्यांना मनांतल्या मनांत भासून गेलें ! खोत मोरे तर रागारागानें त्या सिव्हिल सर्जनांना राक्षस म्हणून अुघड अुघड ह्मणण्याच्या बेतांत होते; पण अितक्यांत मनधरणीच्या हळुवार शद्बांत डॉ. विचारे म्हणाले,

‘ तुम्ही सर्वजण असें पहा, कीं आपण भावड्या भक्तीनें देवाची थोरवी वाढविण्याच्या पायीं त्याला अुलट आपण माणसासारखा दुबळा करून सोडतों. माणसास देव करील ती खरी भक्ति; देवास माणसासारखा आंधळा, दुबळा, रडवा, खुळा बनवील ती भक्ति कीं भावडेपण ! तो बुवा जे म्हणे, कीं

जेथें जाअी तेथें तूं माझा सांगाती ।
सांभाळिसी हातीं धरोनिया ।।

तें तात्विक आर्थीं न घेतां शद्बशः जर खरें समजावयाचें तर त्यास त्या दुष्टांनीं देवळांत न गांठतां शेतांत गांठलें असें मानलें तरी कोणचा फरक होणार ! देव शेतांतहि त्याचा सांगाती होताच— मग तिथेंहि त्यास कां संभाळला नाहीं ? मारेकरी येणार हें त्यास देवानें आधींच कां कळविलें नाहीं ? खरा देव भक्ताच्या कैवारानें त्या दुष्टांस पकडून हापटण्याकरितां त्यांच्यामागें धांवता कां विटेवर अेखाद्या बाअीबापडीसारखा मुळुमुळू रडत बसता ? जर ती विठोबाची मूर्ति खरोखर रडूं लागती ना तर मला अशा दुबळ्या मूर्तीची अुलट चीड येती ! पण तरीहि तसें घडलें असतें तर मी तें मानलें असतें ! पण त्या बहुतेक, निदान बऱ्याचशा संतविषयक कथा

ह्या अशाच सांगोवांगी बातांवर रचलेल्या सुरस कादंबऱ्या आहेत ! रसाळ पण अतथ्य-अपथ्य ! देव म्हणे रडतो ! भक्तांचा सूड घेत नाहीं, तर रडतो !'

'किंवा संत दामाजीस छळणाऱ्या त्या मुसलमानी सुलतानास दाढी धरून गादीखालीं खेंचायचें सोडून अुलट जोहार करीत दंड भरतो ! ' सिव्हिलसर्जन मध्येंच म्हणाले.

'पण ती कथाहि जितकी सुंदर तितकीच खोटी ठरली आहे, महाशय. ' डॉक्टर विचारे म्हणाले, ' विठू नांवाच्या अेका महारानें तो दंड भरला; जसा आज कोण्या निमित्त्याला टेकलेल्या सत्त्याग्रहयाचा दंड त्याचा आप्तेष्ट निनांवीपणें भरतो नी त्याची सुटका होते. त्या विठू महाराचें घराणें विद्यमान आहे नी त्यांच्यापाशीं ह्या घटनेंचे लेख आहेत ! पण आज ज्या भावड्या प्रवृत्तीनें विठोबास रडविलें, तिनेंच त्या विठूमहारास विठ्ठलाचा अवतार बनविलें ! बरें झालें, आज अेखादा महिपति महाराष्ट्रांत नाहीं, नाहींतर ही आजची रडकथा फुगत फुगत तिकडे पोंचून त्या बिचाऱ्या भाविक ग्रंथकारानें प्रामाणिकपणें तिचा अेक भक्तिविजयांतील प्रासादिक अध्याय बनवून सोडला असता ! असो, झालें तें झालें. पण मी म्हणतों जर तें दैवत जागृत असेल तर जरी मारेकऱ्यांना स्वत: मारण्याचें त्यास साधलें नाहीं तरी निदान त्यानें अितकें करावें, कीं, ते मारेकरी कोण हें आज अुद्यां पोलिसांच्या स्वप्नांत जाअून सांगावें आणि त्यांचे रक्तावलेले कपडे, हत्यारें, कुठें आहेत तीं अचानक पकडवून द्यावीं ! गुप्तपोलिसांपेक्षां तरी देवाला कांहीं अधिक अंतर्ज्ञान असावयास हवें ! अितकें झालें तरी आम्ही त्यास अेक चमत्कार म्हणूं ! '

००० ००० ०००

कांहीं दिवसांनीं पोलिसांनीं दोनचार गुंड पकडले, खटले भरले; पण पुरावा कच्चा पडून सारे आरोपी सुटले. तें खुनाचें प्रकरणच नव्हे तर त्याची आठवणहि सर्वांनीं रद्दींत काढली आहे. झालीच कधीं आठवण तर 'विठोबा रडतो!' ह्या चमत्काराचा विषय म्हणून नव्हे, तर चेष्टेचा म्हणून!

✠ ✠ ✠

# ह्या बहिरोबाला तरी सोडा
## —नाहीतर—
# त्या बहिरोबाला तरी पकडा

"काय, मेला ? अहो, काल संध्याकाळीं माझ्या दुकानांत तो हंसत खेळत होता आणि म्हणतां तरी काय हें ! अितक्या तडकाफडकीं मेला तरी कसा ! " भीतीच्या धक्क्यासरशीं अेकेक शद्ब अुचकीसारखा कंठांतून अुपसून काढीत छबिलदास मारवाडी भोंवतीं जमलेल्या घोळक्यांत प्रमुखपणें अुभ्या असलेल्या रामजी गाइकवाडांना विचारूं लागले. पांडू सोनार मेल्याची बातमी यांनींच धापा टाकीत येअून मंडळींना दिली होती.

" तरी बघा, ह्या पांड्या सोनाराला चार आठवड्यांपासून मी सांगत होतों, कीं "अरे, तुझ्या घरीं अुंदीर लागोपाठ जे मरत आहेत ना, ते प्लेगचेच असले पाहिजेत. " चितोपंत म्हणाले, " टोंचून तरी घे, नाहींतर घर तरी सोड ! असें पांड्याला मीं दहादां

सांगितलें पण तसें सांगण्याचा त्यास अुलट राग यावा! त्यानें अुंदीर मेले हेंच नाकारावें. मांजरानें खाऊन टाकले म्हणून सांगावें. त्याच्या बाजूचे लोकहि त्याच्याच पंथाचे. आपल्या घरांतले अुंदीर पहांटेच अेखाद्या चोरीच्या वस्तूसारखे गुपचूप मार्गावर आणून टाकायचे आणि तेहि दुसऱ्याच्या घरासमोरील गटारापाशीं! सकाळीं अुंदीर वाटेवर पडल्याचा गवगवा झाला तर आपणच म्हणायचें, कीं 'आमच्या आळींतले नाहींत हो ते! ही पलीकडे छबिलदास मारवाड्याची धान्याची वखार आहे ना? वखार कसली --अुंदीर घुशींचें पेंवच तें! तिथें ते मरतात नी तो मारवाडीच अिकडे फेंकून देववितो ते! जाऊं द्या, घार गिधाडें आतां अुचलून नेतील ते. जाऊं द्यात!"

"कोण, कोण लुच्चा म्हणाला तें? माझ्या वखारींत अेक अुंदीर मेला असेल तर शपथ! हारामखोर! काय लुच्चे लोक आहेत हे! हां, हां, तुम्ही म्हणतां तसें परवां दहापांच सांपडले वखारींत खरे– मी कुठें नाहीं म्हणतों–पण त्यांना रात्रीं मांजरें खातांना आम्हीं स्वतः पाहिलें. प्लेगचा अुंदीर असता तर मांजर कसा खाता त्येला?" छबिलदास रागीट लटपटीनें म्हणाले.

"आतां तेंहि जुळलें तर मग! शेटजी, मांजरें आठ दिवस ह्या बाजूला मरतात तीं कां तें आतां कळलें! अहो, प्लेगचे अुंदीर मांजरें खात नाहींत असा नियम नाहीं, पण प्लेगचे अुंदीर खाणारीं मांजरें सहसा जगत नाहींत असा नियम आहे. तीं मांजरेंहि पटापट मरतात!– छे, छ, छबिलदासजी, पांड्या सोनार कसा तडकाफडकीं मेला हें पाहून तरी आतां तुम्ही सगळ्या गांवकऱ्यांनीं हा मेलेले अुंदीर लपविण्याचा गाढवपणा यापुढें सोडून द्या. प्लेग गांवांत शिरला आहे ही गोष्ट नाकारणें म्हणजे मरणाला आमंत्रिणेंच आहे. प्लेगची भयंकर सांथ जें निर्दय दुर्दैव आम्हां माणसांवर धाडतें तें-देखील अितकें धर्मशील आहे, कीं मृत्यूची धाड माणसांवर अगदींच

अकस्मात पडूं नये म्हणून तिच्या चढाअीच्या आधीं अुंदीरघुशींच्या पटापट पडणाऱ्या प्रेतांचा—युद्धघोषणेच्या सूचनापत्रकांसारखा—घरोघर वर्षाव करते. पण आमचे अडाणी खेडवळ लोक काय नी मूर्ख नागरिक काय, प्लेगनें तडकाफडकीं माणसें मरूं लागेतों त्या-आधीं पटापट मरून पडणारे अुंदीर प्लेगनें मेले म्हणून मानणारच नाहींत ! अुंदीर प्लेगनेंच मरत आहेत हें आम्हांस प्लेगनें मेलेल्या माणसांच्या चितेच्या प्रकाशांत काय तें दिसूं शकतें ! बरें, आतां ह्या पांड्या सोनाराला जांबाअेवढाले गोळे येऊन तो चोवीस तासांच्या आंत मेल्यानंतर तरी सावध व्हा ! स्थानांतर तरी करा नाहींतर प्लेग टोंचून तरी घ्या ! गांवचें गांव प्लेगच्या तडाक्यानें कत्तल करून घेणें नसेल तर आतां तिसरा अुपाय नाहीं. टोंचून घेतल्यानेंच गेल्या वर्षी शेजारच्या अशोकपट्टण गांवचा जीव वांचला हें धडधडीत अुदाहरण तुमच्या डोळ्यांसमोरच आहे. तें खोटें म्हणेल तरी कोण ! "

" तुमच्यासारख्या चार पाखंड सुधारकांवाचून सारीं माणसें, सारे जण ! अहो चिंतोपंत, अशोकपट्टणांत प्लेग भडकतांच जो तात्काळ शमला तो तुमची प्लेगची लस अंगांत टोंचल्यानें नाहीं; तर त्या गांवच्या शंभुनाथ पाटलानें तात्काळ तेथील बहिरोबाच्या कडक दैवताला त्याच्या ठरलेल्या बारा बोकडांचा बळी दिला म्हणूनच ! त्या बोकडांच्या रक्तानें ती प्लेगची आग शमली. काय मूर्ख आहेत पहा ते शहाणे, शिकलेसवरलेलेच लोक ! अंगांत नुसतीं प्लेगचीं बीजें टोंचून प्लेग बरा होतो म्हणे !— आपल्या घरांत दरवडेखोरांना घुसवून घेतलें म्हणजे दरवडा पडत नाहीं म्हणे ! " रागारागानें बाळंभट्ट प्रतिपादूं लागले.

"अगदीं बरोबर ! " रामजी गाअिकवाड बाळंभट्टांस पाठिंबा देऊं लागले, " अगदीं हेंच मी म्हणत आलों आहे. त्या शंभुनाथ पाटलासारखे ह्या आमच्या गांवचे पाटील जर दरवर्षी आमच्या

बहिरोबास त्याचे बळी वेळच्यावेळीं देते, तर आज ह्या प्लेगच्या बापाची तरी छाती होती का आमच्या गांवांतील अेक अुंदीर देखील मारण्याची ? पण आमचे पाटील एरवीं कितीहि समंजस असले तरी ह्या कामीं टंगळमंगळ करीत आले त्याचा हा परिणाम. आणि आमच्या बुद्धीला भ्रम करणारा जर कोणी असेल तर—हा हा चितोपंतच होय ! गड्यांनो, जर ह्या गांवांत तुमच्या आमच्या मुलांमाणसांचा जीव यापुढं तरी या प्लेगच्या खाअींत ढकलायचा नसेल तर ह्या चितोपंतांच्या धर्मबुडव्या टोंचण्याबिचण्याच्या पाखंडाच्या नादास न लागतां, चला तडक त्या पाटलाच्या घरास, सांगू या त्यांना, कीं गांवच्या बहिरोबा देवाचें देणें तीन वर्षांचें देऊन टाका, छत्तीस बोकड या आठ दिवसांच्या आंत देवळाम्होरं कापून देवास थंड करा, नाहींतर देवाच्या कोपानें जो जो गांवकरी मरेल त्याचें त्याचें प्रेत तुझ्या दाराशीं आणून टाकलें जाअील !"

"अगदीं ठीक ! ह्मणे टोंचून घ्या प्लेगची लस ! —काय हो चितोपंत, आमच्या शिवाजीमहाराजांच्या मर्द मावळ्यांना कांहीं प्लेगची लस टोंचली होती का ? पण प्लेगचें नांवहि आमच्या वाडवडिलांनीं अैकलें नव्हतें—तें हो कसें ? बहिरोबा, मरीआअीप्रभृति गांवदेवी देवतांचे देणेकरी ते रहात नसत, वर्षाकांठीं जे बोकड बळी देणें ते देऊन देवता शीतळवीत, बरें का ! —म्हणे टोंचून घ्या ! !" —म्हणाला जान्या कुळवाडी. फार काय, दूर अुभा असलेला भाग्या महार, राम्या चांभारासुद्धां अेकामागून अेक गांवकरी बोकड बळी दिले नाहींत ह्मणूनच प्लेग आला, पांड्या सोनार मेला, ही गोष्ट चर्चितांचर्चितां चिडून चालला. अितक्यांत शिवु भुवड धापा टाकीत येऊन त्या थव्यांत घुसला नी म्हणाला, "बघतां काय येड्यावानी. नी बकत काय बसल्याती नुसतं ! अरे, पांड्या सोनार मरणाच्या आधीं बेशुद्ध झाला तेव्हां बहिरोबा देवानं त्याच्या अंगांत येअूनशानी सांगितलं, 'आतां कां रडतोस ! छत्तीस बोकड ! तीन वरसं ! गांवावर नांगर फिरवीन ! समदं रडत्याल समदं ! ! !' असं देव ह्मणाला.'

चिडून गेलेला तो थवा—ह्या बातमीसरशीं भडकून गेला! पाटलाच्या घरावर सैन्य चालून जावें तसा तो चालून गेला. बोकड! बहिरोबा! तीन वर्षांचें देणें! छत्तीस बोकड! हे शब्द त्या आरडा-ओरडींतून पताकांप्रमाणें सारखे वर अुठत होते. येणारा जो येअी तो त्यांतच घुसे. तेंच म्हणे!

त्या गांवच्या पाटलाचें तोंवर गांवांत मोठें वजन असे. त्यास गांवकरी अगदीं वचकून असत. आज ते बिथरले होते तरी पाट-लाच्या अंगणांत पाअूल टाकतांच दबल्यासारखे झाले. चिंतोपंत आणि बाळंभट्ट तेवढे पुढें सरून नेहमींप्रमाणें पाटलाच्या बैठकीवर बसले. बाळंभट यांनीं वेदशास्त्रसंपन्न अैटीनें सारें प्रकरण सांगून बहिरोबास गांवचा कुलस्वामी ह्मणून जें देणें तें द्यावें, देवधर्माचे धर्माचार जेथें तसेच असतील तेथें कोंबडीं, रेडे, बोकड प्रभृति बळी देणें हेंच शास्त्र, बहिरोबा अुग्र दैवत— अंगांत येअून सांगितलें तसेंच करील. प्लेग तडकाफडकीं नाहींसा करावयाचा तर बोकड आठ-चार दिवसांत यथासांग बळी द्यावे हेंच युक्त. असा चोख शास्त्रार्थ समजावून दिला.

पाटलानें शांतपणें टोंचण्याचे लाभ वर्णिले. ज्या गांवांत बोकड मारले तरी प्लेगनें शेंकडों लोक पटापट मेले त्यांचीं नांवें सांगितलीं. मुंबअी-पुण्यासारख्या ज्या ठिकाणीं हजारों लोक टोंचून घेतात त्यांच्यांत, त्या नगरांत बोकड न मारले तरी, टोंचलेल्यांपैकीं शेंकडा पाअुणशें लोकांना प्लेग कसा होत नाहीं आणि न टोंचलेल्यांत शेंकडा पाअुणशांना कसा होतो— तें सारें अुलटासुलट प्रमाणांनीं, कांहीं चिंतोपंतांनीं, कांहीं पाटलांनीं समजावलें. पाटलानें हेंहि सांगि-तलें, कीं मी सरकारांतून अेक अनुभवी डॉक्टर लस घेअून बोलावलाहि आहे. मी पहिल्यानें टोंचून घेतों असें आश्वासिलेंहि. पण ह्या जमावाचा तो रागीट मुखस्तंभपणा तुमचें म्हणणें आम्हांस मान्य नाहीं असें साफ बजावीत होता. पाटीलहि धूर्त होता. त्यानें

ताडलें, कीं आतां काम युक्तीनेंच घेतलें तर कांहीं साधेल. शेवटीं पाटलांनीं रीतसर बहिरोबा देवास बोकड बळी द्यावे असें ठरवलें-तेव्हां मग पाहिजे तर आम्ही टोंचून घेअूं असें फार थोड्यांनीं रडत-फडत म्हटलें.

०००　　　०००　　　०००

बहिरोबा गुरवाला मात्र ही तडजोड मुळींच मान्य झाली नव्हती. तो मुंबईचें पाणी प्यालेला नी त्या गांवांत अेक मोठा अतरंग म्हणून गाजलेला मनुष्य, तो कोणत्याहि देवाचा गुरव नव्हता तर केवळ आडनांवाचा गुरव होता. अेकदां त्यानें गांवांत बळानें भिक्षा अुपटणाऱ्या नाहींतर शिव्या देणाऱ्या पठाणाचें नाक कापून टाकलें; तेव्हांपासून पठाण तिकडे फिरके ना. अेकदां अेका मारवाड्यानें पैसे देतो म्हणून कर्जरोखा लिहून घेतला आणि नंतर त्या शेतकऱ्यास पैसे न देतां दिले म्हणून सांगूं लागला. तेव्हां या बहिरोबा गुरवानें त्या मारवाड्याच्या घरांतून तो रोखा चोरून आणून त्या शेतकऱ्यास दिला नी जाळला ! गांवांत गांवकीच्या अुत्सवादिकांत बहिरोबा गुरव गुरासारखा राबे-दमडी न घेतां; पण तो घरचा दरिद्री म्हणून त्यास बाळंभट, गाभिकवाड, मारवाडी प्रभृति ज्या शिष्टांच्या विरुद्ध तो दीनदुबळ्यांचा नेहमीं कैवार घेअी ते सारे अेक वर्गणी खाणारा पोटबाबू पुढारी म्हणून निंदीत. त्याची लोकांत नाचक्की कशी होअील आणि त्याच्या पैसेखाअू पुढारकीचें बिंग कसें फुटेल याची तो शिष्टांचा गट वाट पहात असे.

प्लेग चालूं होतांच पाटलाच्या नी चिंतोपंतांच्या सांगण्यावरून बहिरोबा गांवकऱ्यांचें मन प्लेग टोंचून घेण्यास वळवीत होता. तो स्वतः लोकांचीं घरें साफ करून प्लेगच्या रोग्यांची शुश्रूषादेखील करी. पाटलानें प्लेगची लस टोंचण्यास डॉक्टर आणतांच ज्या गांवकऱ्यांनीं पहिल्यानें टोंचून घेतलें त्यांत तो होताच. लोकांनीं टोंचण्याचा प्रत्यक्ष सिद्ध अुपाय सोडून बहिरोबा देवास बोकड मारले कीं

प्लेग हटतो, त्याचे बोकडाचे बळी थकले म्हणून त्या अुग्र ग्राम-देवतेनें प्लेग धाडला, अित्यादि भावड्या समजुती अुराशीं घट्ट बाळ-गाव्या याची त्या गुरवाला मोठी चीड येअी. ह्मणूनच पाटलानें नी चिंतोपंतानेंसुद्धां लोकांच्या हुल्लडीला भिअून बोकड मारण्याचें त्या दिवशीं ठरविलें याचा त्याला फार राग आला. तो चिंतोपंतांचा पट्ट-शिष्य, त्यांच्या 'पाखंड' मतांचा कट्टा अनुयायी; पण या वेळीं त्यानें पाटलास नी चिंतोपंतासहि त्यांच्या या दुटप्पी वर्तनासाठीं खूप झाडलें. पाटलांना आणि चिंतोपंतांनाहि मनांतून तेंच हवें होतें. बहिरोबा गुरवानें अेकदोनदां कांहीं खलवतहि केलें आहे अशी गुणगुणहि त्या मंडळींना लागली. देवापुढें बोकड मारण्याचा दिवस जवळ आला तसा ह्या बहिरोबा गुरवाचा कांटा वाटेंतून कसातरी काढून टाकलाच पाहिजे असें त्यांना वाटूं लागलें.

तोंच ती संधीहि आली ! अेक भयंकर अपराध करतांना बहि-रोबा गुरव धरला गेला ! साऱ्या गांवांतून अेकच खळबळ अुडाली ! पाटलांचा लोकांना विलक्षण वचक असे. स्वतः बहिरोबा अुलट्या काळजाचा मनुष्य, खऱ्याचें खोटें, खोट्याचें खरें करण्यांत तो पटा-अीत, दबला तर पाटलासच दबणार; तेव्हां ती फिर्याद प्रथम पाटला-कडेच न्यावी असें ठरवून छबिलदास मारवाड्याला नी बाळं-भटजींना पुढें घालून ते संतापलेले लोक पाटलाच्या अंगणांत जाअून मोठी गडबड करूं लागले. गुरवाला तुम्ही तरी शिक्षा द्या नाहींतर आज आम्ही काय करूं नी काय नाहीं याचा नियम नाहीं असें जो तो म्हणूं लागला.

अपराधच तसा भयंकर होता. बहिरोबा गुरवानें त्या गांव-कऱ्यांपैकीं कांहींना असें धमकावलें होतें, कीं मला दहा रुपये लांच जो निमूटपणें देणार नाहीं त्याच्या घरीं मी प्लेगचे अुंदीर– चेटूक केलेले, आणून टाकीन नी तें घरदार प्लेगनें ठार करीन ! ह्या प्रख्यात गावगुंडाच्या या भीतीनें कोणी कोणी हूं का चूंहि न करतां त्याची

मूठ तशी गुपचूप मरीतहि होते ! स्वतः बाळंभटांना आणि गाअिक-वाडांनाहि त्या गुरवानें धमकीचीं निनांवीं पत्रें टाकलीं, कीं अमक्या ठिकाणीं पैसे ठेवा नाहींतर प्लेगनें मराल ! त्या धमकीप्रमाणें पैसे येण्याची वाटहि न पहातां चेटुक करून मारलेले प्लेगचे अुंदीर गाअिकवाडांच्या घरांत त्यानें कालच्याच रात्रीं टाकले—आणि रातो-रात गाअिकवाडांना ताप फणफणून, जांघेंत गोळा आला— तो प्लेगनें विव्हळत अंथरुणावर पडला आहे.

पाटलानें तत्काळ बहिरोबा गुरवाला बोलावून आणलें. त्याच्या समक्ष त्याच्यावर आरोप सांगण्यास बाळंभटास पाटलांनीं सांगतांच बाळंभटांनीं त्या गुरवाचीं तीं सारीं नीच कृत्यें वर्णून शेवटीं धिक्कारलें, “ अहो, या नीच मनुष्यानें दहा रुपयांसाठीं त्या गाअिक-वाडांच्या गळ्यास नख दिलें, त्याचीं लहान दोन मुलें ‘ बाबा ! बाबा! बोला ना मशीं ’ म्हणून कळवळून रडतांना हीं मी आतांच पाहून आलों ! त्याची बायकोहि तापानें फणफणली आहे— तोहि प्लेगच असावा. नीच बहिरोबा गुरव ! मोठा लोकहितकर्ता म्हणून तूं आजवर मिरवत होतास; शहाणे लोक तुला गुण्डच म्हणत, पण भाबडे गावंढळ तुला देवच पावला असें समजत— पण, प्लेगसारख्या भयंकर संकटानें गांव भयभीत झालें असतां तूं बायाबापड्यांपासून दहा दहा रुपये नागवून अुपटायचा धंदा काढलास ! दहा रुपये द्या नाहींतर प्लेगचें चेटुक केलेले अुंदीर तुमच्या घरांत टाकून सत्यानाश करीन म्हणून पाजीपणाचा धडधडीत निरोप गाअिकवाडाच्या बायको कडे धाडलास आणि ती लाच तुला मिळाली नाहीं म्हणून काय केलेंस तूं ? अरे नीचा, दहा रुपये लांच तुला दिली नव्हती म्हणून त्यांचा शंभर रुपयांचा अेखादा दागिना पळविला असतास तरी फार तर चोराअितका वाअीट मनुष्य ठरतास; त्यांच्या घरास आग जरी लावतास तरी अेक नीच आगलाव्या पण मनुष्यच असें तुला आम्ही म्हणतों; पण दुष्टा, तुला दहा रुपडी मिळाली नाहीं म्हणून

तू आयांना मारून पितीं लेकरें धायधाय रडावयास लावायास निघा-लास, तरुण मुलींच्या कपाळाचें कुंकू पुसण्याचें अघोर कृत्य करतांना कचरला नाहींस ! त्या तुला चंडाळा, मनुष्य तरी काय पण राक्षस देखील म्हणवत नाहीं ! चिवचिव करीत पंख न फुटलेलीं पिलें घर-ट्याच्या तोंडाशीं येऊन हरवलेल्या आओची जशीं वाट पहातात तशीं त्या गाअिकवाडाचीं मुलें आपल्या बेशुद्धींत ओ न देणाऱ्या आओ बापांच्या अंथरुणापाशीं मुळुमुळु रडतांना मी आत्तांच पाहून आलों !— पण तुला त्यांची दया आली नाहीं ! दस रुपडीसांठीं तूं नरराक्षसा, चेटुक करून प्लेगचे अुंदीर घरांत फेंकून दहा दहा जीवांचे बळी घेतलेस ! तुला झाडास टांगून दगडांनीं ठेंचून मारलें तरी ती शिक्षा अपुरीच पडेल ! ! ! ”

लोकक्षोभ भयंक वाढला; पण पाटलाच्या दाबाखालीं दडप-ल्यामुळें भडकला नाहीं. पाटील रागानें लाल होअून बहिरोबा गुरवास हांसडूं लागले, “गुरव, तूं गांवगुंड असशील—पण मी सवाओ गांवगुंड आहे हें ध्यानांत धर ! तुला वाटत असेल, कीं कोर्टांत खेंचून खटला भरण्याइतका पुरावा तुझ्याविरुद्ध नाहीं. पण कोर्ट नी सरकार लांब ! पहिली गांठ माझ्याशीं आहे ! कागदी पुराव्यास विचारतो कोण ! तुझ्या घरादारावर नांगर फिरवून तुम्ही इथल्या इथेंच अशी गुपचूप चटणी करूं; कीं त्याची ना विचार-पूस ना पत्ता ! ! हां, जर तूं अपराध चटकन मान्य करशील तरच काय तें त्या दंडांत दयेचा कांहीं अंश वजावाट होईल. बोल, या आरोपाविषयीं तुझें म्हणणें काय ? ”

कांहीं झालें तरी गुरव अपराध मानणार नाहीं हें सर्व जाणू-नच होते.

तो बहिरोबा गुरव अुभा राहिला आणि अगदीं आढेवेढे न घेतां म्हणाला— “मी अपराधी आहे ! माझ्या हातून हीं भयंकर दुष्कृत्यें घडलीं ही गोष्ट सत्य आहे ! ”

साऱ्या मंडळींना त्याच्या या झटपट अपराधस्वीकाराचा मोठा आचंबा वाटला !

तो पुढें म्हणाला, "पण माझ्याहूनहि भयंकर क्रूरतेनें हीच दुष्कृत्यें करणारा, ज्याच्या धमकावण्यास भिऊन लोक त्यास लांच देण्यास मागेंपुढें पहात नाहींत, अितकेंच नव्हे तर ती लांच घेणें हें अेक कर्तव्यच समजतात, असें पाहून मला हें कृत्य– ज्यास आतां तुम्ही दुष्ट कृत्य म्हणतां आणि मी प्रथमपासूनच ज्यास नीच कृत्य समजत होतों– तें हें लोकांपासून प्लेगचा धाकदपटशा दाखवून पैसे उकळण्याचें, नाहींतर लोकांस प्लेगनें मारण्याचें पाप करण्याची मला चटक लागली, असा माझा अेक साथीदार या पापकृत्यांत वांटेकरी आहे. मला जी शिक्षा द्याल तीच त्याला द्याल तर मी त्याचें नांव सांगतों आणि द्याल ती भयंकर शिक्षा भोगतों ! "

बहिरोबा गुरवाचें हें अनपेक्षित मागणें अैकतांच बाळंभटासुद्धां कित्येकांच्या मनांत अिष्ट शंका चमकून गेली. गुरव म्हणतो तो त्याचा पापी साथीदार चितोपंतच असला पाहिजे. बरी आली संधि त्या धूर्त सोद्याला अचानक पकडण्याची. आतां अिद्राय तक्ष-काय स्वाहा ! असें वाटून साऱ्यांनीं त्या साक्षीदारासहि अत्यंत कडक शिक्षा झालीच पाहिजे असा गिल्ला केला.

पाटील म्हणाले, "रे नीच मनुष्या, तुझ्या सगळ्या साक्षी-दारांचा जर तूं पत्ता देशील तर गांवास नागवण्याच्या पापासाठीं तुला होणारी भयंकर शिक्षा अर्धी भयंकर होअील अर्धी त्या साक्षी-दाराचा वांटा ठरेल. तुझें म्हणणें तूं स्पष्ट सांग, तूं बोलतो आहेस तोंवर तुझ्या बचावाच्या वा अपराध स्वीकारण्याच्या भाषणांत कोणीहि व्यत्यय आणणार नाहीं. सांग, सांग, या अधम कृत्यांत तुझा साक्षीदार कोण आहे तो ! कुठें राहातो तो दुष्ट ? "

बहिरोबा गुरव धीटपणें अुत्तरला–" बहिरोबाच्या देवळांत !"

'काय? बहिरोबाच्या देवळांत राहतो तो? त्याचें नांव काय? बोल–" पाटलानें दरवडावलें.

"त्याचें नांव?"

गुरव किंचित् तिरस्कारीत, थबकत, शेवटीं झपकन अुद्गारला, "त्याचें नांव बहिरोबा देव! त्यानें आज कित्येक वर्षें हा धंदा–ज्यास आज तुम्ही नीच, अघोर, क्रूर अपराध म्हणतां तो हा धंदा–आज कित्येक युगें सभ्यपणानें, नव्हे, अगदीं देवपणानें चालविलेला आहे! त्याचा तो धंदा भरभराटलेला पाहूनच मी त्याच्यापासून तो शिकलों!–

"थांबा! लोकहो, खवळूंहि नका किंवा अुपहासूंहि नका! खरा देव कसा आहे तें तुम्हांला, मला किंवा मोठमोठ्या साधुसंतांनाहि कळलें नाहीं! त्या खऱ्या बहिरोबा देवाविषयीं कोण्या एका निगूढ पूज्य भावावांचून माझ्या मनांत दुसरी कोणती भावना असणार! पण मला लांच दे, नाहींतर तुला प्लेगनें ठार मारतो असें म्हणून लोकांस भयभीत करण्याच्या आणि लांच न दिल्यास त्यांना ठार मारण्याच्या या मारेकऱ्यांच्या धंद्यांत माझा साथीदार जो बहिरोबा देव आहे तो खरा बहिरोबा देव नसून तुमच्या भावनेच्या देव्हाऱ्यांत जो तुम्हीं प्राणप्रतिष्ठिला आहांत तो बहिरोबा देव होय! जो बहिरोबा परवां पांड्या सोनाराच्या बेशुद्धींत त्याच्या अंगांत येऊन आपल्या गावांस धमकावूं लागला, कीं 'माझे बोकड–तीन वर्षांचे छत्तीस–मला बळी द्या–नाहींतर मी सारा गांव प्लेगच्या साथीस धाडून ठार करीन!' तो बहिरोबा लांच अुपटण्याचा जो भयंकर अपराध मीं केला त्याहून शतपट भयंकर अपराधाचा अधिकारी नाहीं काय? त्याला बारा बोकड बळी दिले नाहींत तर मघां तुम्हीं मला म्हटलें तशा नीचतेच्या कोष्टकांत बोलायचें म्हणजे त्यानें गांवांतील फार तर बारा माणसें साध्या हिवतापानें आठवडाभर आजारी पाडायचीं होतीं, फार तर बारा घरांना आग लावायची

होती, तो वाटमान्या पुरुषपणा देवपणाला जरी शोभला नसता तरी राक्षसपणाइतकाच गर्ह्य ठरता. पण स्वतःला बारा बोकड लांच म्हणून दिले नाहींत एवढ्यासाठींच, बाळंभट, तुमच्या भाषेंतच बोलायचें म्हणजे लहानग्या दूधपित्या मुलांच्या आयांना तडकाफडकीं ठार करतो, लागोपाठ त्या मुलांनाहि प्लेगच्या तापाच्या पेटलेल्या चुलींत फेंकून देतो, एकेका घरांतीलच नव्हे तर अेकेका आळींतील माणूस नी माणूस, पुरुष, स्त्री, तरुण, वृद्ध अुंदिरांप्रमाणेंच सपासप दरवर्षी शंभरांनीं मोजीत मारून टाकतो, गांवच्या स्मशानांची अेकच प्रचंड सांघिक चिता पेटवून तींत मुलांमाणसांच्या शेंकडों प्रेतांस, भट्टींत सोन्यांनीं कोळसे ढकलावे तशा बेगणित अुघळपट्टीनें ढकलीत चलतो– केवळ बारा बोकडांची लांच मिळाली नाहीं म्हणून !– हा त्या बहिरोबा देवाचा अघोर क्रूरपणा राक्षसीपणालाहि लाजविणारा आहे ! दहा रुपडी लांच मिळाली नाहीं म्हणून मी फार तर अेखाद्या दुसऱ्या माणसास वा घरास प्लेगनें मरशील म्हणून धमकावलें असेल; त्या मला बाळंभट, मघां आपण जीं विशेषणें लावलींत तीं योग्यच होतीं. तुम्ही मला म्हणालांत क्रूर, आगलाव्या दुष्ट, नरराक्षस;– पण मग त्याच कोष्टकाप्रमाणें बारा बोकडांच्या लांचेसाठीं बाराबारा हजार वस्तींची गावेंचीं गांवें जो हा तुमचा बहिरोबा देव ठार मारतो तो देवराक्षस, तो मारेकऱ्यांचा सरदार, पेंढाऱ्यांचा पांडुरंग माझ्याहून क्रूर, आगलाव्या, गळेकापू असला पाहिजे कीं नाहीं तें तुम्हीच सांगा ? जर त्याला तुम्ही देव म्हणत असाल तर मला– या बहिरोबा गुरवाला निदान देवमाणूस तरी तुम्हीं म्हटलेंच पाहिजे, नी शिक्षा देणें तर दूरच पण सोडून देअून सन्मानिलें पाहिजे. पण बारा रुपडीच्या लांचेसाठीं मीं दोनचार माणसांस प्लेगनें मराल म्हणून धमकावलें यास्तव मला– या बहिरोबा गुरवाला दगड मारून ठार करावयाचें असेल तर बारा बोकडांचे बळी अुपटण्यासाठीं गांवेंचींगांवें प्लेगच्या साथीनें कत्तल करून टाकणाऱ्या त्या बहिरोबा देवालाहि तुम्ही निदान तितकी तरी शिक्षा दिली पाहिजे. माझ्या साथीदारालाहि

कडक शिक्षा देवूं म्हणून तुम्ही वचन दिलें आहांत!! यास्तव ह्या बहिरोबा गुरवाला तरी निर्दोषी म्हणून सोडून द्या नाहींतर त्या बहिरोबा देवाला तरी मारेकरी ह्मणून पकडा !

" भावड्या लोकांनो, बारा बोकड बळी दिले नाहींत तर बहिरोबा प्लेगाची साथ धाडील अशी भावना धरल्यानें तुम्ही देवालाच कसा राक्षस करून सोडतां तें आलें का आतां तुमच्या ध्यानांत ? हें तुमच्या ध्यानांत यावें म्हणूनच मीं हें नाटक केलें ! दहा रुपये दे नाहींतर प्लेगानें तूं ठार होशील असें कांहीं लोकांना मीं धमकावलें खरें; पण मी कोणापासूनहि दमडी घेतली नाहीं- प्लेगाचे अुंदीर कोणाच्याहि घरांत फेंकले नाहींत. अुलट गांवचीं घरें धुवून, रस्ते झाडून साफ केले आहेत ! बहिरोबानें बारा बोकड बळी देवूनहि गांवेंचींगांवें प्लेगानें आजवर मारून टाकलीं आहेत हें तुम्हांस ठाअूक आहे. अुलटपक्षीं युरोपमध्यें बहिरोबास कोणीहि बोकड देत नाहींत पण तिकडे गेल्या शेंकडों वर्षांत प्लेग ढुंकतहि नाहीं ! कारण ते बोकड मारण्याचा रानटी नी खोटा अुपाय सोडून प्लेगची अशी लस शोधून काढूं शकतात, कीं जी टोंचली असतां शेंकडा नव्वद माणसें भर प्लेगामध्यें जिवंत राहूं शकतात ! याच गांवीं पहा- बोकड मारण्याचा ध्यास धरणाऱ्यास, वाताच्या झटक्यांत तेंच बरळला असतां ज्याच्या अंगांत बहिरोबा आला म्हणून तुम्ही समजलांत, तो पांड्या सोनार प्लेगानें मेला; बोकड मारण्याचें ठरविणारा रामजी गाअिकवाड मरूं घातला आहे, त्याची बायको टोचून घेण्याचें नाकारल्यामुळें प्लेगनें पछाडली आहे; पण बोकडखाअू बहिरोबा देवास निंदिणारा हा मी बहिरोबा गुरव, मला हें नाटक रचून देणारे चितोपंत 'पाखंडे', आणि हे पाटील बाबा अजून जिवंत आहेत- कारण आम्हीं टोंचून घेतलें. आमचीं टोंचलेलीं मुलेंमाणसेंहि खुशाल आहेत. पण न टोंचलेल्यांचीं मुलें प्लेगनें पटापट लागता आहेत ! यावरून प्लेगच्या लशीनें प्लेग हटविणारांवरच खरा बहिरोबा देव प्रसन्न असतो हें नाहीं का सिद्ध होत ?"

अितक्यांत अेक मनुष्य धांवत येअून बाळंभटास सांगूं लागला, "तुमचा मुलगा ताप भरून पडला आहे. त्याच्या जांघेंत दुखतें आहे !"

त्या बातमीसरशीं बाळंभट्ट सभा सोडून तडक बाहेर पडले. बाळंभटाच्या मुलास वांचविण्यासाठीं डॉक्टरला घेअून बहिरोबा गुरवासुद्धां पाटील चिंतोपंतादिक मंडळींस परत जाण्यास सांगून, लागोपाठ अुठले.

ooo ooo ooo

बाळंभटाचा मुलगा त्याच रात्रीं मेला. त्याचा बाळंभटाच्या मनावर अेखाद्या चमत्कारासारखा परिणाम होअून ते बहिरोबा गुरवाचे शिष्य झाले. त्यांनीं स्वतः टोंचून घेतलें, मागोमाग कितीतरी गांवकऱ्यांनीं तसेंच केलें. प्लेगला त्यांतून कोणीहि बळी पडले नाहींत. बहिरोबाला बोकडाचे बळी मिळाले नाहींत,– त्याच वर्षी नव्हे तर पुढें केव्हांहि ! कारण शेजारच्या गांवीं प्लेगची साथ जेव्हां केव्हां येते तेव्हां बहिरोबा गुरवाच्या गांवचे हे लोक पटापट टोंचून घेत असतात; प्लेगची लस टोंचल्यानें बहिरोबा देव खराखरा प्रसन्न होतो, हीच त्यांची आजकालची धर्मभावना झाली आहे.

भाग ३ रा. समाप्त.